साप्ताहिक
# माणूस
३० एप्रिल ८३ दोन रुपये



साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : सेहेचाळीसावा ४८

¤

३० एप्रिल १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

¤

। पत्ता ।

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

मुखपृष्ठ रचना : संजय पवार

शिल्पाकृती : रोदॅ–सूझन

मीरा मुखर्जी –

एम्प्टी बाउल

## चाळीस गावांवर विषप्रयोग !

# आता जनआंदोलन उभे रहायला हवे !

सुबोध वागळे

या आधीच्या भेटीत 'माणूस'च्या वाचकांना पनवेल तालुक्यातील चावणा पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याच्या प्रदूषणाचा 'आंखो देखा हाल' मी सांगितला आहेच. (दि. १६ एप्रिल अंक) रसायनी येथील HOC, HIL, MAIDC, LONA व इतर काही कंपन्यांनी सोडलेल्या दूषित सांडपाणी व रसायनांमुळे ह्या सर्व भागातील चाळीस गावांवर भीषण संकट ओढवलेले आहे. त्या सर्वांची पहाणी दि. ३१ मार्च रोजी मी तान्याच्या युसुफ मेहेरअली सेंटरचा प्रकल्पसंयोजक अशोक सासवडकर व इतर दोन कार्यकर्ते यांच्याबरोबर केली. त्याच वेळी त्याचे रंगीत फोटोही काढले होते.

त्या सर्व प्रकरणाचे गांभीर्य ध्यानात येताच सगळ्या हालचाली त्वरित सुरू करण्यात आल्या. मुंबईचे काही आमदार, तसेच जिल्हाधिकारी श्री. अरुण भाटिया ह्यांच्याशी संपर्क केला गेला व त्यांनी स्वत: येऊन प्रत्यक्ष पाहणी करावी अशीही विनंती त्यांना करण्यात आली. दरम्यान रंगीत फोटो व इतर सर्व माहिती 'मुंबई सकाळ'च्या ६ एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध झाली. मुंबईच्या इतर वर्तमानपत्रांचे मात्र इकडे लक्ष फारसे गेले नाही. सेंटरच्या कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने ह्या भागातील गावऱ्यांनी हा प्रश्न धसास लावण्यासाठी एका कृतिसमितीची स्थापना केली व त्या समितीतर्फे गावागावातून प्रचार व जागृतीचे काम सुरू करण्यात आले.

दि. ७ एप्रिल हा ह्या प्रकरणातील महत्त्वाचा दिवस ! कलेक्टर भाटियासाहेब स्वत: येऊन पहाणी करणार ही बातमी सर्वांना आधीच समजलेली होती. त्यामुळे कृतिसमितीचे सदस्य, सेंटरचे कार्यकर्ते व इतर गावकरी तयारच होते. भाटियासाहेबांनी ह्या सर्व कारखान्यांना स्वत: भेट दिली. HOC व MAIDC चा खतकारखाना येथील अधिकाऱ्यांनी आपण दूषित पाणी पाताळगंगा-नदीत सोडत असल्याची सरळसरळ कबुली दिली; परंतु इतर दोन मुख्य कंपन्यांनी मात्र कानांवर हात ठेवले ! लाडिवलीच्या लोना कंपनीमधील अधिकाऱ्यांनी तर भाटियांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या वेळी पहाणी करताना भाटियांना दूषित पाणी नदीत सोडणारे चर दिसू नयेत म्हणून त्यावर माती टाकण्याचे काम जोरात चाललेले पहायला मिळाले.

HIL मध्ये तर कहरच झाला. तेथल्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही पाणी नदीत मुळीच सोडत नाही. आमचे त्याकरता वेगळे प्लँटस् आहेत. तिथला एक अधिकारी ते प्लँटस् दाखवायला सर्वांना घेऊन गेला. तिथला दुय्यम अधिकारी माहिती देताना घसरला व शेवटी 'आम्ही पाणी बाहेर सोडतो' असे म्हणून गेला ! इतरांनी लगेच सावरून घेतले व आपले टुमणे पुढे चालूच ठेवले की, आम्ही पाणी सोडत नाही. दरम्यान सेंटरचे कार्यकर्ते व काही गावकऱ्यांनी नाल्यातून वाहणाऱ्या पाण्याच्या अनुरोधाने जाऊन कारखान्याची पिछाडी गाठली. तेथे HIL कंपनीचे सगळेच पितळ उघडे पडले. कंपनीच्या मागच्या बाजूला उघड्या गटारांतून पाणी सरळसरळ नाल्यात सोडले जात होते. एवढेच नव्हे तर रस्त्याच्या पलीकडे जमिनीतून भूमिगत पाइप नेले होते. त्यांच्या तोंडांवर गवत व दगड टाकून त्यांची तोंडे घाईघाईने लपवण्यात आली होती. कंपनीच्या दुर्दैवाने तो सगळा प्रकारही उघडकीस आला व भाटियासाहेबही पाणी किती खोल मुरतेय ते समजून चुकले.

त्या दिवशी भर उन्हात सहा तास गावकऱ्यांबरोबर कलेक्टर त्या सर्व भागात हिंडले. त्यांनी स्वत: सर्व गोष्टींमध्ये रस घेऊन, उलटेसुलटे प्रश्न विचारून, कंपन्यांच्या लांड्या–लबाड्या उघडकीस आणल्या. त्यांची जिद्द,

पृष्ठ २४ वर

# सप्रेम नमस्कार

◻ 'ज्याचा पोवाडा गावा असा एक गाव' ही राळेगणशिंदी या गावाची हकिकत वाचली आणि चक्रावून गेलो. असा एखादा गाव अस्तित्वात असेल यावर अजूनही विश्वास बसत नाही. लाखाचा माल उघड्यावर असणे, घराला कुलूप न लावणे म्हणजे ह्युएनत्संगने प्राचीन भारताबद्दल लिहिलेल्या गोष्टी. हे श्री. अण्णा हजारे म्हणजे जादूगारच वाटतात.

२१ मार्च ८३ — मुकुंद पाटणकर, विलेपार्ले

◻ १९ मार्चचा अंक हाती पडताच सुखद धक्का बसला मुखपृष्ठ खूपच आकर्षक आहे. श्री. विजय परुळकर यांचा लेख वाचूनच अंक खाली ठेवला. भारावून गेलो. सध्याच्या कर्जबाजारी व सरकारी मदतीची सदैव याचना करणाऱ्या, व्यसनाधीन बनलेल्या निरुद्योगी अशा ग्रामीण भागातील चित्राला या लेखाने छेद दिला आहे.

२१ मार्च ८३ — श्री. दाते, भंडीशेगाव

◻ १९ मार्चच्या माणूस साप्ताहिकात 'असा एक अण्णा हजारे' यांच्या कार्याची गौरव गाथा लिहून, अनमोल असा हिरा श्री. विजय परुळकर यांच्या लेखाद्वारे समोर ठेवून बहुमोल कार्य केले आहे. त्यांच्या कार्याचा प्रकाश बहुजनसमाजात पसरविण्यास आणि त्यांना प्रेरणा देण्यास हा लेख खरोखरच मार्गदर्शक ठरेल.

२० मार्च ८३ — चं. अं. धाडीगावकर, मुंबई

◻ दि. ९ एप्रिल १९८३ च्या अंकात 'इथून–तिथून'मध्ये जगदीश यांनी लिहिलेले आहे की, पाकिस्तानात २॥ अब्ज कोटी (!) रुपये परदेशांतील पाकिस्तान्यांच्याकडून येतात. आता अब्ज–कोटी म्हणजे काय ? अब्ज कोटी ही संख्या शतलक्षप्रमाणे वाचायची असल्यास एकावर चौदा शून्ये ठेवावी लागतील. अर्थात ती १५ अंकी संख्या असेल. पाकिस्तानचा संपूर्ण आयात–निर्यात व्यापारदेखील दशसहस्र कोटींचा होत नाही. मुंबई दूरदर्शनवरील मराठी बातम्यांतदेखील काही वेळा मिलियन (दशलक्ष) चे भाषांतर कोटी म्हणून करण्यात येते. यामुळे आकडे चटकन दहा पटीने वाढतात. कागदावरील मोठ्या योजना कागदावरच अतिप्रचंड होतात.

श्रीकांत मुंदरगींची लेक वालेसावरील लेखमाला खरोखर वाचनीय आहे. मुंदरगींनी विशिष्ट वर्षाअखेरची पोलंडची तुलनात्मक आकडेवारी 'माणूस'मधून दिल्यास विषय वस्तूंतील आर्थिक पेचप्रसंग समजणे सोपे जाईल.

६ एप्रिल — श्रीनिवास कलंत्री, भांडुप

## प्रकाशकाची दुखणी

◻ 'माणूस'च्या जुलै अंकात 'एका प्रकाशकाची दुखणी' असे हेडिंग देऊन आपण परीक्षण प्रकाशित करून माझ्या पुस्तकाची जी जाहिरात केलीत त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतरच ते परीक्षण प्रकाशित केले असेल याबद्दल माझी खात्री आहे.

या पुस्तकातील दुखणी प्रकाशकाची आहेत, का लेखकाची आहेत याचा विचार करून नंतर आपण ती प्रकाशकाची दुखणी आहेत असे गृहीत धरलेले दिसते.

'प्रकाशकाची काही दुखणी' लेखकांच्या संदर्भात असू शकतात असे आपल्याला तीव्रतेने जाणवलेले दिसते व आपण ती समाजापुढे मांडू पाहात आहात याचा नव्यानेच ताजा पुरावा मला आपल्या दिवाळी ८२ अंकात मिळाला.

आपला 'माणूस'चा दिवाळी अंक अप्रतिमच आहे; पण प्रकाशक म्हणून आपल्यालाही काही दुःख असावे आणि ते निराळ्या आविष्काराने आपण व्यक्त करीत आहात की काय अशी शंका यावी ! 'माणूस'मध्ये (दिवाळी अंकात) कै. सदानंद रेगे यांच्यावर श्री. रामदास भटकळ यांचा मृत्युलेख आहे. आपण बहुश्रुत संपादक, संपादन करताना मृत्युलेखात तरी प्रकाशकाची लेखकांच्या संदर्भातील दुखणी जाहीर होऊ नयेत याचे आपले भान असे कसे सुटले ? सामान्यतः मृत्युलेखात परस्पर कटुसंबंध विसरून, माणूस गेला त्या दिवशी तरी त्याचे कटु अनुभव आठवू नयेत असे आपण म्हणतो.

मी एका पानाच्या कहाणीत लिहिले ते खांडेकरांच्या अपुऱ्या चरित्रातील भाग पूर्ण करण्यासाठी म्हणून आणि तेही त्यांच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी, निराळ्या संदर्भात. तरी आपल्याला ती दुखणी वाटली. त्यापेक्षा अगदी निराळे असे लिखाण आपण मृत्युलेखातच घातले आहे, यावरून माझ्या मनातली शंका जास्त बळकट झाली. कारण तो लेख श्री. रामदास भटकळ व सदानंद रेगे यांचे संबंध कुठल्या पातळीवर येऊन ठेपले होते हेच दाखवतो आणि तरी श्री. रामदास भटकळ यांनी लेख लिहिला आणि आपण तो छापलात. यातच आपल्या दुखण्याची ठसठस कुठे तरी व्यक्त होते. कारण एकाला वाईट म्हणून दुसऱ्याला चांगले म्हणण्याचा पक्षपात तुमच्यातील संपादक करणार नाही याबद्दल मला खात्री आहे.

तुम्ही संपादक आहात तसेच प्रकाशकही आहात. तुमची प्रकाशक म्हणून दुखणी असतील, ती बोलता येत नसतील; पण कुणी तरी आपली दुखणी मांडीत आहे याचे तुम्हाला समाधान असावे म्हणून तुम्ही श्री. रामदास भटकळ यांचा असा लेख मृत्युलेख म्हणून छापलात; पण ते योग्य नाही. कारण मृत्यु–लेखात असा मजकूर असणे गैर; पण तुमच्यासारख्या बहुश्रुत संपादकाची चूक मी कोण काढणार ?

बरेच दिवस आपल्याला पत्र लिहावे असे वाटत होते; पण थोडेसे प्रकृति–अस्वास्थ्य आणि हा मजकूर लिहावा न लिहावा याचा विचार करीत होतो. शेवटी आपले विचार मनात ठेवण्यापेक्षा व्यक्त करणे बरे असे वाटून आज हे पत्र लिहीत आहे. कमी-जास्त शब्द पडले असल्यास माफ करा. कळावे, ही विनंती.

पृष्ठ २२ वर

मुक्काम मुंबई

# प्रदेशाध्यक्षपदाचं भिजत घोंगडं आणि भोजनावळी

कपिल पाटील

इंदिरा काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष-पदाचं गुऱ्हाळ अद्यापही संपलेलं नाही. ते अपेक्षितच होतं आणि आता त्यावर डोळा ठवून राज्यपक्षात भोजनावळी सुरू झाल्या आहेत. विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपता संपता आणखी बऱ्याच भोजनावळी झडतील.

या वेळचे भोजनभाऊ आहेत माजी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले आणि मंत्री बाबुराव काळे. नव्या मंत्रिमंडळात भोसले-गटाला जवळजवळ स्थानच नसल्याने आपल्या गटाकडे प्रदेशाध्यक्षपद यावे यासाठी ते प्रयत्नशील आहेत, तर स्वत: बाबुराव काळे राज्यपक्षाचे नेतृत्व स्वीकारण्यास इच्छुक आहेत. मराठवाड्यास मंत्रिमंडळात पुरेसे प्रतिनिधित्व नसल्याने राज्यपक्षाचे नेतृत्व मराठवाड्याकडे असावे अशी त्यांची मागणी आहे दरम्यान मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या चहापानास उपमुख्यमंत्री रामराव आदिक यांनी अनुपस्थित राहून पुन्हा एक धक्का देण्याचा प्रयत्न केला आहे. दादांचा ज्यांना ठाम विरोध आहे, त्या एस. एम. आय. असीर यांनाच राज्यपक्षाचे अध्यक्षपद मिळावे यासाठी आदिक आग्रह धरून आहेत.

महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षपदा-वरून गुलाबराव पाटील यांना हटविले जाणार, हे नवे सरकार आले तेव्हाच निश्चित झाले होते; परंतु प्रदेशाध्यक्षपद कोणत्या गटाकडे घ्यायचे यावरून वाद होता. दादांना नाखुषीनेच मुख्यमंत्री होण्यास संमती देणाऱ्या इंदिरा गांधी प्रदेशपक्षाचे नेतृत्व त्यांच्या गटाकडे देण्यास आजही तयार नाहीत. आदिक यांचे उमेदवार असीर यांचे नाव प्रदेशाध्यक्षपदी जाहीर करून त्यांनी दादांची मानहानीच केली होती; पण दादांनी कणखर भूमिका घेतली आणि दिल्लीचा डाव फुजला; पण त्या नामु-ष्कीचं धनी व्हावं लागलं त्रिपाठींना. इंदिरा काँग्रेसचे ‘कामचलाऊ’ अध्यक्ष कमलापती त्रिपाठी यांनी असीर यांचे नाव मागे घेतल्यानंतर पुन्हा महिनाभर अध्यक्षपदाचं घोंगडं भिजत पडलं.

भोजनावळींच्या निमित्ताने इंदिरा काँग्रे-सच्या पक्षांतर्गत हालचालींना पुन्हा वेग आला आहे. नवे सरकार आल्यानंतर सर्वांत असमाधानी राहिला तो भोसले–काळे यांचा गट प्रदेशाध्यक्षपदावरून मुख्यमंत्री आणि उप(प्रति)मुख्यमंत्री यांच्यात सुरू झालेल्या संघर्षाचा फायदा आपल्या गटास मिळावा यासाठी भोसले–काळे प्रयत्नशील आहेत. बाबुराव काळे यांनी आपल्या चित्रकूट बंगल्यावर पहिलं भोजन दिलं. काळेंच्या भोजनास दादांच्या मंत्रिमंडळातील काही मंत्री उपस्थित होते असे माहितगारांनी सांगितले. हे मंत्री दादा किंवा आदिक गटाचे नाहीत.

दुसरं भोजन दिलं माजी मुख्यमंत्री बाबा-साहेब भोसले यांनी. माजी मंत्री डॉ. व्ही. सुब्रह्मण्यम आणि लीलाधर व्यास हेही या भोजनाचे निमंत्रक होते. माजी मंत्री आणि आमदार असे ७५ जण भोसलेंच्या जेवणास होते. ही संख्या निश्चत मोठी असली तरी हे सगळेच भोसलेंचे खरे समर्थक नव्हते. भोसले मुख्यमंत्री होण्यापूर्वी त्यांच्यामागे कुणीही आमदार नव्हते ही वस्तुस्थिती आहे. नव्या मंत्रिमंडळात आपल्या काही सहकाऱ्यांना स्थान मिळावे यासाठी ते सतत प्रयत्नशील होते; परंतु दादा–आदिकांच्या स्पर्धेत त्यांचा टिकाव लागला नाही. त्यामुळे भोसलेंचे नेतृत्व मानून कितीसा फायदा पदरात पडेल याबद्दल आमदार साशंक आहेत.

महिना झाला तरी प्रदेशाध्यक्षपदाचं नाव निश्चित होत नाही आहे. इंदिराबाईंच्या दृष्टीने प्रदेशाध्यक्षपदासाठी महत्त्वाचे तीन निकष आहेत. एक तो अल्पसंख्य किंवा मागासवर्गीय असावा; परंतु मराठा नसावा. त्याने फक्त दिल्लीच्या निर्णयांची योग्य अंमल-बजावणी करावी; परंतु तो स्वतःची प्रतिमा असलेला नसावा, अशा नावाचा सध्या शोध सुरू आहे. अंतुले यांना दूर करीत असतानाच एखादा मुस्लिम प्रदेशाध्यक्षपदी बसविणे इंदिराबाईंना अधिक उपयुक्त ठरणार आहे. दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्रीपदी मराठा माणूस असल्याने मराठा लॉबीचे शक्य तितके वर्चस्व कमी व्हावे असा त्यांचा प्रयत्न राहील. रिद्वान हॅरिस, झकेरिया, फारुक पाशा, सुधाकरराव नाईक या नावांची सध्या चर्चा सुरू आहे; परंतु दिल्लीचा कोणताही सूचक कंदील या नावांवर दिसत नाही आहे. राम-राव आदिकांचा आग्रह अद्यापही असीर यांच्या नावावरच दिसत असला तरी दादांनी राजिनाम्याची धमकी दिलेली असल्याने ते नाव आता बाद झाले आहे. या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या भोजनावळी आपल्या गटाच्या शक्ति–प्रदर्शनासाठीच आहेत; परंतु त्याची दखल इंदिरा गांधी घेतील असे दिसत नाही.

सत्तारूढ पक्ष भांडणांनी पोखरून निघाला असताना त्या पक्षाच्या नेत्या इंदिरा गांधी यांना त्याचे सोयरसुतक नाही. अन्यथा त्यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा प्रश्न महिनाभर भिजत ठेवला नसता. पक्षसंघटनेचे महत्त्व त्यांनी कधीच मानलेले नाही. इंदिरा काँग्रेस हा एकखांबी तंबू आहे असं केन्द्रीयमंत्री वसंत साठे म्हणाले होते, ते शंभर टक्के खरे आहे. चहूबाजूंच्या खांबांचा विचारच इंदिरा गांधी करीत नाहीत. कोणत्याही एका गटाला वरचढ होऊ देण्याची संधी त्यांना द्यायची नसल्याने प्रदेशाध्यक्ष-पदाचा प्रश्न भिजत पडला आहे. सध्या अस-लेले प्रदेशाध्यक्ष गुलाबराव पाटील एरव्ही निष्क्रियच होते आणि या वादात त्यांच्याकडे आता काही काम राहिलेले नाही. प्रदेशाध्यक्ष असून नसल्यासारखी महाराष्ट्र इंदिरा काँग्रे-सची स्थिती आहे. इंदिरा गांधींना निवडणूक समोर दिसत असली तरी पक्षसंघटना मज-बूत करण्याची गरज त्यांना वाटत नाही. निवडणुका जवळ येईपर्यंत शिस्तभंगाच्या कारवाया, मानहानी अशी नाटकं या एक-खांबी तंबूत चालतात आणि एकदा निवड-णुका आल्या की, साऱ्यांना सामावून घेतलं जातं हा इंदिराबाईंचा शिरस्ता आहे.

महाराष्ट्रातील पक्षाच्या नेतृत्वाचा विचार इंदिरा गांधी यांच्यापुढे निश्चित आहे; परंतु एखादा निर्णय घेताना एका दग-

डात अनेक पक्षी मारण्याचे काम त्या करतात. प्रदेशाध्यक्षपदाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर माजी उपमुख्यमंत्री नासिकराव तिरपुडे यांच्या पक्षात पुनरागमनाची सुरू झालेली चर्चा सूचक आहे. दादांच्याच मंत्रिमंडळात तिरपुडे उपमुख्यमंत्री होते आणि प्रतिमुख्यमंत्री म्हणून वावरत होते. तिरपुडेंचे पुनरागमन दादांना इशारा देण्यासाठीच असेल; परंतु त्वरेने त्यांच्याकडे प्रदेशपक्षाचे नेतृत्व दिले जाणार नाही.

शक्यता अधिक आहे ती इंदिरा गांधी पडद्यावर नसलेल्या एखाद्या सामान्य व्यक्तीस प्रदेशपक्षाच्या अध्यक्षपदी बसवतील याची. मध्यतरी प्रदेशाध्यक्षपदासाठी खासदार श्रीमती नजमा हेप्तुल्ला यांच्या नावाचा विचार सुरू असल्याची छोटी बातमी येऊन गेली होती. ही बातमी मोठी सूचक आहे. श्रीमती हेपतुल्ला यांनाच महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षपदी आणण्यात येईल असं नव्हे; पण इंदिरा गांधी कोणत्या दिशेने विचार करीत आहेत याचा अंदाज या बातमीने बांधता येईल.

वर्षभरापूर्वी अंतुले यांच्यानंतर भोसलेंची मुख्यमंत्रिपदी झालेली निवड काय किंवा दादांना नामोहरण करण्यासाठी त्यांच्याच किल्ल्यातील गुलाबराव पाटील यांची राज्य-पक्षाध्यक्षपदी झालेली निवड काय, इंदिरा गांधी यांना 'कामचलाऊ' माणसं फक्त हवी आहेत, हेच सांगतात. मराठा नसलेला शक्यतो अल्पसंख्य किंवा मागासवर्गीय व्यक्तीला; परंतु पक्षसंघटना चालविण्याचा कोणताही वकूब नसलेल्या व्यक्तीलाच इंदिरा गांधी महाराष्ट्रात पाठवतील याची अधिक शक्यता आज तरी आहे. □


**प्रकाशनाच्या वाटेवर**

'माणूस' १९८२ दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली

## आयडा स्कडर

या आद्य मिशनरी स्त्री डॉक्टरची अपूर्ण जीवनकहाणीही लवकरच पूर्ण पुस्तकरूपात.

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

**राजहंस प्रकाशन, पुणे**


# मुंबापुरी....

मंगळवारी जनतापक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांनी ठाण्याची खाडी ओलांडली आणि डॉ. भाऊ दाजी लाड, जगन्नाथ शंकरशेठ, जमशेटजी टाटा, अमिताभ बच्चन, डॉ. दत्ता सामंत आणि हाजी मस्तानच्या परमपावन गावात प्रवेश केला. त्या वेळी, मानखुर्दला उस्ताद अब्दुल करीम खांसाहेबांच्या जलशाला जशी गर्दी व्हायची, तशी गर्दी झाली होती. अन् का नाही होणार? सगळी नगरसेवकमंडळी तिकडे गेली होती. पालिकेच्या गाड्या अशा वेळी उपयोगी पडतात. एका अपक्ष नगरसेवकानं पायी मानखुर्दला जाण्याची सूचना केली होती. ती अर्थातच मानली गेली नाही. शेवटी महापालिकेनं इतक्या गाड्या आणल्या आहेत त्या कशासाठी?

चंद्रशेखरना पाहताक्षणीच नगरसेवक वेडेपिसे झाले. त्यांच्याबरोबर फोटो काढण्यासाठी जी अविरत धडपड नगरसेवकांनी केली, त्याच्या निम्मीही जर केली, तर केन्द्रसरकार आणि राज्यसरकारकडून भातसई योजनेसाठी अद्याप न आलेली कोटचवधी रुपयांची थकबाकी वसूल होईल; पण तिथेच तर गोम आहे ना? हे नगरसेवकलोक जिथं नको तिथंच उत्साहानं दुथडी भरून वाहतील!

आता असंच पहा ना, शिवसेनेच्या लोकांना 'बाळ ठाकरे झिंदाबाद' असं ओरडण्याची काय गरज होती? ठाकऱ्यांचा आणि या पदयात्रेचा काय संबंध? मानखुर्दच्या स्वागत–समारंभात हे घोषणायुद्ध खूप गाजलं.

त्याहीपेक्षा गाजणारेय बँड–प्रकरण! चंद्रशेखरजींच्या स्वागतासाठी मेयर मनमोहनसिंग बेदी पालिकेचा बँड घेऊन गेले होते. आता कुणी काही म्हटलं तरी ही पदयात्रा हा पक्षीय कार्यक्रम आहे. त्याला महानगर–पालिकेचा बँड कशाला? या प्रकरणामुळं बेदींचा आणि पर्यायाने जनता पक्षाचा 'बँडबाजा' वाजेल असं बोललं जातंय. काँग्रेस आय. चे रमेश दुबेच असा भसाडा विसंवादी सूर लावतील की पूछो मत!

याअगोदर चंद्रशेखरांच्या स्वागतासाठी एक नागरिकसमिती स्थापन करण्याच्या संबंधीची मीटिंग पालिका–सभागृहात बोलावून बेदींनी मोहोळ उठवलं होतं. आय. वाले कोर्टात गेले होते. स्टे काही मिळाला नाही; परंतु कमिशनरांच्या मध्यस्थीमुळे प्रश्न मिटला. बेदींनी मीटिंग आपल्या चेंबरमध्ये बोलावली.

त्यानंतर हे आता बँडबाजा–प्रकरण. आल्या–आल्या बेदींनी झेंडा फडकावला आहेच. विरोधकही 'कच्छा करकचून' त्यांच्यासमोर उभे ठाकले आहेत. बोला जो, बोलो सो निहाल!

### चौपाटीवर

साडेसहाच्या जनतापार्टीच्या सभेसाठी सात वाजेपर्यंत धावत-पळत चौपाटीला पोहोचलो. चौपाटीची 'पंजाबी कुल्फी' आणि 'दी बेस्ट पाणीपुरी' ह्या साऱ्यांचा लोभ सोडून घाईघाईने दुसऱ्या टोकाशी–जनता पार्टीच्या मांडवाशी आलो. 'देशके नेता चंद्रशेखर' सात-चाळीसला चौपाटीला येऊन पोहोचले. चालत निघालं की लोक बरेच भेटतात. मग त्यांची सुखदुःखे ऐकता ऐकता उशीर होणारच!

मागे 'देशके नेता' राजीव गांधी मुंबापुरीत आले होते. त्यांच्या 'पदयात्रे'पेक्षा ही यात्रा वेगळी वाटली. राजीव गांधींची पदयात्रा-कम-जीपयात्रा होती. त्यांना चालणे सुसह्य व्हावे म्हणून धारावीचा कायापालटच करण्यात आला. लोकांनी 'राजीव गांधी झिंदाबाद' बरोबर 'गली गली में शोर है, मुरली देवरा चोर है' अशासुद्धा घोषणा दिल्या. ह्या धारावीच्या लोकांना 'मॅनर्स' बिलकुल नाहीत! राजीव गांधीसमोर अशा घोषणा देण्याची काय गरज होती? पदयात्रा संपता संपताच ऑफिसमध्ये युवक काँग्रेस (आय) चे नेते मधुकांत शुक्ला ह्यांच्या हकालपट्टीची मागणी करणारे पत्रकही येऊन पडले. गिरणीकामगारांनीसुद्धा निदर्शने केली. आजकाल मुंबईत गिरणीकामगारांच्या प्रश्नावर बोलणे ही एक फॅशन झालीय! कोणतेही राजकीय भाषण ह्या प्रश्नावर बोलल्याशिवाय पुरे होतच नाही. ह्या संपाने

पृष्ठ २७ वर

# रोदँची शिल्पं

## निसर्ग आणि आत्मा यांचे बंध दाखवणारी !

२० मार्च ते २० एप्रिल–संपूर्ण महिनाभर मुंबईच्या टाटा थिएटरमध्ये एक फ्रेंच कलाकार तळ ठोकून होता. त्याच्या वास्तव्याकडे येवढं आवर्जून लक्ष द्यायचं कारण हा कलाकार गेल्या शतकातला एक महान शिल्पकार होता.

रोदँ–त्याच्या काही निवडक शिल्पकृतींचं 'इंडो–फ्रेंच कल्चरल एक्सचेंज प्रोग्रॅम'तर्फे नोव्हेंबर ते जानेवारी ८३, असे तीन महिने दिल्लीच्या 'नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट' मध्ये लावलं होतं. त्यानंतर या साहेबांचा मुक्काम मुंबईत. त्यांचं नाव आणि शिल्पकृतींची छायाचित्रं दैनिकात छापून यायला लागली. त्या शिल्पकृतींची सौंदर्यरसग्रहणं वाचली. हे सौंदर्य आपल्यालाही कळेल का? आणि चिकित्सकाच्या तर सोडाच; पण साध्या आस्वादकाच्या भूमिकेतून तरी ही शिल्पं आपल्याला पहायलाच पाहिजेत असा मी विचार करत होते.

रोदँचं नाव मला नवीन नव्हतं. फक्त त्या संदर्भावरून १०–१२ वर्षं निघून गेली होती. माझी आणि रोदँची ओळख अगदी पुसटशी. आमच्या अभिनवच्या गोंधळेकरसरांनी त्यांच्या कलेबद्दल कधी तरी जाता येता बोललेलं. अभ्यासक्रमात त्यांच्याबद्दल थोडंस वाचलेलं आणि त्यांच्या काही शिल्पकृतींची छायाचित्रं पाहिलेली; पण तेवढ्या ओळखीमुळंच 'हा कोण बुवा रोदँ?' असा काही प्रश्न मला पडला नाही. म्हणून मुंबईला मात्र जायचं नक्की ठरवलं.

प्रदर्शनात रोदँच्या सुमारे ८०-९० छोट्यामोठ्या शिल्पकृती ठेवल्या आहेत. काही संपूर्ण मानवी आकृती येवढ्या मोठ्या तर काही अगदी वीतभर लांबीच्या. रोदँचं नाव ऐकलं होतं ते मायकेल अँजलोबरोबर. अँजलो आणि रोदँमध्ये तीन–चार शतकांचा फरक. अँजलेच्या शिल्पकलाशैलीचा रोदँवर गहिरा परिणाम झाला होता. त्याला त्याची शिल्प आवडायची. अँजलोच्या शैलीचा ठसा रोदँच्या २–३ शिल्पांतच दिसतो. उदाहरणार्थ 'द कॉल टू आर्मस्', 'फॉलिंग मॅन' किंवा 'शॅडो' या शिल्पांचा उल्लेख करता येईल. काळानुरूप शिल्पकला धार्मिक भावनेपासून हळूहळू लांब गेली. त्याला रोदँही अपवाद नव्हता. रोदँची कला पारंपारिक (traditional art) या सदरातच मोडते. हेन्री मूरप्रमाणे त्याच्या कलेत आभास निर्माण करण्याची आधुनिकता दिसत नाही. त्याच्या कलेचं आविष्करण हे सरळ पद्धतीनं केलेलं 'एक्सप्रेशनॅलिस्ट' असं आहे.

मानवी आकृतींचं त्याच्या शिल्पातून होणारं दर्शन लक्षणीय का वाटतं? का आकर्षून घेतं? याचं कारण रोदँच्या मानसिकतेत सापडतं. मानवी शरिराला मंदिर समजून तितक्याच उत्कटतेनं रोदँनं त्याच्या शिल्पकृतींना आकार दिला. ब्राँझच्या पुतळ्यातून मानवी भाव भावना दाखवण्याचं अवघड काम त्यानं त्याच्या या भूमिकेतून करून दाखवलं आत्मा आणि निसर्ग यांच्यात सर्वत्र पाणवणारे बंध आणि त्यातलं वैविध्य हे त्याला सतत आकर्षून घेणारे विषय होते. रोदँ म्हणतो, कोणताही चांगला शिल्पकार त्याच्या कलेपासून विश्वाचं गूढ बाजूला करू शकणार नाही. जीवनाचं हे गूढ कलाकाराच्या मनात असेल तरच चांगली शिल्पकृती निर्माण होते. ही भावना शिल्पातून कशी व्यक्त होते? रोदँनं उत्तर दिलंय, एखादी कल्पना, थीम एखाद्या ढोबळ आकृतीतून मांडायचा कोणीही प्रयत्न करू नये. आधी आकार तयार करा, त्याच्यातून काही तरी निर्माण करा, कल्पना–भावना आपोआप त्याच्या मागे येईल.

रोदँनं असंही म्हटलं आहे की, मी प्रवासाला सुरुवात करतो एके ठिकाणी आणि पोचतो दुसरीकडेच. एखादा हेतू मनात ठेवून कामाला सुरुवात करतो आणि ते संपवतो, तेव्हा मी अगदी वेगळीच गोष्ट केलेली असते. जेव्हा मी मातीशी खेळतो, माझ्या स्मृतींच्या आड गेलेली एखादी सुप्त चमकदार कल्पना हळूहळू वर येते आणि जेव्हा मी शिल्प पूर्ण करतो तेव्हा त्या उमललेल्या कल्पनेचं माझ्या डोळ्यांसमोर आलेलं मूर्त स्वरूप असतं. मला माहीत असतं की, निसर्गातली माझ्या मनात रुतून बसलेली एखादी गोष्ट आणि माझी आकृती यांचं ते एक छान मिश्रण असतं आणि याच्यापूर्वी ती कल्पना कधीही माझ्या डोळ्यांसमोर आलेली नसते. जेव्हा मी माझं चित्र पूर्ण करायला घेतो तेव्हा ते मला खूपच सोपं वाटतं. मग उलटी क्रिया सुरू होते. माझ्या कलेचं प्रतिबिंब मी जेव्हा पुन्हा निसर्गात जसंच्या तसं पहातो तेव्हा त्या जिवंत साधर्म्यामुळं माझं मन आनंदानं भरून येतं.

रोदँची शिल्पं बघताना हे सगळं जसंच्या तसं जाणवतं. रोदँनं त्याच्या कलानिर्मितीच्या प्रवासाबद्दल किती सावधपणानं लिहून ठेवलं आहे हे वाचून आपण चकित होतो.

रोदँ म्हणतो, 'तुम्हाला जे अगदी पहिल्यांदा जाणवतं किंवा जे प्रकर्षानं जाणवतं ते तुमच्या शिल्पाचं नाव आणि लक्षात ठेवा नेहमी आकृती कल्पनेला जन्म देत असते.

शिल्पं कशी बघावीत? कोणत्याही गोष्टीचं फार निरीक्षण करू नका! कोणत्याही पूर्वकल्पना मनात ठेवू नका. काय निवडायचं, काय सोडायचं हे भविष्यातच लिहून ठेवलं आहे नेहमी बरोबरच ठरण्याचा प्रयत्न करू नका आणि लक्षात ठेवा की, 'मास्टरपीस' कदाचित अगदी तुमच्या डोळ्यांसमोर असेल!'

या पार्श्वभूमीवर रोदँची शिल्प बघणं हा एक अनुभव असतो. त्याचा 'थिंकर' किंवा 'मॅन विथ ब्रोकन नोज', 'मोर्नर', 'सूझन' बाल्झॅकची पोर्ट्रेटस् ही सगळी शिल्पं नकळत कळायला लागतात. त्यानं बनवलेल्या चेहऱ्यांवरचे (Busts) भाव भान हरपून टाकतात काळजी, हास्य, निर्भयता, दुःख, कष्ट यांचे भाव हे सहज आविष्कृत होतात. त्यासाठी वेगळ्या रसग्रहणाची गरज लागत नाही. 'मोर्नर' शिल्पातल्या स्त्रीच्या कपाळावरच्या आठ्या, ओठांची ठेवण, डोळ्यांतली निस्तेजता बघून दुःखाचं प्रतीक वेगळं

काय असतं असं वाटून जातं. 'सूझन' या शिल्पातून जाणवणारे निष्पाप मुग्धभाव असेच थक्क करणारे आहेत. 'सूझन' हे एक नितळ सौंदर्य आहे. सूझनच्या चेहऱ्याची ठेवण, मान किंचित कलती ठेवून घेतलेलं 'कंपोझिशन', चेहरा पेळणारी उंच डौलदार मान, चेहऱ्यावर हलकेच झेपावणाऱ्या कुरळ्या बटा, हनुवटीचा लाडिक टोकदारपणा, किंचित उंचावलेलं नाक आणि असं बरंच. शिल्पाचा आकार आहे १–१॥ फूट.

मानवी शरीर-रचनेचा रोदँचा अभ्यास सूक्ष्म होता. वेगवेगळ्या मानवी हालचालीतून दिसणाऱ्या शरिराच्या ठेवणीच्या अनेक रचना हे दाखवून देतात. 'थिंकर'ची पोझ त्याचे रुंद बळकट खांदे, मान झुकवलेली, हाताच्या पालथ्या पंजावरची हनुवटी आणि कपाळावरची अस्पष्ट आठी 'थिंकर' जिवंत होतो.

माणसांच्या हातातून भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न रोदँइतकाच चांगल्या पद्धतीनं क्वचितच कोणी केला असेल. 'कॅथेड्रल', 'इटर्नल आयडॉल', 'द किस', 'इटर्नल स्प्रिंग', 'प्रॉडिगल सन' यांचा विशेष उल्लेख करायला हवा. 'किस' मधली उत्कट हळुवारता, 'इटर्नल स्प्रिंग' मधला उन्माद हे अतिशय सुंदर रीतीनं व्यक्त होतं.

या भाव – भावनांबरोबरच रोदँच्या शिल्पातली कारागिरीही जाणवत राहते. शिल्पकलेच्या क्षेत्रात प्रवेश मिळणं रोदँला सुरुवातीला कठीण गेलं. दागिन्यांचं कोरीव कामसुद्धा त्यानं सुरुवातीला केलं. अनेक ठिकाणी वेगवेगळ्या माध्यमांतून कामं केल्यामुळं त्याचा हात कसबी कारागिरासारखा तयार झाला होता. रोदँचं वैशिष्ट्य या वेगळ्या मिश्रणात आहे. सुबक कारागिरी आणि त्यात ओतलेली भावनोत्कटता.

रोदँमधला कलाकार सतत वेगवेगळे प्रयत्न करत राहिला. फक्त चेहरा, फक्त हात, चेहरा आणि हाताशिवाय मानवी धड अशा सुट्या सुट्या अवयवांतून तो कल्पना मांडायचा प्रयत्न करत राहिला. त्यात यशस्वी झाला. 'वॉकिंग मॅन', 'कॅथेड्रल' यांची उदाहरणं यासाठी देता येईल.

शिल्पकृती तयार करण्यासाठी रोदँनं मांडलेली त्याची मानसिकता आणि त्याच्या काही प्रत्यक्ष कलाकृती यांच्यामध्ये एक घट्ट धागा आहे, जो या दोन्ही गोष्टींना बांधून ठेवतो. 'शॅडो', 'मेडिटेशन', 'द फॉलिंग मॅन' या आकृतींसाठी निवडलेल्या पोझेस, हात-पाय-खांदे-मान यांच्या वेगवेगळ्या ठेवणीतून हळूहळू त्या संपूर्ण आकृतीतच एक भाव निर्माण होतो आणि आधी आकार तयार करा, भावना त्याच्यामध्ये येते हे रोदँचं म्हणणं स्पष्ट होतं.



¤ मेडिटेशन ¤

सुमारे नव्वद शिल्पकृतींचं हे प्रदर्शन. प्रत्येक कलाकृतीचं वैशिष्ट्य वेगळं. कदाचित बघणाऱ्या प्रत्येकाला जाणवलेला 'मास्टरपीस' वेगळाच असेल.

टाटा थिएटरच्या कॉरिडॉरमध्ये हे प्रदर्शन लावलं होतं. बहुतेक शिल्पं त्रिमितीत आहेत. रोदँची सगळी शिल्पं अधिक मोकळ्या जागेत मांडायला हवी होती असं वाटलं. कारण बरीच शिल्पं अगदी भिंतीजवळ ठेवलेली असल्यामुळे सर्व बाजूंनी पाहता येत नव्हती. या किरकोळ गोष्टीमुळंसुद्धा शिल्पांचा आनंद घेण्यात मर्यादा येतेच.

रोदँचा मुक्काम मुंबईतून नुकताच हलला आहे; पण पुस्तकातच वाचलेला हा कलाकार आता अगदी जिवंत डोळ्यांसमोर आहे. □

निवेदन : शुभश्री माजगावकर
शब्दांकन : मेधा राजहंस

## मीरा मुखर्जींची

# व्यासंग प्रतिबिंबित करणारी कला

'आपल्या विश्वावर ताबा मिळवण्यासाठी कलाकारानं आपल्याला जखडून टाकणारी सर्व बंधनं फेकून दिली पाहिजेत. यासाठी अर्थातच अखंड प्रयत्न आणि प्रयोग करायला हवेत. या प्रयत्नांतूनच त्याची बंधनं एकामागोमाग एक गळून पडतील आणि अखेर त्या कलाकाराचा अंतरात्मा आणि बाहेरचं विशाल विश्व यामध्ये कसलाच आडपडदा रहाणार नाही. त्या वेळी विश्वाची विशाल निर्मितीही कलाकाराच्या निर्मितिक्षम मनाच्या काबूत येईल.'

प्रख्यात शिल्पकार मीरा मुखर्जींची कला-कलाकार यांच्याविषयी ही अशी धारणा आहे आणि त्यांच्या स्वतःच्या शिल्पांमधून ही अशीच बाह्य बंधनं गळत जाऊन विशाल विश्वाशी संवाद साधलेलाही दिसतो.

त्या म्हणतात, 'मी कलेकरता कला कधीच निर्माण केली नाही किंवा काही मिळवण्याच्या आशेनंही मी कधी कलानिर्मिती केली नाही. मी केलेल्या प्रत्येक कलाकृतीची सुरुवात ही एखाद्या ऊर्मीनं भावोर्मी किंवा विचारोर्मीनं झाली आहे. मात्र भावना किंवा विचार ही केवळ सुरुवात झाली. त्यांना मूर्त स्वरूप देण्यासाठी पुष्कळ शारीरिक आणि मानसिक प्रयास लागतात.'

१९६३ ते १९८३ या वीस वर्षांच्या कालावधीत मीरा मुखर्जींनी घडवलेल्या शिल्पांचा आढावा घेणारं एक वेचक प्रदर्शन 'अ रिट्रास्पेक्टिव' मुंबईत नुकतचं झालं, त्या निमित्तानं मीरा मुखर्जींच्या कलेबद्दलच्या विचारसरणीचा परिचय झाला आणि ही विचारसरणी त्यांच्या स्वतःच्या कलेत कशी उतरली आहे हेही पडताळून पहाता आलं.

मीरा मुखर्जींबद्दलची दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या जाणकार, विद्वान आणि व्यासंगी कलाकार आहेत. पाश्चिमात्य परंपरांपासून ते आपल्या पौर्वात्य मुळांपर्यंत, आदिवासी कलांपर्यंत सर्वांचा, त्यांच्या शैली आणि आशयाचा त्यांनी अभ्यास केला आहे. खेरीज त्या या काळातल्या विसाव्या शतकातल्या, कलकत्त्यासारख्या गजबजत्या महानगरात रहाणाऱ्या कलाकार आहेत आपण आणि आपली कला भारतीय आहेत, असंही त्या ठासून म्हणतात, 'मी अशा एका देशाची नागरिक आहे की, ज्याला स्वतःची भव्य परंपरा आहे. या वारशानं मला हजार प्रकारे घडवलं आहे आणि पाश्चिमात्य परंपरेत रहाणं, वाटणं, शिकणं या कशानंही माझं भारतीय परंपरेतलं हे मूळ उखडू शकत नाही.'

'आता प्रश्न आहे की, ही विद्वत्ता, व्यासंग, परंपरा, सामाजिक भान या साऱ्या गोष्टी त्यांच्या शिल्पात कशा प्रतिबिंबित होतात. कारण तशा त्या प्रतिबिंबित झाल्या तरच कलाकाराच्या व्यासंगाचा त्याच्या कलेला काही फायदा मिळाला असं म्हणता येईल. साहित्यामध्ये साहित्यिकाची मुळं साहित्यकृतीनही मूळ धरतात हे आपल्याला माहीत आहे. म्हणूनच दलित, पांढरपेशी, ग्रामीण, शहरी, प्रादेशिक, वैचारिक, स्वैर ललित असे प्रकार आपण लक्षात घेऊ शकतो. शिल्पकलेमध्ये शिल्पकाराचे विचार आणि मुख्यत्वे सामाजिक किंवा तत्त्वज्ञानीय विचार कसे मांडले जाऊ शकतात हे असंच बघण्यासारखं आहे.

खास भारतीय पार्श्वभूमी असणारी काही शिल्पं आहेत 'दे आर फ्री' 'ट्री' 'वन्स अपॉन अ टाइम' आणि 'लेटर रीडर' ही त्यातली काही उल्लेखनीय शिल्पं. 'दे आर फ्री' या शिल्पात एक आदिवासी आपलं धनुष्य ताणून उभा आहे. या संपूर्ण शिल्पामध्ये एक आत्यंतिक ताण आहे. सरळ ताठ उभा असलेला हा आदिवासी. त्याचं ताणलेलं धनुष्य. एक हात धनुष्याची प्रत्यंचा ताणणारा, तर एक बाण खेचणारा. पायही खंबीरपणे उभे. सरळ धारदार नाक. हा माणूस, जंगलचा राजा, मुक्त आहे, हे शीर्षकात सांगितलं नसलं तरी सहजच कळेल असा त्याचा एकूण रुबाब.

'ट्री' हे एक गोड आणि लडिवाळ शिल्प. पानं पान कोरून बनवलेलं झाड आणि त्याखालचा पार हे अतिशय भारतीय असणारं दृश्य आहे. या झाडांच्या फांद्या-फांद्यांवर पुष्कळ जागा आहे आणि त्या सर्व फांद्यांवरून मुलं बागडताहेत. खालीही बरीच मुलं निरनिराळ्या प्रकारे खेळताहेत. भारतीय गावांमधून संध्याकाळच्या सुमाराला हमखास दिसणाऱ्या या दृश्यावर हे शिल्प आधारित आहे आणि त्यातला भारतीयपणा ठळकपणे जाणवतो.

'वन्स अपॉन ए टाइम' आणि 'लेटररीडर' ही आकारानं अगदी लहान आणि तरीही ठसा उमटवणारी शिल्पं. 'वन्स अपॉन टाइम' मध्ये एक आजीबाई आपल्या नातवाला गोष्ट सांगते आहे. तिचा डोक्यावरचा पदर उचलून धरलेली तर्जनी आणि ऐकणाऱ्या मुलाच्या चेहऱ्यावरचे उत्सुक आश्चर्याचे भाव ओबड-धोबडपणातूनही जाणवतात. 'लेटर रीडर'मध्ये एक स्त्री मान अगदी वळवून आणि जवळजवळ लपवूनच आपल्या प्रियकराचं पत्र वाचते आहे. शिल्पांमध्ये सहसा न येणारे तपशील इथे आहेत. उदाहरणार्थ तिचे केस लांब आहेत. तिच्या बसण्याचा ढंग खास बायकी आहे आणि खाली मान करून वाचत असल्यामुळे तिच्या संपूर्ण देहाला सलज्जतेची डूब मिळाली आहे. पत्र वाचणारी ही स्त्री पत्र लिहिणाऱ्या शकुंतलेची आठवण करून देते.

भारतीयपणाचे हे बरेच मृदु आणि स्वप्नाळू पैलू झाले; पण भारतीयपण एवढ्यापुरतंच नाही. त्यामध्ये कष्ट, दारिद्र्य, गैरसोयी हेही सारं आहे. मीरा मुखर्जींसारखी वर्तमानकाळात जगणारी कलाकार त्याची जाण बाळगून आहे. वर्तमानकालीन विषय हाताळताना त्यांच्या शिल्पांमध्ये नवे विषय, जुनी शैली यांचं एक अजब रसायन आढळतं आणि त्यामुळं वर्तमानालादेखील ऐतिहासिक स्वरूप येतं. 'स्टेशन', 'क्यू', 'नाइट', 'बोट्समन', 'स्पिरिट ऑफ डेली वर्क', 'केबलपुलर्स' ही अशी वर्तमानकालीन शिल्पं आहेत. यापैकी 'केबल पुलर्स', 'स्टेशन' ही शिल्पं त्रिमितीतली नसून जवळजवळ त्रिमितीतलीच आहेत. ही शिल्पं

म्हणजे तबकड्यांवर कोरलेल्या ठसा उमटवलेल्या आकृती आहेत. आपल्या देवघरातले टाक असतात तशा. या विषयांना अशा द्विमितीत मांडणं हेही एक त्यांच्यावरचं भाष्यच आहे. मात्र 'केबल पुलर्स' शिल्पातले जाडजूड केबल खेचणारे कामगार या द्विमितीमुळे उंचीवर पोचल्यासारखे वाटतात. कालिया-मर्दन चित्रातल्या कालियासारखी ही केबल शिल्पभर अकटो–विकटो पसरली आहे आणि तिला ठिकठिकाणी पकडून कामगार खेचताहेत, अशा या शिल्पात सातत्यानं कष्टपूर्ण काम करत असलेले कामगार आणि या कामात वर्तमानात त्यांना दुसरं अस्तित्वच न उरणं हे अगदी ठळकपणे जाणवतं.

## नवे नवे पैलू

'स्पिरिट ऑफ डेली वर्क' हे असंच श्रमाची महती गाणारं शिल्प. त्यामधली सहा फूट उंचीची मुलगी ही कोणी तरी दैवी वाटते. तिच्या चेहऱ्यावर नाजूक कोवळिक आहे; पण हात–पाय, शरीर धिप्पाड आहेत, कंबरेवर ठेवलेल्या एका हातात ठामपणा आहे आणि दुसऱ्या हातातलं सूप एखाद्या खेळण्याच्या सहजतेनं धरलं आहे. मीरा मुखर्जी म्हणतात, 'कामगारांना त्यांच्या वाट्याची मान–मान्यता क्वचितच मिळते. मी त्यांना भल्या मोठ्या, प्रचंड कामावर झगडताना पाहिलं आहे. ते नेहमीच अनामिक, अप्रसिद्ध रहातात या अपराधी भावनेतून या शिल्पांचा जन्म झाला आहे.' 'बोट्समन' शिल्पातला नाखवा कमरेभोवती रुमाल आणि हातात वल्हं अशा थाटात उभा आहे आणि त्याच्या उभं रहाण्याचा ढंग इतका लवलवता आहे की वेरूळ–अजिंठ्याच्या क्लासिकल शिल्प–चित्रांची आणि त्यातल्या आकृतींच्या शैलींची आठवण यावी. श्रमाच्या प्रतिष्ठेचा हा मार्ग खास भारतीय वळणाचा.

'स्टेशन' ही शिल्पतबकडी केवळ द्विमितीमध्ये स्टेशन, रूळ, गाडी, स्टेशनवरची गर्दी, तिथे असलेल्या माणसांचे चाललेले विविध उपद्व्याप या साऱ्यांचं चित्रण करते, तर 'क्यू' या शिल्पामध्ये अत्यंत सर्वव्यापी शहरी दृश्याचं शिल्पीकरण आहे. 'क्यू' तली माणसं गोल करून उभी आहेत आणि त्यांच्या निरनिराळ्या पोजेस, आणि वाट पाहून चेहऱ्यावर आलेला भला मोठा कंटाळा मुखर्जींनी छान टिपला आहे. 'नाइट' हे असंच निरीक्षणातून आलेलं शिल्प. फुटपाथवर झोपलेल्या सात आकृती या शिल्पात आहेत. लहान-मोठ्या आकाराच्या, कसलेही सूक्ष्म तपशील नसणाऱ्या, ढोबळ आकाराच्या या आकृती एकाच पांघरुणानं आच्छादित आहेत आणि त्यातल्या सर्वांत छोट्या मुलानं झोपेतही आपल्या कुत्र्याच्या गळ्यात हात घातला आहे. या सर्व माणसांच्या मानापाय ज्या विविध प्रकारांनी ठेवलेले आहेत आणि त्यातून त्यांच्या शरीरांची जी ताणरहित अवस्था सुचवली गेली आहे ती उल्लेखनीय आहे.

आणखी एका संदर्भात मीरा मुखर्जी म्हणतात, 'कारागिरांचं विश्व म्हणजे केवळ सुव्यवस्थित, स्पष्ट असे आकार; पण कलाकारांच्या विश्वाला काही मर्यादाच नाही. सतत नवनवे अनुभवांचे पैलू त्याला सामोरे येत असतात आणि आपल्या कौशल्य आणि प्रयत्नांतून हे अनुभव चितारायचे असतात.' असे नवनवे अनुभव चितारणारी काही शिल्पं आणि शिल्पमालिका या प्रदर्शनात होत्या. 'मदर आणि चाइल्ड' या विषयावरची तीन शिल्पं उदाहरणादाखल दाखवता येतील. यापैकी एका शिल्पातली आई मुलांनी नुसती वेढून गेली आहे. एखाद्या वेलीसारखं तिचं शरीर वळलं आहे आणि फुलांसारखी सर्व बाजूंनी तिला मुलं बिलगली आहेत. ही म्हणजे अक्षरशः जिवतीच आहे. दुसऱ्या चित्रातल्या आईच्या हातात एकच मूल आहे. या आईचे हात लांब आणि बारीक आहेत. (एवढे बारीक हात मीरा मुखर्जींच्या शिल्पात बहुधा दुबळेपणा दाखवण्यासाठीच येतात.) तिच्या चेहऱ्यावर एक स्थितप्रज्ञ ओढलेपणा आहे निदान भरून आनंद तर नक्कीच नाही, तर तिसऱ्या चित्रातली आई मूर्तीसारखी मांडी घालून बसली आहे. तिचा चेहरा गंभीर आहे आणि मुलं या मूर्तीखाली आहेत. ही आई मुलांवर वचक ठेवते आहे किंवा त्यांना संपूर्ण पंखाखाली तरी घेते आहे. सरळ आहे एकाच आई–मूलसंबंधाचे हे सगळे पैलू आहेत.

भावना किंवा मूड व्यक्त करणाऱ्या काही चांगल्या शिल्पांमध्ये 'ब्लाइंड मेन' 'बहू' 'थिंकर' 'लोनलीनेस' या सगळ्यांचा उल्लेख करायला हवा. 'ब्लाइंड मेन' मध्ये दोन आंधळे चेहरे, त्यांचे निर्जीव डोळे. खरं म्हणजे कुठल्याच शिल्पात डोळ्यांचे तपशील स्पष्ट नाहीत. तरीही या चेहऱ्यांवर खास आलेले आंधळेपणाचे भाव, कुठे तरीच केलेली तोंडं, किंचित उघडे ओठ आणि आधारासाठी एक दुसऱ्याच्या खांद्यावर ठेवलेला हात हे सारं हृदयस्पर्शी आहे.' बहू ' देखील अस्सल भारतीय परंपरेतली. सरळ, कृश शरीर, बसण्याचा सावध ढंग. घुंगट असल्यासारखा पदर, गुडघ्यावर ठेवलेले हात आणि एकमेकांत गुंतवलेले पाय अशी ही 'बहू' आहे. 'थिंकर' आणि 'सिटिंग वुमन' या दोन्ही शिल्पातल्या स्त्रिया कसल्या तरी गहन गंभीर विचारात बुडून गेल्या आहेत. त्यांची लांब मान, गुडघ्यावर टेकलेली हनवटी, गुडघ्याला हातांनी घातलेली मिठी, केसांच्या लड्या आणि चेहऱ्यावरचे जीर्णशीर्ण, युगानुयुगे विचार करत असल्याचे भाव जाणवतात. 'लोनलीनेस' मध्ये दोन चेहरे आहेत. गंमत म्हणजे दोघे एका शिल्पात कोरले असूनही त्यांना एकटेपणा आहेच. त्यांचे चेहरे पसरट आहेत. त्यांच्यावर एकाच वेळी कटाळ्याचे, विझल्याचे भाव आहेत; पण ते वाट पहाताहेत असंही वाटतं. त्यांच्याकडे पाहून 'वेटिंग

मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र
हंसा वाडकर
सांगत्ये ऐका
चौथी आवृत्ती प्रसिद्ध झाली.
मूल्य : १४ रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

फॉर गोदो 'मधल्या एस्ट्रॅगॉन आणि व्लादिमीरची आठवण येते.

'स्टॉर्म' अँड स्टीलनेस' आणि 'स्टॉर्म' या दोन शिल्पांचा शैलीनं निराळी शिल्पं म्हणून उल्लेख करायला हवा. नावावरून समजतं त्याप्रमाणे या शिल्पात वादळानं उध्वस्त आणि अस्ताव्यस्त होणारं जनजीवन आणि निसर्ग-जीवन दाखवलं आहे. धातूमध्ये वाऱ्याचा आणि पावसाचा असा प्रवाहीपणा दाखवणं ही अपूर्वाईची गोष्ट म्हणायला हवी.

'टॉइलर्स इन द रिवर ऑफ लाइफ' मधली नदी म्हणजे पृथ्वीचा गोल आहे आणि त्यातली सर्वांत मध्यवर्ती आकृती क्रूसावर चढवल्यासारखी दिसते. 'ही हू सॉ' मधली उंच आकृती आकाशाकडे डोळे लावून आहे. त्याचे डोळे अर्धोन्मीलित आहेत. हनुवटी वर वळलेली आहे आणि काही दैवी साक्षात्कारानं तो भारून गेल्याचं स्पष्ट दिसतं.

प्रदर्शनात ठळकपणे लक्ष वेधून घेणारे दोन भव्य पुतळे आहेत. एक स्त्रीचा, एक पुरुषाचा दणकट, जंगी आणि सुमारे बारा फूट उंचीचे त्यांचे हात डोक्यावर काही धरल्याच्या आविर्भावात आहेत. स्नायू पीळदार आहेत. या शिल्पाचं नाव आहे 'अर्थ कॅरियर्स' मानवी जातीचं हे असं उदात्तीकरण आणि त्यांच्याबद्दल असणाऱ्या अशा विधायक भावना हे मीरा मुखर्जींच्या एकूणच विचाराचं मध्यवर्ती सूत्र आहे आणि ते एवढ्या भव्यपणे मांडलं जाण्यात, या सूत्राचा आविष्कार तर आहेच; पण माणसामधली उदात्तताही ठळकपणे स्पष्ट झाली आहे. या संदर्भात त्या म्हणतात, 'बस्तरच्या आदिवासी कारागिरांमध्ये राहून शिकताना मी पाहिलं की देव-देवतांच्या मूर्ती बनवण्यात त्यांची तन्मयता आणि प्रयत्न असे होते की, त्यामुळे त्या मूर्ती आदरणीय, पूजाविषय बनत. त्यावरून मला वाटलं की, आम्ही आधुनिक कलाकारदेखील देवादिकांच्या नव्हेत, तर माणसाच्या, अर्थली आकृती घडवताना अशी तंत्रं वापरू शकतो की, त्यातूनही असा आत्मिक आणि आध्यात्मिक साक्षात्कार होऊ शकेल.'

— ललिता बर्वे

ह्या ना त्या निमित्तानें....

# आंबेडकरांचे उपकार

फिरोझ रानडे

आजकाल सर्वसाधारण मध्यम-वर्गाचा रविवारचा कार्यक्रम साचेबंद झाला आहे नाही? सकाळी नऊ वाजण्याआधी सारे घाईघाईने आटपावयाचे, जे काही आटपले नसेल ते तसेच सोडावयाचे व दूद समोर 'कुंई...' सुरू होण्याआधी खुर्च्या-चारपाईवर जागा धरून बसावयाचे.

प्रतिभा आणि प्रतिमा हा मोठा दर्जेदार कार्यक्रम दूद आता किती तरी वर्षं देत आहे. त्यातल्या त्यात अशोक रानड्यांसारखे पट्टीचे मुलाखत घेणारे असतील तर कार्यक्रमात जो काही रंग भरतो तो आगळाच.

प्र आणि प्र झाले की साप्ताहिकी असते, मग कधी गजरा असतो. तो संपेपर्यंत जेवणाची वेळ होते. जेवून व थोडे लवंडून चहापाणी होईपर्यंत राष्ट्रीय सिनेमाची वेळ होतेच. म्हणजे गेलाच की सगळा रविवार!

आता प्र आणि प्र-चे सगळेच कार्यक्रम काही आपल्या आवडीच्या विषयावरचे नसतात व ते चुकले तरी काही बिघडत नसते; पण आजचा कार्यक्रम नक्कीच पहावयाचा हे श्यामने मागल्या रविवारी साप्ताहिकी पहातानाच ठरवले होते.

आजचा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर होता. तीन-चार दलित कवी-लेखकमंडळी त्यांच्या कार्याबाबत बोलणार होती. त्यातल्या बाकी मंडळीबाबत श्यामला माहिती नव्हती; पण त्यांच्या ओळखीचे दया पवार होते. पवार हे मोठ्या समतोल वृत्तीचे, जबाबदारीने व जाणिवेने वागणारे-बोलणारे गृहस्थ आहेत. त्यांच्यासारखे पुढारी जर समाजाला मिळाले तर फार चांगले असे श्यामचे मत होते.

योग्य वेळी कार्यक्रम सुरू झाला. प्र आणि प्र च्या वा इतर मुलाखतींना एक तऱ्हेचा बोजडपणा येतो व ते काम संयोजकमंडळी 'प्रश्न' विचारून करत असतात. काही इकडचे-तिकडचे बोलावयाचे व त्यातल्या एखाद्याला आपला तडक प्रश्न विचारावयाचा.

आजचाही कार्यक्रम त्याच धर्तीवर सुरू झाला. डॉ. आंबेडकरांच्या कार्याची महती सांगून संचालकांनी त्यातल्या एका कवयित्रीला 'तुमच्या लहानपणी तुमच्यावर अन्याय झाला असेल, काही वाईट वागणूक मिळाली असेल त्यातली एखादी आठवण सांगता का?' म्हणून विचारले. त्या आपले अनुभव सांगू लागल्या.

श्याम अगदी 'स्थ' ब्राह्मण असूनही त्याला लहानपणीच ह्या जातीय उच्च-नीचतेचा झटका बसला होता. आता ह्या दलितांना सहन करावयाला लागलेल्या व लागणाऱ्या अपमानांच्या मानाने तो काहीच नव्हता; पण अपमान व तोही जातीवरून होणारा अपमान हा काय कमी-जास्त असा तोलता येतो? आज तीस-पस्तीस वर्षं झाली तरी तो प्रसंग श्यामच्या मनात घर करून आहे.

श्याम त्या वेळी काही तरी चौदा-पंधरा वर्षांचा होता. अभ्यासाला म्हणून तो, एक काची म्हणजे द्राक्षे विकणाऱ्याचा मुलगा व एक लिंगायत असे जमत. लिंगायत मोठ्या श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा होता. त्यांचा मोठा ऐसपैस वाडा होता. हे त्रिकूट अभ्यासाकरता त्या वाड्यावरच जमावयाचे.

एक दिवस काही सण होता म्हणून त्या वाड्यावर जेवणाचा प्रसंग आला. त्या तीन लिंगायत भावांची पाने एका ओळीत तर श्यामचे व त्या काची मुलाचे पान काटकोन करून मांडले होते. श्यामला त्याचे नवल वाटले. काची मुलाचे पान काटकोनात मांडणे तो समजू शकत होता; पण आपल्यासारख्या ब्राह्मणाचे पण?

'माझ्या आईला आवडणार नाही ते.' तो लिंगायत मुलगा श्यामच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून म्हणाला, 'ती जुन्या विचारांची आहे. आम्ही लिंगायत म्हणजे ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ...' श्याम काय समजायचे ते समजला.

तो साधा प्रसंग जर श्याम विसरला नाही तर इतके अन्याय व तेही सर्व क्षेत्रांत झालेले

असता हे दलित ते कसे विसरतील ? व त्यांच्यात कडवटपणा आला तर ते साहजिकच नाही का ?

डॉ. आंबेडकरांच्या दलितांबद्दलच्या केलेल्या कार्याबद्दल गुणगान चालू होते. आपण शहरांतल्या दलितांकरता काही तरी करू शकलो; पण खेड्यातल्या दलितांकरता काहीही करू शकलो नाही ह्या विचाराने डॉक्टरसाहेब अक्षरश: रडले होते म्हणे !

डॉक्टरसाहेबांनी दलित समाजाकरता अमुक केले, तमुक केले म्हणून चर्चा होते, त्यांचे गुणगान गायले जाते, ते साहजिकच व योग्यच आहे; पण त्यांनी सगळ्या हिंदू समाजाकरता जे केले त्याबद्दल कसे कोणी काही बोलत नाही !

नाशिकच्या काळा राममंदिराच्या व पुण्याच्या पर्वतीच्या सत्याग्रहाची कडवट चव अजुनी बाबासाहेबांच्या वा दलित समाजाच्या तोंडातून गेली नव्हती. त्या सर्व प्रकरणात सुशिक्षित म्हणवणारी सवर्ण माणसे अगदी काळीकुट्ट वागली होती. त्या सत्याग्रहाला सोटाग्रह म्हणून व सत्याग्रह्यांवर दगडा-चपला-बुटांचा मारा करून त्यांची मानहानी तर केलीच होती; पण त्यात काही दलित प्राणालाही मुकले होते.

मुसलमानांनी वेगळे मतदारसंघ मागितले व ब्रिटिश सरकारने ते दिले. त्याच वेळी पाकिस्तानची बीजे पेरली गेली. त्याचप्रमाणे नव्या घटनेप्रमाणे दलितांना स्वतंत्र मतदार-संघ मिळणार होते. ब्रिटिशांच्या ' फोडा व झोडा ' ह्या नीतीला अनुसरूनच हे होत होते.

महात्मा गांधींनी दलितांना वेगळे मतदार-संघ मिळू नयेत म्हणून आपले प्राण पणाला लावले. ह्या विभक्त मतदारसंघाची योजना रद्द व्हावी म्हणून त्यांनी प्राणांतिक उपोषण सुरू केले. शेवटी गांधी आंबेडकरांत पुणे-करार झाला व ती विभक्त मतदारसंघाची योजना रद्द झाली.

ह्यात गांधींचा मोठेपणा दिसतो, त्यापेक्षा डॉक्टरसाहेबांचा जास्त दिसतो. त्यांनी जर तडजोड नाकारली असती तर गांधींचे प्राण कदाचित् गेले असते; पण आंबेडकरांनी फक्त गांधींचे प्राण वाचविले नाहीत तर हिंदू समाज वाचवला. सवर्ण हिंदूंत व दलितात जी दरी पडली असती तिने हिंदुसमाज कायमचा दुभंगला असता ! मुसलमानांमुळे फक्त हिंदुस्थानची छकले झाली. आंबेडकर अडून बसले असते तर हिंदू समाजाची छकले झाली असती. डॉक्टरसाहेबांचे हिंदू समाजावर हे मोठे उपकार नाहीत का ?

सवर्ण हिंदू जर आपले न्याय्य अधिकार मान्य करत नसतील तर आपण मुसलमान का होऊ नये असा विचार काही दलितांच्या मनात येऊ लागले होते. जळगावच्या काही दलितांनी सवर्ण हिंदूंना तशा नोटिसाही दिल्या होत्या.

कारण त्यांना माहीत होते की, दलितांवर अन्याय करणारा सवर्ण हिंदू समाज मुसल-मानांपुढे अगदी गोगलगाय होतो. त्यांच्या मनात मुस्लिमांबद्दल ऐतिहासिक कालापासून एक दहशत आहे, भीती आहे.

हरिजनांना देवळात न येऊ देणारे सवर्ण हिंदू देवळांची मशिद झाली तरी शांत रहा-तात आणि हे काही औरंगजेबाच्या राज्यात नाही, तर अगदी व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीत ! हे त्यांनी पाहिले होते. तेव्हा सवर्ण हिंदूंना धडा द्यावयाचा असेल तर तो आपण मुसलमान होऊनच द्यावयाचा असे क्रोधित दलितांच्या मनात येणे सहाजिक होते.

दलित अशा तऱ्हेचा विचार करताहेत हे मुस्लिम नेत्यांना कळताच त्यांनी आंबेड-करांचे लांगूल चालन सुरू केले. त्यांना पैशाचे, सत्तेचे, सगळ्या मुस्लिम समाजाच्या पुढारी-पणाचे आमिष दाखवले गेले.

भालाकार भोपटकरांनी म्हटले की, ' खुशाल व्हा मुसलमान, सहा कोटी अस्पृश्य मुसलमान झाले तरी काही बिघडत नाही. ' ही हिंदू नेत्यांची दूर-दृष्टी व हिंदू ऐक्याची तळमळ !

पण डॉ. आंबेडकरांनी देवळाच्या सत्या-ग्रहाचा वा भालाकारांसारख्यांच्या बोलण्याचा काही राग धरला नाही. त्यांना नवा धर्म स्वीकारायचा होता. तो सवर्ण हिंदूंना धडा शिकवण्याकरता म्हणून नव्हता. कोणत्याही आमिषाचा लोभ त्यांना नव्हता.

धर्मांतर हे त्यांनी निर्वाणीचे शस्त्र कधीच मानले नाही. उलट अस्पृश्यांच्या मानसिक उद्धाराचा तो एक आविष्कार मानला होता. मानसिक आविष्कार मुस्लिम धर्मात होणार नाही हे त्यांना पटताच कोणताही कडवटपणा वा सूडाची भावना न ठेवता त्यांनी तो विचार सोडून दिला.

जर डॉक्टरसाहेब त्या वेळी मुसलमान झाले असते तर भारताच्या इतिहासाला वेगळे वळण लागले असते व ते फार चांगले वळण नसते हे आताच्या अनुभवावरून स्पष्ट दिसतेच आहे.

पुढे डॉक्टरसाहेब व त्यांचे काही अनुयायी बुद्ध झाले; पण त्यामुळे समाजात कडवटपणा आला नाही. मतभेद झाले; पण वैर निर्माण झाले नाही.

प्र आणि प्र आता जवळजवळ संपत आला होता. कवयित्री सांगत होती, ' सवर्ण हिंदूंचा नेहमी काही वाईट अनुभव येतो असे नाही. ' कोणा सवर्ण प्राध्यापकांनी तिच्या शिक्षणात तिला कशी मदत केली हे तिने पुढे सांगितले.

हिंदूधर्म सोडल्यावरसुद्धा ह्या दोन धर्मांच्या लोकांत प्रेमाचे, सलोख्याचे संबंध राहिले आहेत व वाढताहेत. ह्याचे सगळे श्रेय डॉक्टरसाहेबांनाच नको का द्यायला ? □


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच ' उत्तम ' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे. **–प्र. भा. भोसले**

संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

**ले. विजय परुळकर**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**मूल्य : ३६ रुपये**

विश्वहिंदू परिषद, पाडळणं

# वसतिगृह हे विकासकेंद्र व्हावे

अकोले सोडलं आणि राजरस्ता सुटला. गाडी आत वळली. वेड्यावाकड्या वळणांचा, खाच-खळग्यांचा, डोंगराच्या कपारीतून जाणारा धुळभरला कच्चा रस्ता चाकोरी आहे म्हणून रस्ता म्हणायचं. आजूबाजूचा परिसर रुक्ष. मधेमधे दिसणारी बाभळीची झाडं, त्याशिवाय झुडुप नाही. रस्ता माहीत नव्हता त्यामुळे अधेमधे फुटणाऱ्या फाटयांवर चुकायला नको म्हणून रस्त्यात दहा वेळा थांबून विचारत विचारत आम्ही पाडळण्यात येऊन उतरलो.

राजूर, कोतूळ, हरिश्चंद्रगड, कोथळं, भंडारदरा, बारी, रतनवाडी, रतनगड, घाटघर, अेकदरा असा सगळा अकोले तालुक्याच्या अंतर्भागातला परिसर यापूर्वी बऱ्याच वेळा तुडवलेला. हा सगळाच परिसर हिरवागार, गर्द झाडी-झुडुपांचा, छान कौलारू घरांचा आहे. त्यामुळं अकोल्यापासून आत असलेला पाडळण्याचा परिसरही तसाच असेल अशी कल्पना; पण दिसणारं चित्र वेगळंच होतं.

चाळीस घरांचं हे गाव, पानं झडलेली चार-दोन झाडं. झाडाभोवतीचा उखडलेला पार– भगभगीतपणा भरून राहिलेला !

पाडळण्याला मुद्दाम जायचं एक कारण होतं.

गेल्या चार वर्षांपासून इथल्या परिसरातील आदिवासी मुलांसाठी ' विश्व हिंदू परिषदेनं ' एक वसतिगृह चालवलंय. या वर्षापासून मैलावरच्या बगाडवाडीत एक बालवाडी सुरू केलीय. हे सगळं एकदा बघायचं होतं.

गाडीतून उतरलो तर समोर पंधरा-सोळा मुलं दोन हात जोडून एका सुरात 'नमस्कार' म्हणत उभी. कौलारू छपराची एक खोली– दारावर बोर्ड ' विश्व हिंदू परिषद संचलित ' श्रीज्ञानेश्वर वसतिगृह ! पाडळणे. शेजारच्या दुसऱ्या दारावर ' ग्रामपंचायत कार्यालय, पाडळणे'चा बोर्ड टांगलेला.

आम्हाला ग्रामपंचायत-कार्यालयात बसवलं. नुकतंच सारवलेलं असावं. बसायला टाकलेल्या सतरंज्या ओलसर झालेल्या. जाणवणारा शेणाचा वास. मघाशी एका सुरात नमस्कार करणाऱ्या मुलांनी स्टीलच्या ग्लासातून थंडगार पाणी दिलं. वसतिगृहाच्या व्यवस्थापकांनी अेकाला चहा आणायला पिटाळलं आणि बाकीच्यांना आमच्यासमोर बसवलं. ' विश्व हिंदू परिषदेचे ' आमच्याबरोबर आलेले जिल्हासेक्रेटरी लाहोटीसरांनी आमचा परिचय सांगितला. मग मुलांची ओळख-परेड.

पहिली ते सातवीपर्यंतची ही मुलं–एकेक जण उभा रहायचा.

हात बांधलेले– ' माझं संपूर्ण नाव– इयत्ता–मुक्काम–पोस्ट–जिल्हा सांगायचा, खाली बसायचा. मुलं चांगलीच धीट होती.

साडेबाराशे वस्ती असलेल्या या गावात सातवीपर्यंत शाळा आहे. शाळेच्या पटावर अडीचशेपर्यंत विद्यार्थी आहेत पूर्वी हे वसतिगृह दुसऱ्या एका संस्थेच्या वतीनं चालायचं. दादासाहेब रूपवते वगैरे बडी मंडळी असलेल्या त्या संस्थेला हे वसतिगृह काही नीट चालविता येईना. या मंडळींनी जिल्हा परिषदेकडून वसतिगृहाच्या इमारतीची योजना तयार करून वीस हजार रुपये मंजूर करून घेतले होते. त्यातले दहा हजार उचललेही. कामाला सुरुवात केली. ते अर्धवट बांधकाम आज तसंच पडून आहे. उचललेल्या दहा हजारांचा हिशोब नाही. संस्थेनं तर वसतिगृह चालविणंही बंद केलेलं. दोन-तीन वर्षं अशीच बंद अवस्थेत गेली.

आणीबाणीनंतर एकूणच संघपरिवारात ' शाखा अेके शाखा ' आणि ' नित्यनैमित्तिक कार्यक्रम ' याच्याशिवाय काही तरी सेवाप्रकल्प राबवून आपली विधायक आणि रचनात्मक प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झालेला होता. आणीबाणीनंतरच्या ' कौतुकाचा ' तो काळ– कार्यकर्तेही उत्साहात होते. ' काय करू आणि काय नको ' अशा मनःस्थितीत होते. नगरजिल्ह्यात एकूणच संघपरिवाराचं काम तसं फारच कमी. परिवाराच्या वेगवेगळया संघटना, समित्या असल्या तरी सगळीकडे वावरणारे, आढळणारे चेहरे मात्र तेच. त्यामुळं कामाच्या वाढीच्या दृष्टीनं आणि विधायक, रचनात्मक वगैरे कार्य हाती घ्यायचं म्हणून ह्या वसतिगृहाचं चालकत्व ' विश्व हिंदू परिषदे 'नं स्वीकारलं.

पूर्वीच्या वसतिगृहाला जिल्हा परिषदेचं अनुदान मिळायचं. त्यामुळं वसतिगृह चालवणं म्हणजे फक्त दैनंदिन व्यवस्था बघणं अेवढंच काम असायचं. विश्व हिंदू परिषदेनं चालकत्व स्वीकारल्यापासून प्रयत्न करूनही अजून अनुदान मिळत नाही. वसतिगृहासाठी मंजूर केलेल्या वीस हजारांपैकी उरलेले दहा हजार घेऊन नवीन योजना देऊन ती इमारत उभी करायला विश्व हिंदू परिषद तयार आहे; पण पूर्वीची दिलेली दहा हजार रुपयांची रक्कम मिळाली म्हणून मान्य करावी अशी जिल्हा परिषदेची अट आहे; पण पैसे आपल्याला मिळालेच नाहीत आणि ज्याचा हिशोबही माहीत नाही, ती रक्कम मिळाली असं नवीन व्यवस्थापन कसं मान्य करणार ? त्यामुळं अर्धवट झालेलं बांधकाम नेहमीच्या शासकीय घोळात अडकून पडलंय. हळूहळू तिथल्या दगडांचा उपयोग गावातील लोकांची घरं उभारायला होतोय.

पहिली ते सातवी दरम्यानची सतरा मुलं या वसतिगृहात आहेत. ठाकर, महादेव कोळी आणि इतर आदिवासी समाजातील विद्यार्थी यात आहेत. मुलांचा सर्व खर्च वसतिगृहाचा. या वसतिगृहाचं वर्षाचं बजेट बारा–पंधरा हजारांचं. या वर्षाच्या ' बेंगमीसाठी ' विश्व हिंदू परिषदेला ' भिक्षां देही ' शिवाय पर्याय नाही !

सकाळी चार ही दिवस सुरू होण्याची वेळ दिवस संपतो रात्री साडेदहा वाजता. सकाळी उठल्यापासून प्रार्थना, व्यायाम, शाळा, जेवण पुन्हा दुपारी शाळा, संध्याकाळी खेळ वगैरे, जेवण, अभ्यास प्रार्थना आणि झोप मग दिवस संपतो. वसतिगृहातील कामाची

विभागणी केलेली–तीन मुलांच्या ग्रुपवर पाणी भरण्याची आणि वाढपव्यवस्था सोपवलेली. स्वावलंबी शिक्षणाचा संस्कार प्रत्यक्ष आचारातून दिलेला. शिस्तीचे नियमही काटेकोर. आलेली मुलं अशा समाजातून आणि घरातून आलेली आहेत की,व्यवस्थितपणा आणि स्वच्छता शिकवणं हे व्यवस्थापकाचं स्वतंत्र काम होऊन बसतं.

या वसतिगृहासाठी किती तरी संस्था आणि व्यक्तींकडून विश्व हिंदू परिषदेनं मदत गोळा केलेली. ताट-वाटया-ग्लास, मुलांसाठी अंथरूण–पांघरूण, चपला, कपडे, वसतिगृहासाठी कपाट, टेबल, खुर्च्या, तबला–पेटी असं किती तरी !

नारायण भुते नावाचा जामखेडचा पदवीधर तरुण याची व्यवस्था बघता. हिंदी विषय घेऊन पदवीधर झाल्यावर त्यानं बी. अेड. केलं. कविता करण्याचा आणि गायनाचा छंद. पदवीधर झाल्यावर नोकरीचे प्रयत्न केले. फारसा उपयोग झाला नाही. का परिचितामुळं या वसतिगृहाविषयी समजलं. सहज बघायला म्हणून आला. पूर्वीचा व्यवस्थापक त्याच्या काही अडचणींमुळं जाणार होताच. त्याची जागा यानं घेतली. लग्न झालेल्या भुते यांना एक मुलगी आहे कुटुंब जामखेडलाच असतं. त्यांना या कामाविषयी विचारलं, ' इथं काम करण्यात आनंद आहे ' एवढंच म्हणाले.

जेवणाला थोडा वेळ होता. त्यामुळं मैलावरच्या बगाडवाडीकडं निघालो. बरोबर पाडळण्याचा ग्रामसेवक होता.

प्रवरानगरजवळच्या कोल्हारचा हा पंचवीशीतला तरुण पोरगा चांगलाच बोलका होता. नेमणूक झाल्यावर तो इकडं यायला तयारच नव्हता. एक महिना कामावर हजरही झाला नाही; पण प्रयत्न करूनही नेमणूकीचं ठिकाण बदलत नाही हे लक्षात आल्यावर नाइलाजानं पाडळण्यात आपल्या नोकरीवर रुजू झाला. ग्रामविकासाच्या सरकारी योजना राबविणं हे याचं काम.

परिसर आदिवासी, त्यामुळं प्रत्येक योजनेसाठी शासनाचं १००% अनुदान असतं. या ग्रामसेवकानं आपल्या दोन वर्षांच्या काळात एक नळयोजना कार्यान्वित केलीये. व्यवस्था पूर्ण आहे. फक्त पाणी बाहेर पडणं बाकी आहे. कार्यक्षेत्रातील घोलद गावी एक शाळा उभारलीये. काम पूर्ण झालंय. उद्‌घाटनासाठी वापर खोळंबलाय.

दोन वर्षं या भागात घालवली त्यामुळं त्याचा इथल्या लोकांशी चांगला संपर्क आलाय; पण त्यांच्याबद्दल तो फारसं चांगलं बोलला नाही. कोणत्याही योजनेस लोकांचा प्रतिसाद फारच कमी. मग सहभागाची गोष्टच सोडा. साधी विजेची योजना फक्त पन्नास रुपये भरले तर वीज घरात येते. उरलेल्या खर्चासाठी सरकारी अनुदान आहे; पण लोकांचा प्रतिसाद शून्य ! हे भरावे लागणारे पन्नास रुपयेसुद्धा द्यावे लागू नयेत अशी प्रवृत्ती. इथले आदिवासी गरीब जरूर आहेत पण एवढा मदतीचा हात पुढे असताना लोकांच्या अशा प्रवृत्तीमुळं योजना राबवणं अवघड होऊन बसतं.

एस. एस्. सी. झालेल्या, खेडयातून आलेल्या आणि शासकीय चाकोरीत काम करावं लागणाऱ्या त्या ग्रामसेवकाकडून प्रयत्नांची यापेक्षा जास्त काय अपेक्षा करणार ? खेडयातून आलेला असूनही त्याला इथं करमत नाही. सुट्टीच्या दिवशी घरी. त्याला लग्नाबद्दल छेडलं. थोडासा लाजलाच. म्हणाला ' लग्न करून बायकोला इथं आणू ? बदलीशिवाय लग्न नाही !' बगाडवाडीच्या रस्त्यावर येता-जाता एवढा विषय पुरला.

चार–सहा झापांची बगाडवाडी. आजूबाजूला नजरेच्या टप्प्यात अजून चार–सहा झाप. इथल्या एका झापात बालवाडी भरते. सहा वर्षांच्या आतल्या वीस-पंचवीस मुलांची हजेरी. सकाळी साडेसात ते साडेदहा ही वेळ. ही वेळ सूर्यावर बेतलेली. उजळणी,बाराखडी, गाणी हा इथला अभ्यासक्रम. आम्ही गेल्यावर रविवारची सुट्टी असूनही सगळी मुलं जमलेली. आम्हाला सगळ्यांनी एका सुरात, ' ये रे ये रे पावसा ' म्हणून दाखवलं. बालवाडी चालविणारी इथलीच एक स्त्री-चौथीपर्यंत शिक्षण झालेलं तिला बालवाडीविषयी, दैनंदिन कार्यक्रमाविषयी, तिच्या एकंदर अनुभवाविषयी बोलतं करण्याचा बरोबरच्या सगळ्यांनीच प्रयत्न केला–पण तिची सगळी उत्तरं मानेनंच मिळाली. खरं तर ती येऊन बसली हेच खूप झाल. ' विश्व हिंदू परिषद ' तिला महिन्याला पन्नास रुपये मानधन देते.
¤

पुन्हा ग्रामपंचायत कार्यालयात येऊन बसलो तर जवळच्या वसतीवरचा एक गृहस्थ आमची वाट बघत थांबलेला. त्याच्याकडे ' टिळयाचा ' कार्यक्रम होता. आम्ही सगळ्यांनी त्याच्याकडं जेवायला चलावं असा त्याचा आग्रह होता. वसतिगृहातही आमच्यासाठी जेवण तयार होतं; पण त्याची समजूत पटेना. सगळी मंडळी थांबलियेत म्हणाला. शेवटी निघालो.

वस्ती जवळच होती. दारापुढं भला मोठा मांडव. पाच–सातशे लोक जमलेले. आमच्यासाठी वसतिगृहातून आणलेल्या चादरी अंथरल्या. एक जण बादली भरून लिंबाचं सरबत घेऊन आला आणि आम्हा प्रत्येकाला आग्रहानं तीन–चार ग्लास प्यायला लावलं. नंतर जेवणाचा कार्यक्रम–जिलबी, बुंदी, मसालेभात–असला जंगी बेत. चौकशी केली तेव्हा समजलं आचारी खास ' शहरी गावाहून ' मागवला होता.

आदिवासी परिसरातील गरीब घरचा (?) हा कार्यक्रम !

याचाही मुलगा या मोफत व्यवस्था असलेल्या वसतिगृहात रहायला होता !
¤

सकाळपासून बाहेरगावी गेलेले पाडळण्याचे सरपंच आम्ही पुन्हा परतेपर्यंत आलेले होते. खादीचा लांबुडका डगला. केस छान चापून-चोपून उलटे फिरवलेले. एकमेव कर्ते आहोत असा चेहऱ्यावरचा भाव.

त्यांनी वसतिगृहापुढच्या अडचणींचा पाढा वाचला. दर महिन्याच्या बेगमीची रक्कम वेळेवर पाठवीत जा म्हणाले. वसतिगृहाच्या कामात गावाचा वाटा किती विचारल्यावर गप्प झाले. व्यवस्थापकांकडं बघितलं. त्यांनी गेल्या वर्षी दोन पोती तांदूळ दिल्याचं सांगितलं.

या सरपंचाचा मुलगाही वसतिगृहातच रहातो. मुलांच्या पालकांना आणि इतर गावकऱ्यांना बोलावलं होतं; पण चार–सहाजण सोडले तर फारसं कुणी फिरकलं नाही. त्यांच्या लेखी आपल्या पोरांना शिकवणाऱ्या वसतिगृहाच्या चालकांना भेटणं फारसं महत्त्वाचं नसावं. वसतिगृहातील एक मुलगा पुन्हा पळून घरी गेला तेव्हा त्याच्या पालकांना भेटलेल्या व्यवस्थापकांना, पालकांनी, त्याच्याऐवजी दुसरा मुलगा देऊ केला. त्यांच्या दृष्टीनं 'नगाला नग' पुरविण्या-

इतकंच त्यांचं कर्तव्य असावं !

मीटिंगला बोलावल्यावर त्याला प्रतिसाद न देणारे पालक, महिन्याची तरतूद वेळेवर करत जा म्हणून सांगणारे सरपंच, पाच–सातशे लोकांना 'टिळ्यासाठी' पक्वन्नांचं जेवण देऊ शकणारा तरीही मुलाची सोय या मोफत वसतिगृहात लावणारा पालक, '.नगाला नग' पुरविणारा पालक, सहकार्य तर दूरच राहिलं; पण ग्रामपंचायत शेजारच्या जागेत वसतिगृह चालतं म्हणून ग्रामपंचायतीतही न फिरकणारे आणि त्यांच्या मुलांसाठी चालू असूनसुद्धा, काय त्यांच्या नादी लागता असं सरपंचांना सांगणारे इथले आमदार, आदिवासी कल्याणाच्या प्रकल्पाचं अनुदान अडविणारी जिल्हापरिषदेतली लोकसेवक मंडळी अशा सगळ्या वस्तुस्थितीत वर्षाकाठी बारा–पंधरा हजार खर्च करून फक्त इथली आदिवासी मुलंच साक्षर करायची असतील तर त्यासाठी 'विश्व हिंदू परिषद' कशाला हवी ? जिल्हा परिषदेनं अनुदान दिलेल्या आश्रमशाळा आणि वसतिगृहं आहेतच की !

केवळ एक विधायक प्रकल्प राबवतो या समाधानासाठी असला खटाटोप करण्यात काय हशील आहे ?

चार वर्षं झाली वसतिगृह चालू आहे. बाहेरून माणसं येऊन ते चालवतात. तेव्हा आपलीही काही जबाबदारी आहे. असं इथल्या लोकांना वाटलं तरी खूप आहे. त्या वाटण्यातूनच लोक उभे राहतील वसतिगृहाच्या निमित्तानं पाय रोवून उभ्या राहिलेल्या 'विश्व हिंदू परिषदे' कडून केवळ वसतिगृहाच्या व्यवस्थापनाची अपेक्षा करायची ? आवश्यकता आहे लोकांना जागवण्याची, जाण निर्माण करण्याची. हे वसतिगृह आजूबाजूच्या परिसरातील विकास कार्यक्रमाचं आणि रचनात्मक आर्थिक, सामाजिक चळवळीचं केन्द्र व्हावं–आज आवश्यकता त्याची आहे तिथला व्यवस्थापक ही अशी दृष्टी असणारा हवा. इथली माणसं 'खाटल्यावर देणाऱ्या हरीचीच' वाट बघत बसणार असतील तर हा खटाटोप व्यर्थ आहे. तशी जाण निर्माण व्हायला हवी. त्यातून कामातला त्यांचा सहभाग वाढेल,

मग १००% अनुदान असलेल्या शासकीय योजना राबविणेही सहज शक्य होणार आहे,

पण काही तरी गल्लत होते आहे–कार्यकर्त्यांची सगळी शक्ती वसतिगृहाच्या वर्षभराच्या 'बेगमी' साठीच खर्च होतेय. साधनालाच साध्य मानून बसलेत त्यामुळं असं होतंय.

आणि अशाच पद्धतीनं जर 'परिषदे'ची सगळीच वसतिगृहं चालत असतील तर मात्र फेरविचार आवश्यक आहे. नाही तर 'अहवालापुरते प्रकल्प' असेच त्याचे स्वरूप राहील.

आजचं चित्र तर असंच आहे–

–विनय गुणे

---

मुक्काम पारनेर

# वस्ती

## विजय मिळविणाऱ्यांची की दूर जाणाऱ्यांची ?

दुष्काळासंबंधी वर्तमानपत्रांतून विविध बातम्या म. फुले कृषिविद्यापीठातील ग्रंथालयात मी गेले अनेक दिवस वाचत होतो. पिण्याच्या पाण्याची गावोगाव होत असलेली टंचाई, अपुरे टँकर, गुरांसाठी चाऱ्याचा प्रश्न, रोजगार हमी योजनेच्या कामासाठी तरतुदी, मुख्यमंत्र्यांचा दुष्काळी भागाचा दौरा–अशा एक ना दोन अनेक बातम्यांनी मन अस्वस्थ होत होते. किमान राहुरीजवळच्या एखाद्या दुष्काळी तालुक्यात जाऊन यावे, तेथील दुष्काळी परिस्थिती किमान बघावी, त्यांच्या दुःखाशी समरस व्हावे, असा विचार मनात डोकावला.

राहुरीच्या दक्षिण–पश्चिमेला वसलेल्या 'पारनेर' तालुक्यात जावे असे ठरविले. पारनेर तालुका कम्युनिस्ट पक्षाचा (सी.पी. आय.) बालेकिल्ला. कॉ. बाबासाहेब ठुबे हे या तालुक्यातील पक्षाचे आमदार. एस. टी.ने पारनेरला पोहोचलो अन् लक्षात आले की, पारनेर गाव खूपच लहान आहे. स्टॅण्डवर उतरताच 'कार्ल मार्क्स' जन्मशताब्दिनिमित्त पक्षातर्फे काढलेल्या भित्तिपत्रकाने लक्ष वेधून घेतले. शेजारीच मार्क्स-जन्मशताब्दिनिमित्त पक्षाने घेतलेल्या जाहीर सभेची सूचना एका फलकावर लिहून ठेवलेली दिसत होती.

चौकशी करत करत कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात गेलो. कार्यालयात शिरताच कॉ. श्री. डांगे यांची तसबीर, मार्क्सची तसबीर लक्ष वेधून घेत होत्या. विधानसभा अधिवेशन चालू असल्यामुळे कॉ. श्री. ठुबे अनुपलब्ध होते. त्यांचे साहाय्यक श्री. गायकवाड यांच्याशी ओळख झाली. चर्चेला प्रारंभ झाला.

हळूहळू तालुक्याचे चित्र डोळ्यांपुढे स्पष्ट होऊ लागले. पारनेर तालुका नगर जिल्ह्याच्या दक्षिण–पश्चिमेला वसलेला आहे. तालुक्यातील एकूण गावे ११४ आणि २२ वाड्या. तालुक्याची लोकसंख्या साधारण १॥ लाख, खुद्द पारनेर या तालुक्याच्या ठिकाणची लोकसंख्या १०,०००.

नगर जिल्ह्यातील केवळ श्रीगोंदा, पाथर्डी याबरोबर पारनेर तालुक्यातूनच विरोधी पक्षाचे आमदार निवडून आलेले आहेत. तालुक्यात अद्याप एकही साखरकारखाना नाही. (सध्या निघोजजवळ एक साखरकारखाना नियोजित आहे.)

तालुक्यात पाऊस कमी, त्यातून भर म्हणजे कोणतीच मोठी नदी तालुक्यातून जात नाही. पाटाचे पाणी (कुकडी प्रकल्प) तालुक्याच्या पश्चिमेकडील केवळ ९ गावांनाच मिळते. तालुक्यात एकूण २५० पाझर तलाव बांधले गेले आहेत.

या सर्व कारणांमुळे तालुक्याची आर्थिक स्थिती बिकट आहे. साहजिकच २५०० कामगार मुंबईत कामासाठी गेले आहेत. सैन्यामध्ये असलेल्यांची व माजी सैनिकांची संख्या दीड हजाराच्या आसपास आहे.

नारायणगव्हाण येथे एक दूध-खरेदी-विक्री केंद्र आहे. या केंद्रात जवळजवळ ५००० लिटर दुधाची खरेदी–विक्री होते. चिलिंग प्लँटची सोय केंद्रात उपलब्ध आहे.

अशा अगोदरच कोरड्या असलेल्या या तालुक्याला पावसाने दगा दिल्यावर काय परिस्थिती झाली असेल हे समजू शकेल. २५० पाझर तलाव आहेत; पण पाऊस नाही, त्यामुळे पाझर तलाव कोरडे पडले. या पाझर

तलावांचा त्यामुळे विहिरींना पाणी वाढायला उपयोग शून्य. त्यातून वाईट गोष्ट म्हणजे एवढे पाझर तलाव असल्याने नव्याने पाझर तलाव बांधण्यासाठी जागा सापडत नाहीत. त्यामुळे दुष्काळाने तडाखा बसलेल्यांना रोजगार हमी योजनेच्या कामातून अर्थार्जन करण्याची शक्यता दुरावली–कारण रस्ता बांधणे इत्यादी कामे सरकार सहसा घेत नाही. अनुत्पादक कामे असे या कामांचे वर्णन होते !

सध्या १४ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्रतेने भासत आहे. म्हणजे अजून ३ महिने – एप्रिल, मे व जून – पिण्याच्या पाण्यासाठी झगडा चालणार आहे. पारनेरच्या आसपासच्या शेतकऱ्यांच्या विविध वस्त्यांवर मी मुद्दाम जाऊन विहिरी बघून आलो. मार्च सरतानाच या विहिरींच्या पाण्याने तळ गाठला आहे, म्हणजे जूनअखेर या विहिरींमध्ये पाणी कोठले असणार ?

उन्हाळी बागायती पिकांची शक्यता नाही, ज्यांनी ऊस लावले होते, त्यांचे ऊस पाण्या-अभावी जळत असलेले दिसत होते. दिवाळी-पूर्वी झालेल्या पावसाने रब्बी ज्वारीचे पीक त्यातल्या त्यात बरे आले. गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. आठवड्याचे गुरांचे बाजार हल्ली फार मोठे भरतात. बिचारे शेतकरी ! मुकी जनावरे चाऱ्याअभावी स्वतःच्या डोळ्यांपुढे मरू नयेत म्हणून कसायाकडे पाठवून देतात. त्यातूनही हिरव्या चाऱ्याच्या अभावी विविध गावांतून २५ हून अधिक जर्सी गाया मृत्युमुखी पड-ल्याचे वृत्त आहे.

, सरकारने हा तालुका टंचाईग्रस्त म्हणून घोषित केला आहे, दुष्काळग्रस्त नव्हे ! दुष्काळग्रस्त भागातील प्रत्येक जिवंत प्राणि-मात्राला जगविण्याची जबाबदारी सरकार-कडे येते. टंचाईग्रस्त भागाची मात्र अशी जबाबदारी सरकारकडे येत नाही.

टंचाई, हलाखीची स्थिती, वरील वर्णना-वरून कदाचित विशेष चिंताजनक वाटणार नाही, तथापि अजून पावसाला ३ महिने आहेत. दिवसेंदिवस कडक उन्हाच्या तडा-ख्यात परिस्थिती बिकट होत जाईल. सध्या १४ गावांमध्ये म्हणजे ८,००० लोकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. तीन महि-न्यात कडक उन्हाने विहिरींमध्ये पिण्यासाठी थेंब तरी राहील का ? मुक्या जनावरांना चारा व पाण्यासाठी दाही दिशा भटकत जायला लागणार, या सर्व विचारांनी माझे मन अस्वस्थ झाले.

'दुष्काळात तेरावा महिना...' ही म्हण या तालुक्याबाबत सार्थ ठरते. अगोदरच हलाखीची स्थिती, त्यात दुष्काळ व यातून भर म्हणजे भारतीय सैन्याच्या KK मिलि-टरी रेंजच्या विस्तारासाठी तालुक्यातील व्यापली जाणारी जमीन ! ढवळपुरी, गजदीपूर, वनकुटे ही गावे प्रारंभीच्या विस्ता-राच्या टप्प्यात व नंतरच्या टप्प्यात पळशी, खंदकवाडी व रेसवाडे खुर्द ही गावे सैन्याच्या ताब्यात जातील. म्हणजे एकूण ११,९४२ हेक्टर जिरायती क्षेत्र, ३२,१७० हेक्टर पोटखराबा क्षेत्र व ८३ हेक्टर बागायती क्षेत्र सैन्याच्या ताब्यात जाणार आहे. केंद्रशासन या जमिनी घेतल्याबद्दल केवळ नुकसानभर-पाई देते, पुनर्वसनाची कोणतीच तरतूद नाही ! गेली २-३ वर्षे ही 'टांगती तलवार' या गावांमध्ये आहे.

ही सर्व चर्चा झाली. वातावरण जणू सुन्न झाल्यासारखे वाटले. या परिस्थितीत कम्यु-निस्ट पक्षाचे काम म्हणजे विविध टंचाईग्रस्त गावांना भेटी, पाण्याच्या पिण्यासाठी टँक-रची सोय करून देणे, रोजगार हमी योज-नेची कामे मार्गी लावणे अशा स्वरूपाचे आहे. त्याचबरोबर मिलिटरी रेंजचा मुद्दा विविध ठिकाणी आग्रहाने मांडला आहे.

बोलता बोलता 'तुम्ही जवळच असलेल्या राळेगणशिंदीला जा व श्री. अण्णा हजारे यांचे आदर्श काम बघून या' असे पक्ष-कार्यकर्त्याने सुचविले. लगेचच २-३ आठ-वड्यांपूर्वीच्या 'माणूस'च्या अंकातला श्री. परुळकर यांचा लेख आठवला.

पक्षकार्यकर्त्यांचा निरोप घेतला व 'राळेगणशिंदी'ला निघालो. योगायोगाचे विलक्षण आश्चर्य वाटले ! पारनेरचा दुष्काळ तेथील बिकट परिस्थिती बघितल्यावर आता जायचे एका कर्मयोग्याने आपल्या परि-श्रमांनी खरोखरच संपन्न, सुवत्तापूर्ण केलेल्या एका गावाला एकाच तालुक्यात बिकट प्रश्न असलेली गावे व जणू या गावातील प्रश्नांना उत्तरे देणारे 'राळेगणशिंदी' हे गाव !

श्री. हजारे यांच्या कार्याचे वर्णन 'माणूस' अंकात आलेलेच आहे. त्यांचे सर्वंकष काम प्रत्यक्ष बघण्यातला आनंद मात्र आगळाच होता.

रात्रीच्या मुक्कामानंतर परतीचा प्रवासा-साठी एस. टी. त बसलो. गेल्या दोन दिवसां-तील घडामोडी आठवत असतानाच एक छान डुलकी लागली. एक सुरेख स्वप्न पडले. रखरखीत वाळवंटातील अंग भाजून काढणारे ऊन्ह चहूकडे होते उन्हाच्या झळा उसळत होत्या. या उन्हाचा तडाखा सहन न झालेले अनेक जीव मृतावस्थेत निपचित पडले होते. या तडाख्यातूनही जिवंत राहण्याची क्षमता असलेले काही जण सर्व लवाजम्यानिशी दूर जाण्याचा प्रयत्न करत होते. मी देखील या दूर जाणाऱ्यांपैकी एक होतो. खूप अंतर पार केले आणि मग वाळवंट संपले की, वाळवंटावर विजय मिळविणाऱ्यांची वस्ती आली हे क्षणभर मला कळेना ! लगेचच लक्षात आले ही आहे वस्ती लढाऊ, विजी-गिषु वृत्तीच्या लोकांची ! वाळवंटावर विजय मिळविणाऱ्यांची वस्ती ! या वस्तीत उन्हाच्या तडाख्याने गतप्राण झाल्याची कोण-तीच चिन्हे नव्हती, उलट चहू बाजूंनी डवर-लेल्या गर्द झाडीने मन सुखावत होते. दूर-वरच्या रानातून एक शेतकरी आपल्या सुरेल आवाजात गात गात नांगरत होता. गावातील शाळेत मास्तर व मुले शिक्षणात तल्लीन होऊन गेली होती. वाळवंटाच्या पार्श्वभूमीवर हे 'सुजलाम् सुफलाम्' गाव बघून मी आश्चर्यमुग्ध झालो ! जवळच्याच एका झाडाखाली निवांतपणे बसलो.

अचानक जाग आली. स्वप्नाची गंमत वाटली. स्वप्नातील वाळवंटाची परिस्थिती खरी का नं..र बघितलेले गाव खरे हे कळेना आणि मग क्षणार्धात डोक्यात लख्ख प्रकाश पडला! दोन्हीही खरेच. पारनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती म्हणजे वाळवंटातील परिस्थितीसारखी म्हणजे एक प्रश्न ! आणि सुबत्तापूर्ण 'राळेगणशिंदी' हे गाव जणू त्या स्वप्नातील संपन्न गावासारखे-वाळवंटातील टंचाई व हलाखीच्या परिस्थितीला उत्तर !

–श्रीकान्त करमरकर




# पोलंडचा पुरुषोत्तम लेक वालेसा

सॉलिडॅरिटीच्या मृत्युघंटेचा नाद विरण्यापूर्वीच त्याचे पडसाद गडॅन्स्कच्या लेनिन बोटकारखान्याच्या परिसरात उमटू लागले. सॉलिडॅरिटीचा जन्म १६ महिन्यांपूर्वी इथंच झाला होता. त्यामुळं तिच्या मृत्यूचं शोकसंगीत प्रथम इथंच सुरू व्हावं हे स्वाभाविकच होतं. पोलंडच्या पार्लमेंटनं सॉलिडॅरिटी समाप्त केली अन् तिसऱ्याच दिवशी लेनिन बोटकारखान्याच्या गेटावर काळ्या फिती लावलेला प्रचंड पांढरा फलक अडकवण्यात आलेला दिसला. त्यावर लिहिलं होतं,

'सॉलिडॅरिटी जिवंत आहे ... सॉलिडॅरिटी चिरायू होवो !'

बोटकारखान्याच्या सरकारी पर्यवेक्षकांना हा फलक कधी अडकवण्यात आला ते कळलंदेखील नाही. रात्री गेटावर पहारा करणाऱ्या पहारेकऱ्यांना तडकाफडकी बडतर्फ करण्यात आलं. त्यांना मारहाण करून, बर्फाच्या लाद्यांवर झोपवून अन् सिगारेट्सचे चटके देऊन त्यांच्या तोंडून सत्य वदवून घ्यायचा प्रयत्न केला; पण त्यांनाच काही माहिती नव्हती तर ते काय सांगणार ? संधिप्रकाशात ड्यूटी बदलताना चार्ज देण्यासाठी ते पहारेकरी काही मिनिटं टाइमकीपरच्या खोलीत गेले होते. तेवढ्या वेळात हा प्रकार घडला होता. रात्रीच्या अंधारात उंचावर लावलेला फलक कुणालाच दिसला नव्हता.

फलक उतरवण्यासाठी शिडीवर चढलेल्या एका गार्डला काही कामगारांनी पाहिलं अन् पाहतापाहता हजारो कामगार तिथं जमा झाले. गेटच्या आतील बाजूस जमलेल्या कामगारांच्या, 'सॉलिडॅरिटी जिवंत आहे ... सॉलिडॅरिटी चिरायू होवो !' या गगनभेदी घोषणा ऐकून बाहेर गडॅन्स्कच्या नागरिकांचा भला मोठा समुदाय जमला. कामगारांना चिथावणी देण्यासाठी त्यांनीही त्यांच्या सुरात सूर मिसळण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर काटेरी तारांच्या कुंपणातून त्यांनी कामगारांच्यावर फुलं, सिगारेट्स आणि फळं उधळायला सुरुवात केली. नागरिकांच्या या कृतीनं कामगारांना आणखीनच चेव आला आणि त्यांनी आपला आवाज अधिकच उंचावून ओरडण्यास सुरुवात केली. त्या आवाजाचे प्रतिध्वनी गडॅन्स्कमध्ये उमटू लागले आणि पाहता पाहता त्यांनी सारं शहर व्यापून टाकलं.

एखाद्या सरोवरात खडा टाकावा अन् त्याचे तरंग दूरवर पसरत जावेत तसा प्रकार गडॅन्स्कच्या दंगलीबाबत पोलंडच्या सत्ताधीशांनी पूर्वी अनेकवार अनुभवला होता. गडॅन्स्क हे कामगारांच्या चळवळीचं केंद्रस्थान होतं. त्यामुळं तिथं सुरू होणारी दंगल आवाक्यात असेतोवर आवरणं आवश्यक होतं. नाही तर या ठिणगीचं रूपांतर देशव्यापी वणव्यात झालं असतं.

या दंगलीचा सुगावा लागताच जनरल यारुझेल्स्कींनी सर्वप्रथम काय केलं असेल तर ते म्हणजे गडॅन्स्कच्या टेलिफोन आणि टेलेक्स लाइन्स तोडून टाकून गडॅन्स्कला पोलंडपासून विलग करून टाकलं. शहराचे सर्व रस्ते रोखण्यात आले. गडॅन्स्कमध्ये बाहेरून येऊ लागले ते फक्त पोलीस आणि झोमो (पॅरामिलिटरी पोलिस फोर्स) यांनी भरलेले ट्रक्स आणि हेलिकॉप्टर्स.

लेनिन बोटकारखान्याच्या आतल्या बाजूस काम अर्धवट सोडून आलेल्या कामगारांचा जमाव जसाजसा वाढू लागला तसातसा नागरिकांचाही जमाव बाहेरच्या बाजूस वाढू लागला. परिस्थिती हाताबाहेर जातेय असं दिसताच पोलिसांनी अश्रुधूर वापरून पाहिला; पण जमाव याला दाद देईना असं दिसताच पाण्याचे प्रचंड फवारे समुदायावर तोफेच्या गोळ्याप्रमाणे येऊन आदळू लागले.

'बंदुका सोडून कोणतीही अस्त्रे वापरा अन् जमावाला पांगवा !' असा जनरलसाहेबांचा आदेश होता. बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडलेले कामगार हुतात्मे होतात अन् इतरांचे आत्मे संतप्त होतात, त्याचे चटके आपल्याला सोसावे लागतात. म्हणून जनरल यारुझेल्स्कींनी प्राणघातक शस्त्रांचा वापर करण्यास मनाई केली होती.

जनरलसाहेबांच्या अपेक्षेप्रमाणं घडलं. दोन दिवस चाललेली ही निषेधाची दंगल पाण्याच्या मारानेच आटोक्यात आणली गेली. एकही बळी न पडता दंगल शमली. त्यामुळं त्याचे पडसाद पोलंडमध्ये अन्यत्र उमटलेच नाहीत. जनरलसाहेबांनी टाकलेलं हे दान अचूक पडलं अन् सॉलिडॅरिटीच्या पदरात एक नवाच पराभव पडला.

'We need someone to jump over the fence and lead us.' (असा कोणी तरी हवा जो कुंपणावरून उडी मारून आत येईल अन् आम्हाला मार्गदर्शन करेल), पाण्याच्या फवाऱ्यात विरघळून चाललेल्या त्या निषेधमोर्चाला पाहून एक कामगार वैतागून म्हणाला.

दोन वर्षांपूर्वी या गेटजवळ अशीच घटना घडली होती. तिचं स्मरण त्याला झालं असावं. त्यालाच काय पण सान्यांनाच लेक वालेसाची प्रकर्षानं आठवण झाली. कामगारांच्या मनात हाच विचार घोळत होता, 'लेक वालेसा आता इथं असायला हवा होता. तो असता तर पराभवाचं रूपांतर विजयात होऊ शकलं असतं'... त्या वेळी गेटच्या आत अनेक दिवस बैठ्या संपासाठी बसलेले कामगार बोलणी यशस्वी होत नाहीत असं पाहून निराशाग्रस्त झाले आणि यांनी बिनशर्त माघारीची तयारी सुरू केली. अशा वेळी तो माणूस कुंपणावरून उडी टाकून आत आला अन् त्यानं कामगारांचं नेतृत्व स्वीकारलं. पराभवाचं रूपांतर पाहता पाहता विजयात होऊन गेलं. हे फक्त एक लेक वालेसाच करू जाणे ! त्याच्या तोडीचा कामगार-नेता आज पोलंडमध्ये दुसरा होता तरी कोण ? तो जर तुरुंगाबाहेर असता तर अशी पळापळ, असा पराभव पदरी आलाच नसता !

दुसऱ्या दिवशी दुपारी कारखाना पुन्हा सुरू झाला. दंगलीत पुढाकार घेणाऱ्या पन्नास कामगारांना बडतर्फ करण्यात आलं. कामगारांना बोनसरूपानं मिळणारा तेराव्या महिन्याचा पगार शिक्षेदाखल रद्द करून टाकण्यात आला.

' How can you do anything if they put a pislol to your head ?' (डोक्याला पिस्तूल टेकवलेलं असताना तुम्ही दुसरं करू तरी काय शकणार ?) वैफल्यग्रस्त झालेल्या कामगारांच्या या प्रश्नाला कोणाजवळच उत्तर नव्हतं.

टेलिफोन आणि टेलेक्स लाइन्स तोडूनदेखील गडॅन्स्कच्या दंगलीची बातमी बाहेर फुटायची ती फुटलीच. जणू कर्णपिशाच्चानं गावोगावी ती बातमी सांगावी तसं दंगलीचं लोण सगळीकडं पसरलं. क्रॅको-जवळच्या नोवा हुटा या गावात नेमस्त आणि नम्र कामगारांची वस्ती होती. सॉलिडॅरिटीला आजवर यांचा फारसा पाठिंबा कधी मिळालाच नव्हता. भरपूर पगार अन् सर्व सुखसोयी उपलब्ध करून देऊन सरकारनं यांना लाडावून ठेवलं होतं. देशभर कामगारांचे उठाव झाले की, इथला कामगारवर्ग सरकारमागं उभा राहायचा. सॉलिडॅरिटीच्या दृष्टीनं हे जणू सूर्याजी पिसाळच होते; पण या वेळेला या कामगारांनी गडॅन्स्कच्या दंगलीची बातमी कानावर येताच एक दिवस संप करून सर्वांनाच आश्चर्याचा सुखद धक्का दिला आणि सरकारला बुचकळ्यात टाकलं.

देशभर गडॅन्स्कच्या दंगलीचे पडसाद उमटत राहिले; पण हे पडसाद इतके क्षीण होते की, त्यांचा प्रभाव जनतेवर आणि सरकारवर पडूच शकला नाही. वालेसा असता तर असं झालं नसतं असं पोलंडमधल्या प्रत्येकाला वाटत होतं. याला अपवाद होता सत्ताधिशांचा. वालेसा बाहेर असता तर ही दंगल इतक्या चटकन आटोक्यात येऊच शकली नसती हे ते मनोमन जाणून होते.

## चतुर राजनीती

सरकारशी झगडा देऊ शकणारी सॉलिडॅरिटीशिवाय दुसरी मोठी शक्ती म्हणजे पोलंडचं रोमन कॅथॉलिक धर्मपीठ. या धर्मपीठानं सॉलिडॅरिटीच्या स्थापनेपासून तिला सतत पाठिंबा दिला आहे. सरकारनं सॉलिडॅरिटी बेकायदेशीर ठरवली याचा निषेध म्हणून पोलंडचे प्रमुख धर्मगुरु आर्चबिशप जोसेफ ग्लेम्प यांनी आपली जनरल यारुझेल्स्कीबरोबर ठरलेली भेट रद्द करून टाकली. यारुझेल्स्कीला भेटल्यानंतर रोमच्या व्हॅटिकन सिटीचा आणि अमेरिकेचा दौरा ते करणार होते. सरकार आणि सॉलिडॅरिटी यांच्यात मध्यस्थाची भूमिका त्यांनी आजवर स्वीकारली होती, त्यामुळं पोलंडच्या राजकारणात त्यांना वेगळंच महत्त्व प्राप्त झालं होतं. अमेरिकन सरकारनं पोलंडबाबत जास्ती समजुतीचं धोरण स्वीकारावं म्हणून जनरलसाहेबांनी जोसेफ ग्लेम्पना आपल्या भेटीसाठी बोलावलं होतं; पण आता आलेल्या या अनपेक्षित समस्येमुळं हे सारंच बारगळलं होतं. धर्मगुरूंनी सॉलिडॅरिटी रद्द करण्याच्या या कृतीचा निषेध 'trampling of man, of disrespect for man's dignity.' (मानवी हक्क आणि नीतिमूल्यं पायदळी तुडवली जात आहेत) अशा शब्दात केला

जनरल वायझेक यारुझेल्स्की......हे तसं पहायला गेलं तर एक गुंतागुंतीचं व्यक्तिमत्त्व आहे. गोमुल्का आणि गिरेक या दोघांपेक्षा यारुझेल्स्की हा भिन्न प्रकृतीचा आणि प्रवृत्तीचा माणूस आहे. लष्कराची कडक शिस्त अन् कठोर कर्तव्यदक्षता त्याच्या हाडीमासी खिळली असली तरी त्याच्या हृदयातून आपल्या मायभूमीविषयी आणि आपल्या देशबांधवांविषयी ऋजुतम प्रेमभावाचा झरा वाहात असतो. वरवर फणसासारखा काटेरी वाटणारा हा माणूस आतून

---

**रस्त्यावरच्या लोकांचा आरडाओरडा चांगलाच वाढला होता. खिडकीशी जाऊन वालेसानं उजव्या हाताची ' व्ही फॉर व्हिक्टरी ' अशी खूण करताच लोक जल्लोष करू लागले. त्यांचा लाडका नेता त्यांच्यात परतला होता....पोलिश क्रांतीची वाटचाल पुन्हा एकदा नव्यानं सुरू होणार होती.**

## लेखांक : दहावा । लेखक : श्रीकांत मुंदरगी

माणूसच्या २६ फेब्रुवारी अंकापासून २३ एप्रिल अंकापर्यंत ' पोलंडचा पुरुषोत्तम ' या लेखमालेचे नऊ भाग सलग प्रसिद्ध झाले. या अंकात हा अखेरचा दहावा भाग.

---

तितकाच काटेरी आहे असं समजणं चुकीचं ठरेल. त्याच्या सहवासात अगदी जवळ जाणाऱ्या माणसालाच त्याच्या अंतर्मनात चाललेली उलघाल उमजू शकेल.

साऱ्या जगानं जनरलसाहेबांना पोलंडचा खलनायक म्हणून हिणवलं तरी पोलंडचा इतिहास भविष्यकाळात जेव्हा केव्हा वस्तुस्थितीला धरून लिहिला जाईल त्या वेळी खलनायकाची भूमिका त्याच्या वाट्याला नक्कीच येणार नाही. त्यांचे अनेक अपराध (अपराध म्हणायचेच झाले तर) अक्षम्य असतील देखील; पण एका गोष्टीसाठी पोलंडचा इतिहास त्यांचा नक्कीच गौरव करेल. ती म्हणजे या प्रचंड गोंधळात अन् धामधुमीतदेखील पोलंडमध्ये रशियन सेना घुसू न देण्याचं कौशल्य त्यांनी दाखवलं आहे. झेखोस्लोव्हाकिया आणि हंगेरी या दोन देशांचे नेते जे करू शकले नाहीत ते जनरल यारुझेल्स्कींनी करून दाखवलं आहे..... पोलंडचं स्वातंत्र्य त्यांनी अबाधित राखलं आहे. वालेसानं एका खाजगी बैठकीत, 'प्राप्त परिस्थितीत पोलंडला पारतंत्र्यापासून दूर ठेवण्याचं काम तारेवरच्या कसरतीसारखं आहे अन् यारुझेल्स्कींशिवाय दुसरा कोणताही नेता ते करू शकला नसता', असे उद्‌गार काढले आहेत. यारुझेल्स्कींच्या चतुर राजनीतीला वालेसासारख्या माणसाकडून अशी दाद मिळावी यातच त्यांचा गौरव सामावला आहे.

यारुझेल्स्कींनी एका फ्रेंच पत्रकाराजवळ अशी कबुली दिली की, सॉलिडॅरिटीनं साऱ्याच गोष्टी इतक्या ताणल्या नसत्या तर खचितच मी ती संपुष्टात आणण्याच्या भानगडीत पडलो नसतो. सॉलिडॅरिटीनं यारुझेल्स्कींचा अगदी अंत पाहिला. म्हणून नाइलाजानं सॉलिडॅरिटी रद्द करून त्यांनी रशियन लोकांना पोलंडच्या राजकारणात प्रत्यक्ष प्रवेश करू देण्याचं टाळलं.

## लगाम सैल सोडले !

लेक वालेसाचंदेखील सुरुवातीच्या काळात सॉलिडॅरिटीनं रबर तुटेपर्यंत ताणू नये अशीच भूमिका घेतली होती; पण दिवसेंदिवस वाढत जाणारी वालेसाची लोकप्रियता आणि सॉलिडॅरिटीतल्या जहालमतवाद्यांचं वाढतं दडपण यामुळं वालेसाला मध्यममार्गी अन् मवाळ भूमिका घेणं अशक्य होऊन बसलं. राजकारणात एका विशिष्ट उंचीवर पोहोचलं की, त्या व्यक्तीला स्वतःची सगळीच मतं बरोबर आहेत असा आग्रह धरता येत नाही. त्यातून वालेसानं तर मर्यादित स्वातंत्र्यासाठी कम्युनिस्ट एकाधिकारशाहीशी झगडा सुरू केला होता. म्हणून सॉलिडॅरिटीत हुकुमशाही चालवणं त्याला केवळ अशक्य होतं. कामगारचळवळीत लेक वालेसाचा नेता म्हणून जेव्हा प्रवेश झाला त्या वेळची त्याची मतं अभ्यासून पाहिली तर हे निश्चित ध्यानात येतं की, कामगारचळवळ राजकारणापासून दूर रहावी असं त्याला मनापासून वाटत होतं; पण या चळवळीचं स्वरूप इतक्या झपाट्यानं बदलत गेलं की, कुणाचाच ताबा त्यावर राहिला नाही अन् कोणतीही देशव्यापी चळवळ राजकारणापासून अलिप्त राहूच शकत नाही. ४॥ कोटी जनसंख्येपैकी ३ कोटी लोक सॉलिडॅरिटीच्या कार्यात सक्रिय सहभाग घेऊ लागतात, ती संघटना देशाच्या राजकारणापासून अलग करणं तिच्या नेत्यांनाच काय पण राज्यकर्त्यांनासुद्धा शक्य नव्हतं. मूठभर लोकांनी आपल्या कल्पनेप्रमाणं साऱ्या देशाचा राज्यकारभार चालवावा अन् कोट्यवधी लोकांनी ते निमूटपणे स्वीकारावं या कम्युनिस्ट मतप्रणालीला अभिप्रेत असलेल्या संकल्पनेला सॉलिडॅरिटीनं सुरुंग लावला. पोलंडमध्ये यशस्वी ठरू पाहणारी चळवळ उद्या आपल्या देशात पोहोचली तर काय होईल. या भीतीनं रशियन राज्यकर्त्यांची झोप उडाली. त्यामुळं त्यांनी जनरल यारुझेल्स्कींवर दडपण वाढवण्यास सुरुवात केली. या साऱ्या गोष्टींवरून स्पष्ट निष्कर्ष निघतो तो असा–

जनरल यारुझेल्स्की आणि लेक वालेसा ही दोन्ही माणसं मुळात मवाळ प्रवृत्तीची अन् समजूतदार असूनही परिस्थितीच अशी काही पालटत गेली की, मनात असूनही दोघांनाही दोन टोकांची धोरणं स्वीकारावी लागली.

जनरलसाहेबांनी लष्करी कायदा लागू करताना पोलिश जनतेला आणि जगाला स्पष्ट आश्वासनं दिलं होतं की, चिघळलेली परिस्थिती पूर्ववत् होताच लष्करी कायदा मागं घेण्यात येईल. त्याप्रमाणं पावलं टाकण्यास त्यांनी सुरुवात केली होती. मधूनमधून होणारे कामगारांचे संप आणि नागरिकांची निदर्शनं निर्दयपणे मोडून न टाकता संयमानं हाताळण्यात त्यांना यश आलं. अमेरिका आणि दोस्त राष्ट्रं यांच्याकडून आर्थिक दबाव येत असतानाही रशिया आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रं यांच्या सहाय्यानं पोलंडची कोसळणारी आर्थिक घडी त्यांनी सावरून धरली. लष्करी कायदा लागू होताच सुमारे ६००० पुढाऱ्यांची धरपकड करण्यात आली होती. त्यांपैकी चार-एक हजार दुय्यम दर्जाच्या पुढाऱ्यांना मामुली चौकशी करून लागलीच सोडून देण्यात आलं. उरलेल्या पुढाऱ्यांपैकी १४०० लोकांना पुढच्या सहा महिन्यात मुक्त करण्यात आलं. सॉलिडॅरिटीचे ६०० जहाल कार्यकर्ते आणि लेक वालेसा यांनाच काय ते बंदिवासात ठेवण्यात आलं होतं. या पुढाऱ्यांशी ते तुरुंगात असताना निरनिराळ्या पद्धतीनं समझोता घडवून आणण्याचे प्रयत्नही जनरलसाहेबांनी केले; पण ते यशस्वी होऊ शकले नाहीत. पण प्रदीर्घ काळच्या बंदीवासानंतर वालेसा आणि त्याच्या सहकाऱ्यांत हृदयपरिवर्तन घडून येण्याची चिन्हं दिसू लागली. तेल गेलं तूपही गेलं अन् हाती धुपाटणं आलं अशी आपली अवस्था करून घेण्यात काय हशील आहे हे ध्यानात येताच सॉलिडॅरिटीच्या हायकमांडनं तडजोडीची तयारी दर्शवली.

जनरल यारुझेल्स्कींनी परिस्थितीचा अंदाज घेतला आणि सॉलिडॅरिटीनं शमीच्या झाडावर ठेवलेली शस्त्रं परत घेण्याची उत्सुकता फारशी दर्शवली नाही असं पाहून लष्करी कायदा स्थगित करण्याचा निर्णय घेतला. याच काळात रशियातही फार मोठं राजकीय नाट्य संपुष्टात येत होतं. गेली अनेक वर्षं रशियाच्या राजकीय रंगभूमीवर प्रमुख भूमिका बजावणारे लिओनिड ब्रेझनेव्ह यांची अखेर जवळ आली होती. रशियन राज्यकर्त्यांत सत्तास्पर्धेची चुरस सुरू झाली. 'ब्रेझनेव्हनंतर कोण ?' या प्रश्नाचं उत्तर शोधण्यात गढून गेलेल्या सोव्हिएट सत्ताधिशांना पोलंडच्या घडामोडीत बारकाईनं लक्ष घालायला वेळ नव्हता. या काळात जनरल यारुझेल्स्कींनी बरेचसे महत्त्वाचे निर्णय बऱ्याच अंशी स्वतःच्या जबाबदारीवर घेऊन टाकले असं म्हटल्यास ते वावगं ठरू नये.

सॉलिडॅरिटीची उत्तरक्रिया यथासांग पार पाडल्यानंतर यारुझेल्स्कींनी गच्च आवळलेले लगाम सैल सोडण्यास सुरुवात केली. नव्या



त्यांचा लाडका नेता त्यांच्यात पुन्हा परतला होता.

¤

वर्षाची म्हणजे ८३ सालाची सुरुवात आपली प्रतिमा उजळून टाकणारी असावी अशा अपेक्षेनं जनरल यारुझेंस्कींनी नवा पवित्रा घेण्याचं ठरवलं.

: लष्करी कायदा स्थगित करणं.

: System of pardons सॉलिडॅरिटीच्या अजूनही गजाआड असलेल्या कार्यकर्त्यांपैकी बहुतांश लोकांना बंधमुक्त करणं. मात्र blanket amnesty सर्वंकष अन् संपूर्ण क्षमादान करून या कार्यकर्त्यांना त्यांच्या काढून घेण्यात आलेल्या नोकऱ्या व जप्त केलेली मालमत्ता परत करण्याचा यात समावेश नव्हता.

: प्रत्येक उद्योगसमूहावर नेमण्यात आलेले लष्करी निरीक्षक ( military commissars ) मागे घेण्यात येणार होते.

: या लोकांच्या पत्रव्यवहाराची तपासणी बंद करण्यात येणार होती. -

: फोन्सटॅप करण्यात येणार नव्हते.

: वृत्तपत्रांवर चालवण्यात येणारी कात्री काही अंशी कमी करण्यात येणार होती.

: सामाजिक आणि सांस्कृतिक निर्बंध शिथिल करण्यात येणार होते.

: भाषणस्वातंत्र्यावरची बंदी उठवण्यात येणार होती.

## तीन महत्त्वाच्या घटना

या गोष्टी अंमलात आणून जनरल यारुझेंस्कींना एका दगडात दोन पक्षी मारायचे होते. एक तर पोलिश जनतेची गमावलेली सहानुभूती परत मिळवायची अन् दुसरं म्हणजे अमेरिकादी राष्ट्रांशी दुरावलेले संबंध पूर्वस्थितीवर आणायचे. पोलिश कम्युनिस्ट पक्ष आणि मंत्रिमंडळ यातील कडव्या विचारसरणीच्या सहकाऱ्यांची आपल्यावर होणारी, going too far, too fast हे नको इतक्या वेगानं नको इतक्या टोकापर्यंत जाणं होणार आहे, अशी टीका पचवून यारुझेंस्कींनी आपलं धोरण नेटानं पुढं रेटण्याचं ठरवलं. त्याप्रमाणं त्यांनी पार्लमेंटमध्ये या नव्या तरतुदींना मान्यता मिळवली.

क्रेमलिनच्या नव्या नेतृत्वाला पोलंडच्या घटनांकडे कानाडोळा करणं आता शक्य नव्हतं. त्यांनी यारुझेंस्कींना सबुरीचा सल्ला दिला.

इकडे अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या राष्ट्रांनी यारुझेंस्कींच्या या नव्या धोरणाला संमतीचे संकेत पाठवले. मात्र आपली संपूर्ण सहानुभूती पोलंडला हवी असेल तर लष्करी कायदा मागं घेण्यात यावा अन् लेक वालेसाची बिनशर्त तात्काळ सुटका करावी अशी मागणी केली.

लेक वालेसाची सुटका करणं म्हणजे संकटाला पुन्हा निमंत्रण देणं अशीच यारुझेंस्कींची भावना होती. सॉलिडॅरिटी जरी कायद्यानं रद्द करून टाकली असली तरी प्रत्यक्षात ती थोडीच नाहीशी होणार होती ? शरीर जरी संपवून टाकलं तरी आत्मा थोडाच नाहीसा करून टाकता येतो ? सॉलिडॅरिटीविषयी पोलिश जनतेला असलेली सहानुभूती नाहीशी करून टाकणं कायद्याला केवळ अशक्य होतं. सॉलिडॅरिटीनं पेटवलेली आग तात्पुरती विझल्यासारखी झाली असेल वरून जरी सारी राख दिसत असली तरी आत धुमसता निखारा कायम आहे हे यारुझेंस्की मनोमनी जाणून होते. वालेसा बंदिवासातून बाहेर पडला की, वाऱ्याच्या झोतानं वरची राख उडून जाऊन आतल्या धगधगत्या निखाऱ्यानं पेट घ्यावा त्याप्रमाणं विझू पहात असलेली सॉलिडॅरिटीची चळवळ पुन्हा उफाळून वर येण्याची शक्यता होती. म्हणूनच मनात असूनही वालेसाला मुक्त करण्याचा निर्णय यारुझेंस्कींना घ्यावासा वाटत नव्हता. त्यांच्या सहकाऱ्यांतसुद्धा वालेसाला सोडावं की नाही याविषयी एकमत होत नव्हतं. ब्रेझनेव्हच्या मृत्यूनंतर रशियायाची सूत्रं हाती घेतलेल्या यूरी अॅन्ड्रोपोव्ह यांना स्वतःचं स्थान टिकवून बळकट करण्याचीच काळजी लागली होती. पोलंडच्या राजकारणात लक्ष घालायला सध्या त्यांना सवड नव्हती.

'आठ नोव्हेंबर, सकाळी दहाचा सुमार...याच सुमाराला तीन महत्त्वाच्या घटना घडत होत्या.

...वालेसानं जनरल यारुझेल्स्कींना लिहिलेलं पत्र वार्साला रवाना करण्यात आलं. 'कायदा आणि कम्युनिझमच्या चौकटीत राहून मी कामगार-चळवळींचं कार्य करायला तयार आहे. सरकारनं कामगार-चळवळीचा सहानुभूतीनं विचार करायचं ठरवलं तर सरकारला सहकार्याचा हात द्यायची माझी तयारी आहे!'

...१९८३ सालात पोप जॉन पॉल दुसरे यांच्या पोलंड-भेटीची तारीख पोलिश सरकारनं जाहीर केली.

...पोलंडचे प्रमुख धर्मगुरू जोसेफ ग्लेम्प आणि आणि जनरल यारुझेल्स्की यांच्यातली बोलणी तडजोडीनं संपली होती.

...पोलिश धर्मपीठानं सहकार्य केलं तर यारुझेल्स्कींनी लौकरात लौकर लष्करी कायदा मागं घेण्याची तयारी दर्शवली.

## व्ही फॉर व्हिक्टरी!

धर्मपीठानं सर्वस्वी सॉलिडॅरिटीची बाजू घेणं जनरलसाहेबांना रुचलं नव्हतं, म्हणून त्यांनी धर्मपीठावरचं दडपण वाढवण्यास सुरुवात केली होती. नवी चर्चेस बांधायला परवानगी देण्यात टाळाटाळ सुरू केली होती. चर्चेसना परदेशी चलनाच्या रूपानं मिळणाऱ्या मदतीवर निर्बंध घालण्यात आले होते. तरुण धर्मगुरूंना लष्करी सेवा सक्तीची करू अशी धमकी देण्यात आली होती. या साऱ्यांचा अर्थ एकच होता तो म्हणजे सॉलिडॅरिटीच्या पाठोपाठ धर्मपीठावरही बडगा उगारण्यास सरकार मागं-पुढं पाहणार नव्हतं, म्हणूनच धर्मपीठानं बचावाचा पवित्रा घेण्याचं ठरवलं. त्यातून पोप जॉन पॉल दुसरे यांनी, 'पोलिश जनतेनं पोलिश सरकारशी सहकार्य करूनच आपले प्रश्न मिटवणं पोलंडच्या अंतिम हिताचं ठरेल,' असा समजुतीचा इशारा व्हॅटिकनसिटीच्या जागतिक धर्मपीठावरून दिला.

आणि अचानक गडॅन्स्क शहरात ती वार्ता वादळासारखी पसरली. घराघरातून लोक बाहेर पडले. रस्त्यावर लोकांचे घोळके जमू लागले. जो तो एकमेकाला, आलेली बातमी खरी आहे का, असं खालच्या आवाजात विचारत होता. मोठ्या आवाजात असल्या गोष्टीवर चर्चा करण्याचं धाडस मात्र कोणालाच होत नव्हतं. कारण गडॅन्स्कमध्ये पोलीसदल आणि लष्कराची वर्दळ एकदम वाढली होती.

दानुता रात्रीचं जेवण बनवण्यात गर्क झाली होती. मुलांनी आपापले अभ्यास संपवून, आईभोवती जमून जेवणाची गडबड करायला सुरुवात केली होती. छोटी मुलगी पाळण्यात गाढ झोपी गेली होती. इतक्यात मोठ्या मुलानं पळत येऊन दानुताला धापा टाकत सांगितलं,

'आई, आपल्या घरासमोर पाहिलंस का?...ही गर्दी जसली आहे!'

दानुताला ते ऐकून आश्चर्य वाटलं. अशा वेळी अचानक आपल्या घरासमोर लोक का जमावेत हेच तिला उमजेना. तिनं गडबडीनं बैठकीच्या खोलीतल्या खिडकीचा पडदा दूर सारून रस्त्यावर पाहिलं. दिव्यांच्या उजेडात हजारभर माणसांचा जमाव जमलेला तिला दिसला कसल्या तरी विचित्र शंकेनं तिचं मन भयभीत झालं. अंगातलं अवसान गळून गेल्यासारखी ती कोचावर बसली. इतक्यात...

खालून तिला आरडाओरडा ऐकू आला. तिनं परत खिडकीकडं धाव घेतली. लोक मोठमोठ्यानं बोलत असतानाच चार लष्करी गाड्यांचा ताफा घरासमोर येऊन थांबला. पाहता पाहता त्या गाड्यांना लोकांनी गराडा घातला. काही क्षणातच एका गाडीचं दार उघडून बाहेर पडलेल्या व्यक्तीचा चेहरा पाहताच दानुताचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.

ज्या क्षणाची दानुता गेले अनेक दिवस आतुरतेनं वाट पहात होती तो अमृतात न्हाऊन निघालेला क्षण अखेर एकदाचा आला. तिचं हृदय जोरजोरानं धडधडू लागलं. आपला आनंद तिला लपवता येईना. तिनं मुलांना गडबडीनं खिडकीजवळ बोलावलं. ती मुलं उत्सुकतेनं बाहेर पाहू लागली......

जमावातून लेक वालेसाच्या जयजयकाराच्या आरोळ्या उठू लागल्या. लोक त्याला 'लेसेक, लेसेक' या लाडक्या नावानं पुकारू लागले ... गाडीतून बाहेर पडलेल्या लेक वालेसानं हसतमुखानं लोकांच्या उत्स्फूर्त स्वागताचा स्वीकार केला अन् दोन सुरक्षा अधिकाऱ्यांच्या समवेत तो घराच्या दिशेनं चालू लागला.

वालेसा घराच्या दाराशी आला. दार उघडंच होतं. बाहू पसरून उभ्या असलेल्या दानुताला त्यानं आपल्या मिठीत घेतलं. तिच्या आसवांनी त्याची छाती भिजून गेली. दानुताच्या पाठोपाठ पळत आलेल्या मुलांनी लेकभोवती गराडा घातला.

दानुतानं चटकन् आत जाऊन व्होडकाची बाटली आणली आणि ती त्या सुरक्षा अधिकाऱ्यांच्या हाती देत म्हटलं,

'माझ्या नवऱ्याला घरी परत आणल्याबद्दल लाखलाख आभार!'

सुरक्षा-अधिकाऱ्यांनी हसून तिला अभिवादन केलं अन् तिच्या भेटीचा स्वीकार केला. ते पाठ वळवून चालू लागले तसं त्यांना थांबवून ती धारदार सुरात म्हणाली,

'खबरदार, माझ्या नवऱ्याला परत बंदिवासात टाकलंत तर!'

पाळण्यात झोपलेल्या आपल्या लहान मुलीच्या गालाची पापी घेत असताना लेकच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रू तिच्या गालावर पडले.

रस्त्यावरच्या लोकांचा आरडाओरडा चांगलाच वाढला होता. खिडकीशी जाऊन लेक वालेसानं उजव्या हाताची 'व्ही फॉर व्हिक्टरी' अशी खूण दाखवताच लोक जल्लोष करू लागले. त्यांचा लाडका नेता त्यांच्यात परतला होता...त्याच्या मार्गदर्शनाखाली पोलिशक्रांतीची वाटचाल पुन्हा एकदा नव्यानं सुरू होणार होती याचीच जणू त्यांना खात्री पटली. □

**स मा प्त**

## सणकीत

# नव्या नवरीचे नऊ दिवस

एप्रिलचा पंधरवडा संपत आलाय तोच मेचा चौघडा कानात घुमू लागलाय. लग्नपत्रिकांची अर्जंट कामं आणि आग्रहाने दिलेल्या पत्रिका ( भोजनाच्या प्रवेशपत्रिकेसह ) टेबलावर साचायला लागल्यात. पत्रिका बघितल्या-बघितल्याच डोळयांसमोर मांडव उभा ठाकतो. त्याची निळी-पांढरी कापडं, झालरी, झुंबरं, सर्वत्र नव्या कपडयांचा, सेंटचा वास. अलंकृत बायका, अंगठ्या, चेनमधून चकाकणारी तरुण पोरं, दुपारची जेवणं, मधलं सुस्तावणं आणि संध्याकाळचं चहापान ते थेट सर्व सामान घेऊन जाणारा टेंपो पाठमोरा होऊन नजरेसमोर उभा ठाकतो. अेक ठराविक कांपोझिशन वर्षानुवर्षे, थोडेफार बॅन्ड, स्पीकर्समधले फरक सुटांच्या नव्या फॅशनी .. यातले बदल सोडले तर सारं काही तेच. तरीही या सगळया वातावरणाचा, धाईगर्दीचा, मानपानाचा रीतिरिवाजांचा आपल्याला हव्यास असतो, आकर्षण असते. नकळतपणे आपल्या मनात रंगीत दिव्यांची माळ पेटत असते. सनईचा सूर कानात पिंगा घालतो. थाटमाट, झगमगाट अशा वैभवशाली जगात एखाद्या राजकुमार/राजकुमारीसारखे आपण सर्वांच्या नजरेचा विषय आहोत ही कल्पना सुखावह असते आणि त्यामुळेच लग्न ही जरी माणसाची अत्यंत खाजगी बाब असली तरी ती सार्वजनिक बनते.

आमच्यासारख्या तरुण पोरांना तर ' लग्न ' म्हणजे धमाल प्रकार वाटतो. आयुष्यात चैन करून घ्यायची गोष्ट ! अंगाला हळद काय, पोरीबाळींची चेष्टा मस्करी, करकरीत सूट, बूट आणि सगळयात महत्त्वाचं म्हणजे तळहाताच्या फोडासारखं सर्वांचं जपणं, नंतर घोड्यावर किंवा दिव्यांच्या गाडीत बसताना नुस्ती ' शान ! ' आयुष्यात एकदाच ही सेव्हंटी एम् एम् शान आणि नंतर पहिल्या रात्रीची स्टिरिओफोनिक साउंड सिस्टीम !

या सगळ्यात तोच तोचपणा आहे, काही ' टाकाऊ ' गोष्टींचं ' उदात्तीकरण ' आहे. सोयीनुसारच बदल आहेत आणि एक जबरदस्त नशा आहे. त्यामुळेच बदलत्या परिस्थितीत रजिस्टर्ड, कोर्ट मॅरेजसारखे सरळ सोपे पर्याय निर्माण झाले असले तरी ' शान'ची नशा काय उतरत नाही! आयुष्यात एकदाच तर करणार, मग काय हरकत जिवाची मजा करायला ?

अशा व्यक्तिगत पातळीवर असे प्रश्न नेऊन ठेवायचे आणि मग त्याला खाजगी आयुष्याचे कुंपण घालून इतरांना प्रवेश बंद करायचा. त्यातूनच हुंडा, मानपान यासारख्या प्रथा वेगवेगळे वेश घालून मांडवात वावरतच असतात. आपल्या सामाजिक जीवनात प्रखरपणे भेडसावणारे हे प्रश्न आम्ही ज्याच्या त्याच्या खात्यात टाकून आपले अकाउंट क्लिअर करतो !

मित्रांमध्ये ' लग्न ' हा विषय अनेक वेळा अनेक बाजूंनी इंटरेस्टिंग होतो. बहुतेकांना अनेकांबरोबर फिरलेली पोरगी आपल्याबरोबर सुद्धा ' फिरवायला ' हरकत नसते. फक्त लग्नाची बायको मात्र ' तिळा तिळा दार उघड ' या मंत्रासारखी फक्त आपल्यालाच माहीत पाहिजे ! यानंतरची चर्चा ' हनिमून कुठे, कसा, याच्या चर्चा, सामिष जोक्स आणि बायको असली की साला डोकं दुखू नाही तर पाठ, सगळं कसं व्यवस्थित, घराबाहेर पडताना शर्टाची बटणं ती लावत्येय अशा स्वप्नात एखादा पुरता अडकतो, तर या साल्याला ती कमरेत लाथ घालून सकाळी उठवेल अशा स्वभावानुसारच्या कॉमेंटसही पास होतात आणि लग्न कसं शानदार, इज्जतमध्ये करणार याचं वर्णन होतं. एखाद-दुसरा विनहुंड्यांचे साधं लग्न करणार असं म्हणतो त्याची टवाळी होते आणि ' पंचा नेस, काठी घे आणि हनिमून पदयात्रा काढ !' असा उपदेश केला जातो तेव्हा खुर्च्या उलटचा होईपर्यंतचा हास्यकल्लोळ उठतो. आपले हे फ्रेंडलोक च्यायला, सिरियस होतच नाहीत अशा बाबतीत. ते सिरियस कधी होतात, तर भटाची आळवणी चालू असते तेव्हा. एखादा विधी आपल्या हातून चुकणार नाही ना या विवंचनेत असताना, कुलदैवतांना नमस्कार घालताना, वरातीतून घरात पहिलं पाऊल टाकताना आणि फोटोग्राफरच्या अनिश्चित फ्लॅशपुढे ! बस्स बाकी लग्न म्हणजे धमाल... एक अधिकृत शरीरसुखाचा समाजमान्य परवाना. त्यांना काय विचारलं तर ते म्हणतात, ' अरे, सिरियस होण्यासाठीच बाप लग्न लावून घेतोय ! म्हणजे लग्नानंतर मूल-बाळ होणं म्हणजे शहाणं होणं, जबाबदार होणं ! पण त्याआधी ?

त्याआधीचा विचार आपण कशाला करायचा ? आता सगळेच प्रेम-बिम करू शकत नाहीत किंवा एखाद्याला पुष्कळ पत्रं लिहूनही पलीकडून काहीच होत नाही आणि एखाद दिवशी उत्तर म्हणून पत्रिकाच येते तेव्हा टिपिकल ' देवदास ' बनल्याशिवाय इलाज नसतो. त्याला ' लाइफ ' ड्राय वाटायला लागतं. मुकेश हा जगातला सर्वश्रेष्ठ गायक आहे, असं तो पिडकमध्ये स्वतःच टाळ्या वाजवून डिक्लेर करतो. बाकी आमचे सगळे तरुण मित्र जे सिरियस बंकिंग, पिकनिक ड्रिंक, दररोजची बिड्या-पाकिटं स्वतःच्या वाढत्या वयाच्या निर्णयक्षमतेचा आदर ठेवून बाळगत असतात ते सारे तरुण लग्नाच्या बाबतीत मात्र आइस्क्रीमसारखे गोड गोड विरघळतात. आपले आईवडील हे जगातील अेकमेव निष्णात आहेत अशा समजाने काही ' सांड ' ( हे आमच्या मित्रांचेच शब्दब्रह्म !) समोर उभ्या करतील त्या पोरीला माळ घालायला तयार. कारण पुढे फक्त किस्से गिरवायचे असतात !

लग्नांच्या बाबतीत पोरं-पोरी दोन व्यक्तिमत्त्वांचं मीलन, विकास, म्हणून बघतच नाहीत.

बऱ्यांना वाटतं लग्न म्हणजे दोन घराण्यांचं मीलन. त्यांच्या प्रतिष्ठेचा सन्मान. संसारात पडून जबाबदार होण्याची वेळ. मुलांना जन्म देऊन वंशदीपकांची दीपमाळ तयार करायची. उत्तम नोकरी करून बायकोला पोसायची. तिनं ' घर, मुलं ' सांभाळायची. त्यांच्यावर

संस्कार करायचे... असं आणखी बरंच काही.
यामध्ये हुंडा, मानपान, आंतरजातीय, धर्मीय अशा लांब पल्ल्याच्या उड्या घेण्याचा विचार, ' विचार ' म्हणून क्वचित असतो.
परंपरांची अनावश्यक साखळी ' सोनसाखळी ' सारखी जपली जाते...
पुरुषप्रधानव्यवस्थेत मुलांची ही अवस्था. मुलींचं काय बोलणार ?
लग्न म्हटल्यावर बिचारीच्या तोंडावर जो घुंघट येतो, तो दूर होतो तोच मुळी ओटी होऊन आणि मग त्यांची ' ओटी ' भरतच जाते.
अगदी कमरेत वाकेपर्यंत.
अशी तरुण वयातच प्रौढ होणारी, वाकणारी ही पोरं-पोरी पाहिली की, वाटतं ही कसली नवी पिढी ?
फक्त जन्मतारखेचे फरक म्हणून एक दुसऱ्यापेक्षा ' नवा ' एवढंच काय ते नवेपण !
नव्या नवरीसारखे नऊ दिवसांचे !

— संजय पवार

---

चित्रपट

# ' विजेता ' — विजयानंतरचा पराजय !

रेखा देशपांडे

' विजेता 'ची सुरुवात होते काही प्रतीकांनी. —संदर्भ लागतो न लागतोय अशा प्रतीकांनी. हे स्वप्न असतं निहालसिंहाचं. त्यात भूतकाळातली फाळणीच्या वेळची रक्तरंजित आठवण असते, तसंच वाळू उकरून आपण स्वत: आपल्या जखमी मुलाला अंगदसिहला बाहेर काढीत आहोत, असंही एक दृश्य त्याला स्वप्नात दिसतं. मावळत्या सूर्याच्या लाल शेंदरी पार्श्वभूमी-वरून एअरफोर्सच्या गणवेषातला अंगदही समोरून येताना त्याला दिसतो. पुन्हा मध्ये फाळणीच्या वेळी दंग्याला बळी पडलेली कुटुंबियांची कलेवरं आणि आक्रोश करणारी आई दिसते.

ह्या साऱ्या प्रतीकांचं कोडं निहालप्रमाणेच प्रेक्षकांनाही पडतं आणि मग चित्रपटातून ते हळूहळू उलगडत जातं. लक्षात येतं की, निहालला तर भविष्यकाळच स्वप्नात मिळाला होता. काही काही माणसांना स्वप्नात भविष्यकाळच दिसतो म्हणे ! !

स्वप्न संपतं. रात्र संपते, दिवस सुरू होतो, तेव्हा निहालची महाराष्ट्रीय पत्नी निलिमा ( रेखा ) तंबोरा घेऊन गाताना दिसते. निहाल ( शशी कपूर ) कामावर जाण्याच्या तयारीत. तिचं गाणं संपल्यावर त्या दोघांचं जे तुटक तुटक संभाषण होतं, त्यातून लक्षात येतं की, नवरा–बायकोचं आपसात काही फारसं बरं नाहीये. ते कशामुळं असावं ? निहालसिग फाळणीनंतर भारतात, मुंबईत येऊन स्थायिक झालेला शीख. (बहुधा सीमेवरून भारतात येताना त्यानं सोयीसाठी केस कापलेले आहेत.) तो मुंबईत जाहिरातपट बनवतो. पत्नी निलिमा मराठी आहे, ते चित्रपटभर ती फक्त इरकली साड्या नेसते, त्यावरून ओळखायचं बरं का ! झालंच तर भाऊ (ओम पुरी) अरविंद एकदा घरी येतो, तेव्हा ती त्याला ' बस ना ! ' असं म्हणते त्यावरून.

अंह ! पण हा आंतरधर्मीय, आंतरप्रांतीय विवाह हे त्या दोघात आता निर्माण झालेल्या बेबनावाचं मळ बिल्कुल नाहीये. एवढंच नव्हे, तर मराठी निलिमाचं आपल्या शीख सासू (दीना पाटक) बरोबर छानच पटतंय. तेव्हा, हेसुद्धा कारण नाहीये. रेखाला, म्हणजे निलिमाला मराठी दाखवणं, ह्या चित्रपट-कर्त्याचं एक गिमिक, ह्यापेक्षा दुसरा काही उद्देश जाणवत नाही.

निलिमाचं गाणं, तिच्या गुरुजींनी गाणं शिकवायला घरी येणं हे नवऱ्याला फारसं पसत नसावं, असंही दोघांच्या संभाषणातून जाणवतं; पण ते तेवढ्यापुरतंच. कारण हे सूत्रही पुढे दोघातल्या संघर्षात आपला भाग असल्याचं कुठे सिद्ध करीत नाही. गाण्याचा हा संदर्भ मध्येच संपला. '

नवरा–बायकोत हा असा बेबनाव का बरं ? आणि पुढं ह्याचं काय होणार–असा प्रश्न पडता–पडताच, म्हणजे कथेचं सूत्र हाती लागता–लागताच एक वेगळाच धागा हाती लागतो. निहाल–निलिमाचा मुलगा अंगदसिग अचानक पाचगणीहून घरी परत येतो. त्याचं मन शाळेत रमत नाहीये. घरी राहून तो अभ्यास करीत नाही, म्हणून त्याला पाचगणीला पाठवलेलं असतं, तर तिथूनही हा परत येतो. आईला एक नवीच काळजी–ह्या मुलाचं पुढं कसं होणार ? हा स्वत:च्या पायावर कसा उभा राहणार ? तर बाप अंगदच्या चंचल वृत्तीला वैतागलेला, मुलगा बापाशी परकेपणानं वागतो, ही आणखी एक गुंतागुंत.

म्हणजे कथा ह्या अंगदच्या समस्येची आहे तर ! पण मध्येच सुगावा लागतो तो पहिल्या कथासूत्राचा. जाहिरातपट निर्माण करणारा निहाल पत्नीशी एकनिष्ठ नसावा. पत्नी त्याचा थंडपणे निषेध करीत असते आणि ' मदर्स पेट ' असलेला अंगद आपल्या आईला बाप दु:ख देतो आहे हे जाणवून अस्वस्थ झालाय. अंगदचा आणि बापाचा सुसंवाद त्यामुळेच जमू शकत नाहीये. एकीकडे तर काही तरी नेत्रदीपक करावं अशी तारुण्यसुलभ ऊर्मी आहे आणि ते ' काही तरी ' म्हणचे काय, ह्याचं उत्तर तर सापडत नाही. त्यामुळं काही करता येत नाहीये. ह्या विचित्र वैफल्यानंही तो ग्रस्त आहे.

## मानसिक गुंता

अंगदची ही मानसिक आंदोलनं मात्र फार हळुवारपणे, अलगदपणे उलगडत जातात. मुलगा आपल्याशी परक्यासारखा वागतो, नेमकं आपल्याला जे आवडू नये, तेच करू पाहतो, ह्या व्यथेनं बाप चिडचिडलेला आहेच. ह्या मानसिक गुंतागुंतीतून अंगद कसा बाहेर येतो, निराशेच्या वाता-

वरणातून आशावादाच्या चकचकीत सूर्य-प्रकाशाकडे कसा वळतो, त्याची मुख्य व्यथा आहे हे लोकांना जाणवतं. आपल्या निराशा, आपली वैफल्यं, डगमगणारा आत्मविश्वास, भीती ह्या नकारात्मक जाणिवांतून तो अनेकांच्या मदतीनं आणि स्वत:च्या प्रयत्नांनी बाहेर पडतो. त्याच्या ह्या प्रवासाबरोबरच त्याच्या आई-बापांचे सुधारत जाणारे संबंध, त्याच्या व बापाच्या दरम्यानचं कमी होत जाणारं अंतर हे जुळं कथानकही आपसूक प्रवाहित होत असतं. आई-बापांमध्ये सुसंवाद स्थापित होतो न होतो तोच मोटारअपघातामध्ये आईचा–निलिमाचा मृत्यू होतो आणि इथे हे जुळं कथानक संपतं.

मात्र ह्या अपघातामुळंच पिता-पुत्र आणखी जवळ येतात. मुलगा आणखी मोठा होतो आणि बाप हळवा. वरकरणी विनाकारण घातलेला हा अपघात प्रत्यक्षात ह्या दोघा पात्रांवर असा परिणाम करून जातो. एकाच्या व्यक्तित्वाला उंची देतो तर दुसऱ्याला खोली !

पण इथे हे कथानक संपता संपता तिकडे एन्. डी. आणि एअरफोर्सच्या आघाडीवर आणखी कथानकं सुरू झालेली असतात. वेंकट राजूचा विमानोड्डाणात विमानावरचा ताबा सुटणं, अॅनाची आणि अंगदची मैत्री, परस्पर आकर्षणाची, प्रेमाची झाली न झालीशी जाणीव आणि कहाणी अॅनाच्या वडिलांची -कॅप्टन वर्गिस (अमरीश पुरी)चीही. फायटर पायलटचं प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देणारे, ते विद्यार्थीप्रिय आणि पितृतुल्य शिक्षक आहेत व आईवेगळ्या अॅनाचे प्रेमळ वडीलही. त्यांना झालेल्या ल्युकेमियानं, त्यांच्या मृत्यूनं अॅना, अंगद, वेंकट राजू, अस्लम, विल्यम असे सारेच अंतर्बाह्य हलून जातात. अंगदला त्यांनी दिलेला आत्मविश्वास– हे त्यांचं अंगदच्या कथेतलं महत्त्व; पण त्यांच्या ह्या मृत्यूचा, त्यांच्या कथेचा एक अलग परिणाम साधतो.

## आधारवेल

मग सुरू होतं १९७१ चं युद्ध. अंगद फायटर पायलट म्हणून युद्धात भाग घेतो. संपूर्ण आत्मविश्वासानं. एकट्या राहिलेल्या अॅना (सुप्रिया पाठक)ला अंगद आपल्या हळव्या झालेल्या वडिलांकडे राहायला पाठवतो. आता ती दोघे मिळून एक वेगळाच मानसिक ताण 'शेअर' करू लागतात. एकमेकांचा ताण कमी करायचा प्रयत्न करीत राहतात. त्यातून एकमेकांशी जोडले जातात आणि मग एक दिवस अंगद बेपत्ता झाल्याचा फोन येतो. भावी सुनेला–अॅनाला धीर देण्याचा प्रयत्न करता करता निहाल स्वत: मात्र उरी फुटतो आणि काही दिवसांपूर्वी वडिलांच्या आजाराचं वृत्त कळल्यावर उन्मळून पडणारी अॅना मात्र खंबीरपणे उभी राहते.

हॉस्पिटलमध्ये निहाल आणि वाळवंटात बेपत्ता झालेला अंगद दोघांचा संघर्ष सुरू होतो मरणाशी.

'विजेता बन, मृत्यूला पराभूत कर, आता उठलास तर पुढे प्रत्येक प्रसंगी लढण्याचं बळ येईल !' अशी पित्याकडून मिळणारी संजीवक प्रेरणा जणू अंगदची इच्छाशक्ती बनून येते, तर हॉस्पिटलमध्ये बेहोषीतही सतत मुलाचं क्षेमकुशल चिंतणाऱ्या निहालची इच्छाशक्तीही त्याच्या मरणाशी झगडत राहते.

ही पात्रांची सगळी मानसिक आंदोलनं दाखवताना पटकथाकारानं अतिशय बारीक कलाकुसर केलेली आहे आणि प्रत्येक कलाकारानं कसोशीनं ती आपल्या अभिनयातून प्रतिबिंबित केली आहे. काही तरी करण्याची जिद्द, आपल्याला काही करता येईल की नाही हा संदेह, नक्की काय करावं हे कळत नसणं, आत्मविश्वास डळमळतो आहे त्याची भीती, कोवळ्या प्रेमात पडल्यावर, ते व्यक्त कसं करावं ही समस्या अशा मानसिक गुंतागुंतीनं भरलेली अंगदची व्यक्तिरेखा कुणाल कपूरनं कसोशीनं साकार केली आहे. किंबहुना 'आहिस्ता आहिस्ता' नंतर त्यानं दिलेला हा सुखद धक्का आहे.

बापाचा आक्रस्ताळेपणा, हळवेपणा आणि खंबीरपणा शशीनंही परिपक्वपणे उभा केला आहे. ताणतणावांच्या साऱ्या प्रतिक्रिया रेखाच्या संवेदनाक्षम चेहऱ्यानं फार सुंदर टिपल्या आहेत. मात्र ती अंगदची आई शोभत नाही.

अंगदवर प्रेम करणारी, तो प्रेम व्यक्त करीत नाही म्हणून त्याच्यावर वैतागलेली, पित्याच्या आजारात असहाय्यपणे अंगदच्या कमरेला मिठी घालून रडणारी आणि शेवटी निहालच्या आजाराला खंबीरपणे तोंड देणारी अशी छोटीशी, कधी बालिश तर कधी प्रौढ समजूतदारपणा दाखवणारी अॅना सुप्रियानं तर इतकी गोड रंगवलीय ! तसाच लक्षात रहातो तो के. के. रैनाचा विल्यम. त्याचा मोकळा–ढाकळा, प्रसन्न अभिनय.

विल्यमचे प्रसंग, कॅप्टन वर्गिस मुलीला 'तुझ्या आईकडे जाऊन मी पियानो वाजवायचो' म्हणून सांगतात तो निहालला अंगदचं पहिलंच पत्र येतं तो शशी आणि रेखानं रंगवलेला, अंगदवर रागावलेली अॅना कारमधून अंगद व त्याच्या मित्रांना भेटते, अंगदकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करते तो आणि अंगद अॅनाजवळ आपलं प्रेम व्यक्त करतो तो प्रसंग अशी किती तरी दृश्यं पटकथाकाराच्या आणि संवादलेखकाच्या लेखणीतून सहज सुंदर उतरली आहेत आणि त्यात कलाकारांनी तेवढाच सहजपणे रंग भरलाय

हे सारे प्रसंग आपापल्यापुरता छान परिणाम साधून जातात. मात्र विमानोड्डाणाच्या आणि हवाईयुद्धाच्या दृश्यांत छायाकार असा काही गुंगलाय की, आपल्या दिग्दर्शकीय जबाबदारीचा त्याला संपूर्ण विसर पडलाय. (गोविंद निहलानी ह्या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि छायाकार आहेत.) किंबहुना आपणच दिग्दर्शक असल्याचा नको तितका फायदा त्यांच्यातल्या छायाकारानं घेतलाय. एकदा ही आभाळातली नेत्रदीपक फोटोग्राफी सुरू झाली की, कथानकाचा ओघ अडतो. त्यातून राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेच्याही आहारी गेल्यानं (मनोजकुमारचा प्रभाव की काय !) नेमकं अस्लमलाच राजस्थानसीमेवर पाठवून गावकऱ्यांकडून मार खायला लावला जातो.... आणि एका कथानकाला अशा जागोजागी फुटणाऱ्या पारंब्यांमुळं चित्रपटाचा एकसंध परिणाम मात्र होत नाही.

## फापटपसारा

परिणामी, सगळा चित्रपटच पसरट, कंटाळवाणी लांबी असलेला असा वाटू लागतो. शेवटी 'विजेता बनो' म्हणून मुलाला उपदेश करीत करीत शशी कपूर चित्रपटाचं मुख्य सूत्र पुन्हा एकदाचं जागेवर आणून ठेवून फापट पसारा आवरायचा प्रयत्न करतो आहे–हेही लक्षात आल्यावाचून रहात नाही. चौरंगी लेनच्या विजयानंतरचा शशी कपूरचा हा पराजयच आहे ! □

# सप्रेम नमस्कार

पृष्ठ १ वरून

---

मी लिहिलेल्या पत्राला पुरावा म्हणून छापलेल्या लेखातील खालील पाने वाचून पहावीत.

३१ मार्च, ८३ — रा. ज. देशमुख, पुणे

पान नं. ७३,७४,७६,७७,७८,७९

प्रत–

प्रा. भीमराव कुलकर्णी (ज्यांनी 'माणूस'मध्ये 'एका पानाची कहाणी' या पुस्तकावर अभिप्राय लिहिला....)

*

◻ दि. १६ एप्रिल १९८३ चा माणूसचा अंक आजच मिळाला. मुंबई वार्ता या स्तंभामध्ये 'आंधळं दुर्लक्ष नि आंधळं कवटाळणं' या मथळ्याखाली ठाणे येथे संस्थेने दि. ३ एप्रिल रोजी आयोजित केलेल्या चर्चासत्राचा श्रीमती ललिता बर्वे यांनी घेतलेला परामर्ष वाचला. धन्यवाद !

या चर्चासत्राचा परामर्ष घेताना श्रीमती ललिता बर्वे यांनी काही शंका उघडपणे व काही वाक्यरचनेच्या नियोजनातून सूचित वा ध्वनित होतील अशा प्रकारे व्यक्त केल्या आहेत, अर्थातच यामुळे सबंध वृत्तांत हा झालेल्या कार्यक्रमाची प्रामाणिक नोंद न होता आपल्या शंकेला बळकटी आणण्याच्या संदर्भाची नोंद या स्वरूपाचा प्रकर्षाने जाणवतो. समीक्षक म्हणून संपूर्ण कार्यक्रमावर त्यांचे मत व्यक्त करण्याचा त्यांचा अधिकार मी आधीच मान्य करतो. मतभेद व्यक्त करणे वा आपली प्रामाणिक मते भिन्न असली तरी मांडणे यात गैर काहीच नाही. अंतिम समतोल विचारबांधणीच्या प्रक्रियेमध्ये ते स्वागतार्हच आहे, या पार्श्वभूमीवर त्यांनी व्यक्त केलेल्या भिन्न विचारांचा संपूर्ण आदर राखून संस्थेच्या एकंदर दृष्टिकोनावर त्यांनी व्यक्त केलेल्या शंकांचे निराकरण करण्याचा येथे प्रयत्न करतो.

इतिहासपत्रिका हे भारतीय इतिहास-पुनर्लेखन मंडळ, ठाणे शाखेचे एक अपत्य, दोन्ही नावांमध्येच व्यक्त झाल्याप्रमाणे प्रामुख्याने इतिहास व त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या इतर विषयांचा अभ्यास संस्थेमध्ये व ओघाने त्या पत्रिकेमध्ये केला जातो. अजूनपर्यंत जगामधील सर्व शाळा व महाविद्यालयांमधून इतिहास हा विषय सरकारी व गैरसरकारी स्तरावर शिकवला जात आहे तोपर्यंत या विषयात रस घेऊन अभ्यास करावा की करू नये या विषयाच्या वादामध्ये मी शिरत नाही ज्या दिवशी हे सर्व देश व त्यांची सरकारे इतिहास हा विषय मोडीत काढतील त्या दिवशी ही संस्थासुद्धा मोडीत काढली जाईल. संस्थेला इतिहास म्हणजे नुसत्या सनावल्या, राजे व त्यांच्या राज्यांचा व लढा यांचा तपशील एवढाच अभिप्रेत नसून या संस्कृतीचा, त्याच्या कला, नाट्य, शास्त्र इत्यादी अंगांचा व त्याच्या विकासाचाही इतिहास अभिप्रेत आहे. संस्थेच्या सभासदांमध्ये व इतर सर्वसामान्य जनांमध्ये या विषयाची गोडी निर्माण व्हावी व वेळोवेळी मिळणाऱ्या अपूर्ण माहितीपेक्षा अधिक शास्त्रीय व साधार माहिती त्यांना मिळावी म्हणून संस्थेने गेल्या वर्षी एकंदर दोन Science and technology in Hindu tradition व music and musical intruments in Hindu tradition व या वर्षी एक Dance and drama in Hindu tradition अशी चर्चासत्रे आयोजित केली. येथे सांगायचा प्रमुख मुद्दा असा आहे की, या सर्व कार्यक्रमांमध्ये जवळजवळ तीस विद्वानांनी भाग घेतला. त्या सर्वांना त्यांनी निवडलेल्या विषयावर त्यांना पाहिजेत ती मते व्यक्त करण्याची संपूर्ण मुभा दिली गेली होती. याचा प्रत्यय आपण ते सर्व निबंध वाचून वा त्या सर्व कार्यक्रमांची संस्थेजवळ असलेली ध्वनि–फीत ऐकून घेऊ शकता.

आता थोडे संस्थेच्या कार्यकर्त्यांबद्दल बघू या. प्रचलित राजकारणाचा व समाजकारण करणाऱ्या भोंगळ नेतृत्वाचा तिटकारा, उबग येऊन ही काही तरुण मंडळी एकत्रित झाली आहेत. समीक्षिकेला अभिप्रेत असलेल्या सर्व आधुनिक व शास्त्रीय गणित, वैद्यकीय, स्थापत्य व इतर जवळजवळ सर्व भौतिक शास्त्रांमध्ये निपुणता संपादन केलेली ही तरुणपिढी आहे. यामध्ये कार्य करणारे बहुसंख्य क्रियाशील सभासद आपल्या व्यवसायाच्या वा शिक्षणाच्या निमित्तानेही वैज्ञानिक, आधुनिक मूल्ये जवळ केलेल्या पाश्चात्य राष्ट्रांमध्ये वेळोवेळी जाऊन वा बराच काळ राहून आलेली आहेत.

नुसत्या विचारांचा किंवा भावनांचा उद्रेक एखादे वेळी एखादी संस्था स्थापू शकते; पण तिला शाश्वत व रचनात्मक कार्याची जोड असल्याशिवाय ईप्सित बदल ती संघटना करू शकत नाही याची पुरेपूर जाण या संघटनेच्या कार्यकर्त्यांना आहे. यापैकी कोणीही लेखिका सुचवू पहात असलेल्या त्या संघटनांपासून प्रेरणा घेतलेला वा दूरान्वयेही त्यांच्याशी संबंध असलेला नाही. आणि तरीसुद्धा त्यांच्यापैकी कोणीही स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यास लाजत नाही. यामुळे इतर धर्मीयांबद्दल असहिष्णुता, संकुचितता वा विचारांच्या पुरोगामित्वाला बाधा येते असे त्याला वाटत नाही.

समीक्षिकेने लेखाचा बहुसंख्य भाग हा अत्यंत मार्मिकपणे एका विशिष्ट रस्त्याने जाऊ पाहणाऱ्या संस्थेने व तिच्या कार्यकर्त्यांनी आयोजित केलेले चर्चासत्र असे भासविण्यामध्ये घालविला आहे. कदाचित यामुळेच त्याची एकंदर नियोजनपद्धती, हजर असलेल्या प्रेक्षकांची अभिरुची व मध्यंतरानंतर झालेल्या प्रात्यक्षिकांसह निबंधवाचनाची दखल तिला घ्यावीशी वाटली नाही. कार्यक्रम परिपूर्ण होता, त्यामध्ये काहीही त्रुटी नव्हती, वाचलेल्या निबंधामध्ये काही उणीवा नव्हत्या हा संस्थेचा दावा कधीही नाही त्यामधील त्रुटींची, कमतरतेची, उणीवांची संपूर्ण जाणीव आहे. कदाचित काही चुकाही झाल्या असतील. तशा त्या दर्शविणेही काही गैर नाही. लेखिका म्हणते, 'मंडळी प्रसिद्ध विद्वान होती, काही आपल्या कलागुणांमुळे प्रसिद्धीला आलेल्या नर्तिकासुद्धा परिसंवादात भाग घेणार होत्या. या सर्वांमुळे कार्यक्रमाबद्दल प्रथमदर्शनी मतही असं अनुकूल बनलं की, ही सारी अभ्यासू मंडळी, आपण विचारपूर्वक केलेल्या अभ्यासाचे काही निष्कर्ष सांगतील.' अर्थातच तसं काही न झाल्याचं या वाक्यरचनेमध्येच लेखिकेने मोठ्या खुबीने ध्वनित करून ठेवले आहे पुढे लेखिका एका ठिकाणी म्हणते, 'तेव्हा या सर्व विचाराच्या पार्श्वभूमीवर 'हिंदू नृत्य–नाट्य परंपरे' वरची व्याख्यानेही स्वच्छ मनाने अर्थात – शक्य तितक्या – ऐकावी असं ठरविलं, त्या-

मुळे व्याख्यात्यांचे दृष्टिकोण, त्या दृष्टिकोनातील मर्यादाही स्पष्टपणे लक्षात आल्या.' या समीक्षिकेच्या लक्षात आलेल्या मर्यादा तिने नऊ तास चाललेल्या कार्यक्रमांतील एखाद्या निबंधातील वा अनुषंगाने प्रकट झालेल्या विचारांमधील एखादे उदाहरण देऊन दाखविल्या असत्या तर वाचकाला त्या अधिक चांगल्या समजल्या असत्या. समीक्षक हा प्रत्यक्ष झालेला कार्यक्रम व तो कार्यक्रम न बघितलेल्या प्रेक्षकांमधील एक माध्यम असतो.

वाचकांपर्यन्त पोचायला हवे ते संपूर्ण कार्यक्रमाचे सत्य स्वरूप, स्वतःचे निर्णय न देता, ते सत्यरूपी परीक्षण वाचल्यावर कार्यक्रमाबद्दल, कार्यक्रमाचे नियोजन करणाऱ्या संस्थेबद्दल व तिच्या कार्यकर्त्यांबद्दल मते बनविण्याचा वा निर्णय घेण्याचा अधिकार हा संपूर्ण त्या वाचकाचा. एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून समीक्षक स्वतःही या विचारावर आपले मत व्यक्त करू शकतो; पण ते एका वेगळ्या त्या कारणासाठी लिहिल्या गेलेल्या दुसऱ्या एखाद्या लेखामधून. खरं म्हणजे डॉ. जी. के. भट यांचा निबंध म्हणजे त्यामधील व्यक्त केलेल्या विचारांबरोबरच ओघवत्या इंग्रजी वक्तृत्वशैलीचा एक अत्यंत उत्कृष्ट नमुना होता. श्रीमती कनक रेळे यांनी मुद्दाम कार्यक्रमाकरता बसविलेले नृत्य व नृत्यशैलीचा संपूर्ण घेतलेला परामर्ष, श्रीमती सुचेता भिडे यांचा सोप्या सुटसुटीत मराठी भाषेत प्रात्यक्षिकांसह भरतनाट्यम्‌वरचा निबंध व रोहिणी भाटे यांचा गेल्या तीस वर्षांचा अनुभव, कथ्यकचा व्यासंग व त्याच्या जोडीलाच अगदी प्रयासहीन व चपळ हालचालींनी युक्त असे दिलेले कथ्यकचे प्रात्यक्षिक यात काहीच उल्लेखनीय सापडू नये ? अभ्यसनीय वाटू नये ? ती एका मर्यादित विचारसरणीकरता केलेली धडपड वाटावी, हा दोष कोणाचा ? आपल्या दृष्टीवर आकलन व ग्रहणशक्तीवर मर्यादा घालणाऱ्या समीक्षिकेचा का त्या आयोजित केलेल्या संस्थेचा ?

या संपूर्ण कार्यक्रमाची नऊ तासांची टेप संस्थेकडे आहे ज्यांच्या निष्ठा मर्यादित नाहीत, दृष्टी विशाल व आधुनिक आहे अशा लेखिकेला व 'माणूस' संपादकवर्गाला मान्य असलेल्या कोणत्याही चार विद्वानांसमोर ही टेप वाजविण्यास संस्था तयार आहे. या संपूर्ण कार्यक्रमामध्ये कुठेही या परंपरेची अवास्तव स्तुती, हीच परंपरा श्रेष्ठ आहे असे सांगण्याचा प्रयत्न, इतर परंपरांची अवहेलना वा तत्सम बांधिल दृष्टिकोनाला पूरक अशी कोठलीही विचारसरणी मांडली गेल्याचे दाखवून दिल्यास ते चार विद्वान जी सांगतील ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहे. उणीवा अवश्य दाखवा, भिन्न विचार व्यक्त करा; पण आज केवळ समीक्षिकेची लेखणी हातात आहे म्हणून अवहेलना, संस्थेबद्दल गैरसमज पसरवील अशी सूचक व पोषक वाक्यरचना शोभनीय नाही. एक वेळ संस्थेबद्दल समजू शकतो; पण संस्थेच्या चर्चासत्रामध्ये भाग घेतला म्हणून त्या विद्वानांच्या निष्ठांवर, दृष्टिकोनांवर शंका ध्वनित करणे हे तर अधिक निषिद्ध होय.

आपला संपादकीयाचा अनुभव खूप वर्षांचा आहे. लेखिकेने माझ्या संपादकीयांतील काही भागांचा अनुवाद अचूक केला आहे, तो येथे मुद्दामहून देतो. 'गेल्या काही वर्षांत गरिबी हटविणाऱ्या आणि समानता आणणाऱ्या बऱ्याच अनेक कलमी कार्यक्रमांचा आपल्यावर वर्षाव झाला आहे. पक्षांची धोरणं निरनिराळी असल्यामुळे असल्या कार्यक्रमाबाबत एकवाक्यता दिसून येत नाही; पण भारतीय नागरिकांनी एक तीन कलमी कार्यक्रम मात्र स्वीकारला आहे आणि तो म्हणजे आपल्या प्राचीन इतिहास, धर्म आणि संस्कृतीकडे अज्ञान, दुर्लक्ष आणि आपण तथाकथित आधुनिक, शास्त्रीय, निधर्मिक तत्वांचा पुरस्कार केला आणि त्यामुळे समता, शांती, सामंजस्य येईल अशी आपली समजूत होती; परंतु तसं काहीही आपल्याला यामधून मिळालं नाही. मात्र आपल्या प्राचीन इतिहास आणि संस्कृतीबद्दलचा आपला अभिमान, आदर आणि विश्वास तेवढा साफ पुसला गेला.'

यातला प्रत्येक शब्द विचार करून व्यक्त केलेला आहे. यामध्ये कुठला संकुचित दृष्टिकोन वा सत्याचा अपलाप केला आहे हे मला कळेल का ? का संपादकीयामधील ही वाक्ये बहुतांना पटतील वा विचार करायला लावतील, या भीतीपोटी आधीच यामध्ये काही तरी बांधिल दृष्टिकोन आहे, अशी आवई उठवायची ? जशी रूढींवर अंधश्रद्धा नको तशी या भोंगळ, फसव्या शाब्दिक घोषणांवरसुद्धा नको. केवळ एखादी गोष्ट आधुनिक आहे, विज्ञाननिष्ठ आहे म्हणून ती सरसकट अंगीकारणे हासुद्धा एक भोळसटपणाचा किंवा अंधश्रद्धेचाच प्रकार. निष्ठा परंपरेच्या दावणीला बांधू नका असा आक्रोश करायचा आणि समजा त्या मुक्त झाल्या तर तेवढ्याच भाविकतेने आणि श्रद्धेने त्या आधुनिकतेच्या आणि विज्ञाननिष्ठेच्या दावणीला बांधायच्या, ही कुठली आधुनिकता आणि विज्ञाननिष्ठा ? जुनं सोडा म्हणजे आधुनिक व्हा. धूम्रपानाचे शरीरावर अपायकारक परिणाम होतात, हे विज्ञानाने केव्हाच सिद्ध केले; पण मुक्त विचार आणि विज्ञाननिष्ठांचे पाईक समजणाऱ्या पुरुषांचेच काय पण स्त्रियांचेसुद्धा अगदी मनसोक्त धूम्रपान वैयक्तिक स्वातंत्र्याच्या छत्रीखाली. संस्थेचे एक संशोधन आहे ताजमहाल हा शहाजहानने आपल्या प्रेमळ पत्नीकरता बांधला नसून ते एक जुने शिवमंदिर आहे. आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर तिला पुरण्याकरता त्याने ते वापरले. थोडक्यात शहाजहान हा या वास्तूचा कर्ता नसून तो एक प्राचीन हिंदू शिल्पपरंपरेप्रमाणे बांधलेला वास्तू आहे. यामध्ये हिंदू वा मुस्लिम किंवा त्यांच्या धार्मिक, राजकीय, व सामाजिक भावना चेतविण्याचा वा दुखविण्याचा काडीचाही संबंध नाही. श्री. ओकांनी हा सिद्धांत जवळजवळ वीस वर्षांपूर्वी मांडला गेली तीन वर्षे यू. के. मध्ये स्थायिक झालेले श्री. गोडबोले हे याच्या तपशिलाचा कसून अभ्यास करीत आहेत. ईस्ट इंडिया कंपनी, डच इंडिया कंपनी त्या वेळच्या सर्व प्रवाशांची वर्णने, लंडन येथे ब्रिटिश म्युझियम, ब्रिटिश लायब्ररी, इंडियन व आफ्रिकन स्कूल ऑफ स्टडीज येथे उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या अभ्यासावरून त्यांचाही निष्कर्ष हाच आहे. आहे या सर्व आधुनिक, विज्ञाननिष्ठ पाइकांची तयारी, हा शोध-निबंध त्यांना हव्या त्या आधुनिक व वैज्ञानिक कसोट्यांवर तपासून पाहण्याची ? का उघडू या छत्री–जातीय व संकुचित–वादाची–म्हणजे सगळा विषयच संपला ! तेव्हा हे आधुनिकत्व, विज्ञाननिष्ठत्व, तथाकथित निधर्मता हा जणू काही नवीन समाजनिर्मितीचा परीसच आहे असा आभास निर्माण करू पाहणे हीसुद्धा एक अंधश्रद्धाच आहे का ? गेली ७०–८० वर्षे अगदी संपूर्ण आधुनिक, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन अंगीकार-

लेल्या युरोप-अमेरिकादि पाश्चात्य राष्ट्रांमध्ये कोठली मोठी प्रमाण, अनुकरणीय समाजरचना दिसते? व्यसने, वैफल्य व अविश्वास यांनी तो संपूर्ण समाज जर्जर झालेला दिसून येतो, अगदी ऐहिक व वैज्ञानिक प्रगतीच्या टोकावर राहूनसुद्धा ! गरज आहे ती सत्यशोधनाची व त्याकरता लागेल त्या रस्त्यावरून जाण्याची–मग तो कितीही खडतर असला तरी सत्य हे फक्त सत्यच असते. ते जुने, नवीन किंवा वैज्ञानिक नसते. आज वैज्ञानिक वाटणारी प्रत्येक गोष्ट सत्य असेलच असे नाही. प्रत्येक जुनी व नवीन गोष्ट, ती जुनी वा नवीन आहे म्हणून ती सत्य असते असेही नाही. आज गरज आहे ती परिपक्व विचारसरणीचे नागरिक तयार करण्याची की, जो जुने काय किंवा नवीन काय याचा तौलनिक अभ्यास करून काळाच्या निकषावर घासून निघालेल्या अशा सत्य तत्त्वांचा वा निष्ठांचा अंगीकार करीत नाही तर कुठलीही गोष्ट नष्ट करायला वेळ लागत नाही; पण समाजामधील श्रद्धांची व आदरांची निर्मिती करायला कित्येक शतके निघून जातात. वरील संपादकीयामध्ये हाच विचार व्यक्त करावयाचा आहे. विज्ञाननिष्ठ होऊ नका, आधुनिक होऊ नका, भूतकाळ कवटाळा हे त्यातून कधीही अभिप्रेत नाही. हाच प्रकार 'इतिहासपत्रिके'मध्ये दिलेल्या विजेच्या शोधाच्या माहितीबद्दल. इतिहासाचा अभ्यास करताना जर का अशी काही इतरत्र कुठेही न आलेली पण साधार असलेली माहिती दिली गेली तर तो आपली निष्क्रियता लपविण्याचा प्रकार ठरतो ? गोष्टींकडे बघण्याच्या दृष्टीवर ते अवलंबून आहे. शक्यता आहे काही तरुणांना ही माहिती क्रियाशीलसुद्धा करेल !

मनातील विचार नि:संकोचपणे आपल्यापुढे मांडले आहेत. संस्थेबद्दल काही चांगले वा वाईट लिहिले जावे ही यामागची भावना वा अपेक्षा नाही. मात्र संस्था चालविणाऱ्या कार्यकर्त्यांबद्दल गैरसमजूत होऊ नये ही इच्छा मात्र नक्कीच आहे. लेखिकेबद्दलसुद्धा कुठलाही गैरसमज वा रोष नाही. ही विचारांची देवाण–घेवाण चालू व्हावी हाच मुळी या चर्चासूत्रामागील उद्देश आहे.

१५ एप्रिल — विजय बेडेकर
संपादक, इतिहासपत्रिका, ठाणे

□

## चाळीस गावांवर विषप्रयोग : मुखपृष्ठ २ वरून

त्यांचे फिरणे, त्यांचा चलाखपणा, सडेतोडपणा, मुत्सद्दीपणा, लोकांशी वागणे ह्या सर्वांमुळे गावकरी व कार्यकर्ते अतिशय प्रभावित झालेले दिसले भेटलेल्या जवळजवळ प्रत्येक माणसाने भाटियांचे लांबलचक गुणवर्णन मला ऐकवले.

दुर्दैवाने भाटियांच्या ह्या भेटीची माहिती मला मिळू शकली नाही. त्यामुळे त्या दिवशी मी स्वत: हजर राहू शकलो नाही. नंतर मी तान्याला गेलो असता गावकऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी मला वरील सर्व माहिती परतपरत उत्साहाने सांगितली. आता ह्या प्रश्नांबाबत नक्कीच काही तरी हालचाल होईल असा आशावदी सूर त्यातून मला जाणवला.

दरम्यान दि. ११ एप्रिल १९८२ रोजी विरोधी पक्षाच्या अनेक आमदारांनी संयुक्तपणे लक्षवेधी सूचनेद्वारा हा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला. जोरदार चर्चा झाल्यावर मंत्रीमहोदयांनी सरकारने कारखान्यांवर मनाई हुकूम बजावल्याचे सांगितले व तातडीने प्रदूषण मंडळाच्या सदस्यांना पाहणीसाठी पुन: पाठविण्याचे मान्य केले. (महाराष्ट्र टाइम्स दि. १२ एप्रिल १९८३)

दि. १५ एप्रिल रोजी मी स्वत: पुन: तान्याला गेलो. तेथे काही कृतिसमितीच्या सदस्यांबरोबर पुन: पाहणीसाठी जावयाचे ठरले. बंधाऱ्यातल्या पाण्याचा रंग व लाल पाणी वाहून आणणाऱ्या नाल्यातील पाण्याचा रंग जास्तच गडद झाल्यासारखे वाटले. लोना कंपनीने मात्र आपले पाणी वाहून नेणाऱ्या चरांवर मातीचा भराव टाकण्याचे काम चालू ठेवले होते. त्या बाजूला कुंपणालगत दगडाची भिंत म्हणजे सुव्यवस्थित रास रचण्याचे काम सुरू होते. रास म्हणण्याचे कारण त्यात सिमेंट अथवा माती मुळीच वापरली जात नव्हती. नुसते एकावर एक दगड रचले जात होते. त्या राशीच्या खालूनही दूषित पाण्याचा प्रवाह चालूच होता. तेथे कामावर असणाऱ्या लोकांशी गप्पा मारल्या, कुंपणाबाहेरूनच. जवळच्याच लाडिवली गावातले लोक होते. मी विचारले, 'हे सर्व पूर्ण झाले तरी फिरून पाणी येईल का हो?' त्यांनी होकारार्थी माना हलवल्या; पण बोलले मात्र नाहीत.

बंधाऱ्यातल्या पाण्याचा अन् नाल्यातल्या पाण्याचा रंग पाहून डोके फिरले होते. कलेक्टर येऊन आठवडा लोटला होता. विधानसभेत मनाईहुकूम बजावल्याचे सांगून चार दिवस लोटले होते तरी सगळे निर्वेधपणे मागल्या पानावरून पुढे चालू होते. नाल्याच्या अनुरोधाने ७ एप्रिलला सापडलेली HIL ची भूमिगत गटारे पहावयास निघालो. मुख्य रस्त्याला फाटा आहे, तिथली पाटी MAIDC च्या खतकारखान्याकडे असे दर्शवते. फाटयाला वळलो. डाव्या हाताला HIL कडे जाणारी रेल्वेलाइन त्यापलीकडे HOC ची एका बाजूची भिंत, उजव्या हाताला तो लाल पाण्याचा नाला. HOCच्या भिंतीला समांतर असा तीन-चार फूट रुंदीचा चर गेला होता. रानटी झुडुपे होतीच; परंतु त्याखाली दलदल असावी. थोडया अंतरावर HOC च्या भिंतीखालून एका मोठ्या चौकोनी भगदाडातून लाल पाणी बाहेर येताना दिसले. भगदाड व्यवस्थित बांधलेले व गज लावून बंदिस्त केलेले. त्यासमोर पाणी साचू नये व ते सरळ जाऊन नाल्याला मिळावे ह्यासाठी बाजूच्या रेल्वेलाइन व रस्त्याखालूनदेखील मोऱ्या बांधलेल्या, अशीच भगदाडे व त्यासमोरच्या मोऱ्या हा प्रकार पुढेही दिसला. त्यापुढे रेल्वेलाइन. रस्त्याला छेद देऊन HIL च्या कंपाउंडमध्ये आत शिरलो. आता रस्त्याच्या डाव्या बाजूला HOC, उजव्या बाजूला नाला व त्याला लागून HIL ची भिंत. नाल्यातल्या पाण्याचा रंग आता हिरवटसर दिसत होता; पण वास मात्र कायम होता. म्हणजे पाण्याच्या लाल रंगाची देणगी HOC ची असावी हे स्पष्ट होते. डाव्या बाजूला HOC ची भिंत वळून दूर दूर जाऊ लागली आणि त्यालगतच्या एकरापेक्षा जास्त जमिनीत लालसर रंगाचा, चमकता, काही ठिकाणी पोपडे निघालेला, ओलसर, अर्धवट वाळलेला साका पसरलेला दिसला. ही जमीन कोणाच्या मालकीची ? HOC ची असेल तर त्याभोवती कुंपण टाकून त्याचा तळ बांधून का काढला नाही ? अन्य कोणाची असेल तर HOC ने हा सगळा प्रकार कोणाच्या परवानगीने केला ?

परत नाल्याकडे वळलो थोडे पुढे जाताच रस्त्याला उजवीकडे आणखी एक फाटा फुटला. तो थोडासा वळून पुन्हा काही अंतरावरून रस्त्याला समांतर जात होता. ह्या फाटयाच्या डावीकडून तो मोठा नाला व उजवीकडून HIL ची मागच्या बाजूची भिंत. त्या भिंतीलगत एका चरातून एक छोटा नाला वाहात होताच. त्या ठिकाणी पूर्वी असलेले गेट भिंत बांधून बंद केलेले दिसले. त्या गेटाशेजारूनच एक गटार हद्दीबाहेर आणून नाल्यात सोडले होते. हे गटार हद्दीबाहेरही

शंभर फूट व्यवस्थित बांधलेले होते. पुढे जाऊन पाहिले तेव्हा भिंतीत आणखी एका ठिकाणी मोठे भोक पाडलेले दिसले त्यातूनही पाणी बदाबदा भिंतीलगतच्या नाल्यात पडत होते. भोक जुने असावे. कारण भोकाखालच्या दगडांवर व भिंतीवर काळा निसरडा थर जमलेला होता. वाकून भोकातून आत पाहिले. आतून ते गटार भिंतीपर्यंत व्यवस्थित बांधलेले दिसत होते आणि मग आधीच वर्णन केलेल्या HIL च्या 'भूमिगत' गटारापाशी पोहोचलो अन् डोक्याला हात लावला. कंपनीच्या लटपटी खटपटीपणाची कमाल वाटली. मनात आले 'ग्रेट आहेत बाबा हे लोक!' कंपनीच्या भिंतीच्या आतून हे गटार सुरू झाले असणार. त्याकरता भिंतीच्या आत त्यांना सहा-सात फूट खोल जावे लागले असणार व त्या भिंतीखालून बाहेर आल्यावर दहा फूट रुंद, सहा फूट खोल असा तो चर व त्यापलीकडचा पंधरावीस फुटांचा रस्ता, त्याच्याखालून जाऊन ते भूमिगत गटार रस्त्यापलीकडच्या झाडोऱ्यात उघडत होते! कदाचित त्याचे दुसरे तोंड चराखाली असावे. गटाराच्या तोंडाशीच इतस्ततः त्याचे तोंड झाकण्यासाठी वापरलेले गवत पडले होते. आता मात्र त्या तिथून खळखळत घाण पाणी बाहेर येत होते बिनधास्तपणे.

HIL मधून बाहेर येणाऱ्या पाण्याची वेगळीच गंमत होती. पृष्ठभागावर पाण्याचा रंग पांढरट, थोडीशी हिरवी–काळी छटा; पण गंमत अशी की, दगड टाकला की, तळातून वाहणारी काळी काळी घाण उसळून वर यायची. पाण्याला वास भयानक आणि गंमत म्हणजे, घाणीसकट बाटलीत घेतलेल्या ह्या पाण्यात चार दिवसांनी ती घाण विरघळलेली आढळली. त्यातून निर्माण होणाऱ्या अनेक शक्यतांचा पडताळा तज्ज्ञांकडून करवून घ्यावा लागेल. उदा. ते पाणी इतके जहाल आम्लधर्मी आहे का? कितीही घाणही त्यात विरघळून जावी? दुसरे म्हणजे ही काळी विरघळलेली घाण पाण्यात मिसळल्यावर आरोग्यास अपायकारक नव्हे काय? मला तेथे आणखी एक प्रकार दिसला. त्या पाण्यात अंड्याच्या बलकाच्या रंगाचे व त्याचसारखे दिसणारे घट्ट, जड रसायनांचे प्रवाही पुंजके दिसत होते. पाण्याच्या तळाशी पण पाण्यापासून अलग हळूहळू वाहणारे, प्रवाही असे ते पुंजके मोठाल्या पिवळ्या अमीबासारखे भासले. मी त्यावर दगड मारून पाहिला; पण काळ्या घाणीसारखे ते वर उसळून मात्र आले नाहीत. त्याच पातळीत पसरत गेले. का कुणास ठाऊक पण मला हे 'अमिबा'च जास्त धोकादायक वाटले. त्यांचे एकंदर स्वरूपच भीतिदायक होते!

परत त्या मोठ्या नाल्यापाशी आलो. HILची घाण छोट्या नाल्यावाटे व भूमिगत गटारावाटे त्या मोठ्या नाल्यात येत होती. त्यापलीकडे जाऊन पाहिले. आता पाण्याचा रंग छान पोपटी हिरवा होता. ह्या रंगाचे श्रेय मात्र संपूर्णपणे MAIDC च्या खतकारखान्याचे होते.

थोडक्यात हे तिन्ही सरकारी उपक्रम पाताळगंगेच्या पाण्याद्वारे चाळीस गावांतल्या लोकांना अगदी मुक्तपणे देणग्या देत होते. जरी महाराष्ट्र सरकारच्या MAIDC च्या खतकारखान्याने दिलेला हिरवा रंग भारत सरकारच्या HOC च्या लाल रंगापुढे निष्प्रभ ठरत होता, तरी त्यांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते आणि खटपट्यालटपट्या HIL ने केलेले त्या 'छान' वासाचे, काळ्या घाणीचे न् पिवळ्या अमीबांचे 'गुप्त'दान निश्चितच लक्षात घेण्याजोगे होते!

सगळाच प्रकार तिडिक आणणारा होता. त्या उंच, लांबलचक पसरलेल्या भिंती जणू सर्वांना आव्हानच देत होत्या. चाळीस गावांतल्या साठ हजार लोकांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याइतका अमानुषपणा आणि कलेक्टरसारख्या वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याची फसवणूक करण्याइतका, त्यांच्या सूचनांकडे अन् सरकारी मनाईहुकुमाकडे कानाडोळा करण्याइतका उद्दामपणा ह्या कारखान्याकडे आहे. दि. ११ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्र्यांनी विधानसभेत जे सांगितले त्याच्या उलट चित्र मी दि. १५ एप्रिलला पाहिले. मुख्य म्हणजे हे सगळे प्रकार पूर्ण जोमात, राजरोस चालू आहेत.

ज्या सरकारचा, लोकांचा ह्या कंपन्या अधिक्षेप करतात त्यांची ह्यावर प्रतिक्रिया काय? स्थानिक सरकारी यंत्रणेचा पहिल्यापासूनच असणारा एकंदर थंडपणा संशय निर्माण करणारा होता. तलाठ्यापासून प्रांताधिकाऱ्यांपर्यंतच्या सरकारी सेवकांबद्दल लोक काय बोलतात ते मी ऐकले होते. ह्या थंडपणाने जणू त्याला दुजोराच मिळत होता. आता सरकारपक्षाचे कर्णधार कलेक्टरसाहेब ह्यावर काय म्हणतात ते पाहू या असे आम्ही ठरवले.

परतताना वाटेत आपटा गावात थांबलो. दुपारचा दीड वाजला होता. घसे कोरडे पडले होते. शेवटी एक बर्फाचे गोळे विकणारा दिसला. त्याच्याकडून बर्फवाले सरबत घेतले. सरबताचा ग्लास हातात घेतला आणि रंग पाहून बंधाऱ्यातल्या पाण्याची आठवण झाली. सहज गमतीच्या सुरात त्याला म्हटले, 'बंधाऱ्यातले पाणी आणले तर तुमचा रंगाचा खर्च तरी वाचेल!' गोळेवाल्याने घाईने स्पष्टीकरण दिले, 'नाही साहेब, हे पाणी चांगले आहे. नळाचे नाही. विहिरीचे आहे.' हे ऐकून मजाच वाटली. नळापेक्षा विहिरीला चांगले पाणी ही जगावेगळी गोष्ट खरी होती अन् प्रत्येकाला माहीत होती. विहिरीच्या गैरवापरामुळे ह्या भागात नारूचे प्रमाण मोठे आहे असे मला सेंटरच्याच डॉक्टरीणबाईंनी सांगितले होते. असे असूनही सेंटरचे कार्यकर्ते फिरताना जेथे विहीर असेल तेथे पाणी पिऊन घेतात. म्हणजे लोकांना प्रश्नांचे गांभीर्य माहीत आहे. मग ते कृती का करत नाहीत? त्या गोळेवाल्याला विचारले, 'तुमच्या गावात नळाचे पाणी वापरता का?' 'फक्त वरच्या वापराला. शक्यतोवर पिण्यासाठी विहिरीचे पाणी आणतो.' मग तो पाण्याबद्दलच्या तक्रारी तपशीलवार सांगू लागला. पुढचा प्रश्न नाजूक होता. बरोबरच्या अरुण शिवकरला हळूच म्हटले, 'त्याला विचार मोर्च्याला याल का?' ते त्याने ऐकले. एकदम उसळून म्हणाला, 'हां, हां सगळे येऊ मोर्च्याला. बायकापोरांसकट येऊ; पण कोणी तरी पुढारपणा करायला पाहिजे. आता तारावाले काही तरी करताहेत. आम्ही आमच्या गावाची मीटिंग घेतली. त्यातून पाच जणांना तारावाल्यांकडे पाठवायचे ठरवलंय.' ऐकून बरे वाटले. ज्यांचा प्रश्न आहे, ज्यांची समस्या आहे त्यांना प्रश्नाचे गांभीर्य कळतेय. ते जागरूक आहेत. आता प्रत्यक्ष कृतीपर्यंत किती जणांची मजल जातेय हे पहावे लागेल. कारण जागरूकता व कृती ह्यातही बरेच मुद्दे आड येऊ शकतात.

कृतिसमितीच्या मंडळींबरोबर दुपारी तडक अलिबागेला गेलो भाटियांना भेटायला. लोकांच्या कौतुकाचा विषय झालेला हा कलेक्टर बघण्याची खूपच उत्सुकता होती. भाटियासाहेबांचे अनेक कौतुककिस्सेही बऱ्याच जणांच्या तोंडून ऐकले होते. त्यांच्या बंगल्यालगतच्या ऑफिसमध्ये शिरतानाच दारात अशोकला कोणी तरी 'काय कसे काय?' केले. अशोकही न ओळखताच

**हां हां, सगळे येऊ मोर्चाला–बायका-पोरांसकट येऊ !....पण**

हसला. सोबतचा एक कार्यकर्ता म्हणाला, 'हा तो Hoc वाला ऑफिसर !'

### भाटियांची भेट

आम्ही आत शिरलो. भाटिया पांढऱ्या झब्ब्यात होते. सभोवारच्या टेबलावर पसरलेल्या 'Urgent' फायलींच्या ढिगाऱ्यात भाटिया अगदी छातीपर्यंत बुडून गेले होते. आत एक आमदारसाहेब बसले होते मांडीवर मांडी चढवून. त्यांच्या बसण्याचा ढंग, बोलण्याची स्टाइल पाहून शर्टपॅन्टमध्ये असूनही ते आमदार असावेत असा मी तर्क केला. तो अर्थातच खरा निघाला. आम्ही आत शिरताच भाटियांनी अगदी ओळखीचे हसून बसायला सांगितले. दोन मिनिटांनी आमच्याकडे कमावलेल्या पण हिंदीची झाक असलेल्या मराठीत म्हणाले, 'मी तुमचे काम केलेय. आजच मी सर्व कारखान्यांच्या अधिकाऱ्यांची मीटिंग बोलावली होती. उद्यापासून पाणी सोडायला १३३ खाली मनाईहुकूम बजावलाय.' आम्ही त्या दिवशीचा वृत्तांत सांगितला, 'आज तर पाणी जास्तच होते.' म्हणताच भाटिया म्हणाले, 'अभी जल्दीकरके सब पानी बाहर फेंक रहे होंगे, उद्यापासून बंदी आहे ना' भाटियांचा हा आशावाद खोटा ठरणार याची त्या वेळी त्यांना कल्पना होती की नाही कुणास ठाऊक ? पुढे त्यांनी सुचवले की, 'उद्या तुम्ही जाऊन पाणी पहा. पाणी सोडले तर मला फोन करा. लगेच मी पुढच्या कारवाईला सुरुवात करीन.' त्यांच्यापुरता तरी त्यांनी हा विषय संपवलेला दिसला. मला राहावले नाही. मी म्हटले, 'साहेब, ते लोक पाणी सोडणारच. ते फॅक्टरी बंद करू शकत नाहीत. फार पाणीही साठवू शकणार नाहीत. त्यामुळे आज ना उद्या ते पाणी सोडणारच उघडपणे अथवा छुपेपणे. जोपर्यंत मोठी पाइपलाइन समुद्रापर्यंत टाकली जात नाही तोपर्यंत हे असेच चालणार !' थोडासा आवाज चढवून भाटियासाहेब उत्तरले 'मी जज्ज म्हणून हुकुम बजावलाय. तो मोडला तर १८० खाली मी खटले भरीन. त्यांनी पाण्याची काय व्यवस्था लावावी, त्यासाठी कशी पाइपलाइन टाकावी हे सांगायला मी इंजिनिअर नाही व तसे मी MDC ला सांगू शकणार नाही. त्यांनी पाहिजे तर फॅक्टऱ्या बंद कराव्यात !' भाटियासाहेबांच्या ह्या स्पष्ट उत्तरानेच त्यांच्या अधिकाराच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. कदाचित त्याची जाणीव त्यांना झाल्यानेच त्यांचा आवाज चढला असावा.

आम्ही सगळे ताऱ्याला पोहोचलो. रात्री सगळे एकत्र बसलो. २० तारखेपर्यंत गावागावात जाऊन बोलावे, लोकांना भेटावे, २० तारखेला गावच्या प्रतिनिधींनी एकत्र यावे, पाहणी करावी मग एकत्र बसून पुढील हालचालींसंबंधी निर्णय घ्यावा, असे ठरले.

हे सगळे प्रकरणच इंटरेस्टिंग अवस्थेपर्यंत येऊन पोहोचले आहे. ३१ मार्च ते १५ एप्रिल ह्या पंधरा दिवसांत घडलेल्या घटनांचा वृत्तांत त्याआधी आलेला आहेच. सुरुवातीला वाटले होते, कलेक्टरला समजावले. विधानसभेत बोंबाबोंब झाली की, हा प्रश्न मार्गी लागेल; परंतु परिस्थितीतली गुंतागुंत हळूहळू उलगडत गेली. अजूनही ती पूर्णपणे आकळली असे नव्हे; पण ह्या पंधरा दिवसांत लढाईचे स्वरूप स्पष्ट झाले.

आधी वाटले होते हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे अन् लोक झोपले आहेत, त्यांना जागवायला लागेल; पण हळूहळू जाणवले की, वाटते तसे लोक झोपलेले नाहीत. त्यांना परिस्थितीची जाणीव आहे. अर्थात ही जाणीव कृतीत कितपत परिवर्तित होते हे फक्त प्रत्यक्ष पाहूनच समजेल. कारण त्यामधल्या प्रक्रियेत इतके विविध घटक महत्त्वाचा फरक घडवून आणू शकतात की, त्याचे मोजमाप करणे कठीण आहे. इतका चिघळलेला प्रश्न सुटू शकेल ह्यासाठी लोकांना विश्वास वाटणे आवश्यक आहे. अन् फार कठीण आहे. शिवाय तोंडात तोबरा भरलेले विविध हितसंबंधीय, दबावगट, गावांतर्गत राजकारण. परस्पर भांडणे इ. गोष्टी आहेत. ह्याउप्पर जागृती घडवून सगळ्यांना आंदोलनात सहभागी करून घेणे हे कठीण पण आवश्यक काम आहे.

सरकारचा कुंभकर्ण मात्र त्यामानाने लवकर जागा झालाय. त्याचे श्रेय कलेक्टर भाटिया साहेब, त्याबरोबर विधानसभेत आवाज उठवणारे आमदार व प्रसिद्धी देणारी वर्तमानपत्रे व नियतकालिके ह्यांनाही आहे. सरकारच्या मर्यादेमध्ये राहून त्या आघाडीवरून शक्य ते सगळे करण्यात भाटियासाहेब कसूर करणार नाहीत; पण ह्या मर्यादाच सरकारची परिणामकारकता शून्यावर आणून ठेवणार आहेत अन् भाटियासाहेब ह्याबाबत फारसे काही करू शकणार नाहीत.

त्यामुळे ही लढाई वाटली तितकी सोपी नाही, हे तर स्पष्टच झालेय. हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे हे मान्य; पण लोक इतकी वर्षे जिवंत मरण भोगत आलेत की त्यांना ह्या जीवनमरणाच्या प्रश्नासोबतचे जगण्याची सवय झालीय अन् मरण्याची देखील. खरे महत्त्व कंपन्यांचे. त्या म्हणजे देशाच्या प्रगतीची चाकेच जणू. ह्या प्रकरणात तर कंपन्यांचीही अगदीच कोंडी झालीय. त्यांना एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच पाणी साठवता येईल थोड्या दिवसांतच परिस्थिती अशी येईल की, कंपन्या चालू ठेवायच्या तर पाणी बाहेर सोडावेच लागेल. दूरवर समुद्रात सर्व पाणी नेऊन सोडण्यास पुरेशी पाइपलाईन नाही. नवी पाइपलाइन व्हायला कित्येक महिने लागतील. सांडपाणी व टाकाऊ रसायने टॅन्कर्सनी समुद्रात नेऊन सोडणे एवढाच उपाय उरतो; पण आपल्या सर्वसामर्थ्यवान कंपन्या लोकांच्या किंवा सरकारच्या क्षुद्र दडपणापुढे थोड्याच झुकणार आहेत ? टॅन्कर्सचा हा मार्ग केवढा कटकटीचा न् महाग ! सरळ नदीत सांडपाणी सोडण्याचा सुलभ उपाय उपलब्ध असताना ही एवढी कटकट व खर्च कोण करणार ? भाटियासाहेब काय करतील ? फार तर खटले भरतील, अटक करतील, आमच्या कंपन्या एकाहून एक निष्णात वकिलांची फौज उभी करतील. छोट्या-छोट्या मुद्द्यांवरून सुप्रीम कोर्टापर्यंत धडका मारून वेळकाढूपणा करतील. त्यानंतर काही काळ गेल्यानंतर, पुन्हा आपल्या थैल्यांची तोंडे मोकळी करतील, मग सर्वांची तोंडे बंद झाल्यावर गटारांची तोंडे उघडतील. भाटियांसारखे उरलेले आवाज उठवणारे पाठवायला अजून बरेच जिल्हे शिल्लक आहेत.

थोडक्यात यश मिळवण्यासाठी लोकांना खूप तयारी करावयास लागणार. कंपन्यांनी वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारले तर दबावाचे मार्ग लोकांना अवलंबावे लागतील. त्यांच्या कच्च्या मालाचे टॅन्कर्स, ट्रक रोखून धरावे लागतील. सत्याग्रह, घेराओ करावे लागतील. सहजासहजी ह्या कंपन्या दबणार नाहीत. त्यासाठी कृतिसमितीच्या झेंड्याखाली सर्वांनी जोर एकवटून, दमछाक होऊ न देता, साम, दाम, दंड, भेद ह्यांना बळी न पडता नेट लावावा लागेल. पाइपलाइन होईपर्यंत टॅन्कर्सनी सांडपाणी सोडून देण्याचा कटकटीचा व खर्चिक मार्ग स्वीकारणे कंपन्यांना भाग पाडणे हा मुख्य उपाय राहील. कारण परिस्थितीने कंपन्यांची कोंडी केली असली तरी ती परिस्थिती कंपन्यांनी स्वतःच्या कर्मानेच ओढवून घेतली आहे. हेही तितकेच खरे. □

## मुंबापुरी

पृष्ठ ३ वरून

गिरणीमालकांपेक्षा राजकीय नेत्यांनाच जास्त पेचात पकडले आहे. असो.

चंद्रशेखरांनीही ह्या संपाचा उल्लेख केला. चंद्रशेखर अगदी भावनाविवश होऊन बोलतात किंवा त्यांच्या बोलण्याने श्रोते भावनाविवश होतात. कारण सभा संपता संपता त्यांनी पदयात्रेला आर्थिक साहाय्य देण्याचे लोकांना आवाहन केले आणि त्याला शेकडो लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आजची सभा खरोखरच विराट होती. मोरारजी देसाई, कर्नाटकचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे, दंडवते पतीपत्नी, मृणाल गोरे, राजारामबापू पाटील, महापौर बेंदी असे सर्व 'रथी–महारथी' व्यासपीठावर बसलेले. सभेचे संचलन केले शांती पटेलांनी.

गांधींच्या पदयात्रेतून त्यांनी नवे कार्यकर्ते निर्माण केले. यात्रा पुढे गेली ती नव्या संस्थांची पायाभरणी करून. इथे लोक टेकीला आलेत. कोणत्याही नव्या घटनेचे ते उत्स्फूर्त स्वागत करतात. आज चंद्रशेखरांच्या निमित्ताने हे सारे जनतानेते एका व्यासपीठावर एकत्र आले. उद्या चंद्रशेखर गेले की ते सारे 'पुन्हा आपुल्या कामी लागतील.' म्हणजे थोडक्यात यात्रा आली आणि यात्रा गेली. जागृतीची धूळ सावकाशीने खाली बसेल.

ह्या यात्रेला जनतापार्टीचा एक विचित्र वास आहे. चंद्रशेखरांनी कितीही नाकारला तरी तो लपत नाही. सभेत वारंवार दिलेल्या घोषणा आणि भाषणे ह्यावरून तर ते उघडच होते; पण ह्या निमित्ताने तरी खिळखिळी झालेली जनतापार्टी मजबूत बनली तर ते पुण्य काय कमी आहे? तसेच सर्वसामान्य लोकांनीही ह्या यात्रेत उत्साहाने भाग घेतला हेही तितकेच खरे. ही गर्दी ट्रकमधून आणवलेली नाही हे सराईत नजरेला सहज कळते.

'मैं कोई संदेश देनेके लिये नहीं आया हूँ. मैं इस धरतीसे प्रेरणा लेने आया हूँ.' अशा स्टाइलमध्ये हृदय हेलावणारे की काही तरी चंद्रशेखर बोलले. पार्टीचा ठोस कार्यक्रम त्यांनी सांगितला नाही, तरी भाषण श्रवणीय होते. गांधीजींवर ते फार तळमळीने बोलतात. ग्रामविकासाच्या गांधींच्या कल्पना सांगून ते म्हणाले 'हम इस देशको गांधी का देश बनाना है.'

पण पत्रकारांची मात्र त्यांनी पंचाईत केली. इतके दिवस सतत पदयात्रेचे वृत्तांत येतच आहेत. त्यात भाषणाचा भाग येतोच. त्यापेक्षा आता वेगळे वृत्त काय द्यायचे? बातमीमध्ये एकदा पहिला परिच्छेद (इंट्रो) लिहून झाला की उरलेले लिहिणे फारसे कठीण नसते हे साऱ्या पत्रकारांना ठाऊक असते. माझ्या शेजारी बसलेल्या एका पत्रकाराने निघताना माझ्याकडे वळून विचारले 'अरे, क्या करना है? गांधीका देश बनाना है?'

'चलो, बनायेंगे!' मी म्हटलं. हा अगदीच 'सेफ' इंट्रो होता.

चौपाटीवरून निघालो तेव्हा रात्रीचे साडे नऊ वाजत आलेले. साडेदहाच्या आत बातमी जायला हवी. आता कसली ती 'पंजाबी कुल्फी' आणि कसली बेस्ट पाणी पुरी!'

### केवढी प्रगती!

मुंबईच्या लोकल्समध्ये खेळणी विकणारा एक किडुक-मिडुक फेरीवाला येतो. खेळणी सगळी 'टिनपाट' असतात; पण बोलतो मात्र छान! सगळी साखरपेरणी! त्याचं नेहमीचं एक पालुपद असतं–'बच्चा बी खेले बच्चेका बाप बी खेले!'

असंच एक नवीन खेळणं सध्या बाजारात आलंय. वीडियो कॅसेट्स! बच्चे पण खेळताएत आणि बाप पण खेळताएत. परिस्थिती झकास आहे की, घराघरातली बालगोपाळ मंडळी नेमाने 'वीडियो पार्लर'मध्ये जातात. हव्वा तितका वेळ घालवतात. नको–नको ते सिनेमे बघतात. सगळ्या सिनेमात नागड्या-उघड्या बाया आणि पिस्तूलधारी बाप्ये!

विशेषत: उपनगरातून तर हे क्रेझ निवडुंगासारखे बेफाट फोफावतंय.

या वीडियो-पार्लर्समधून मुख्यत्वे 'ब्ल्यू फिल्म्स' दाखवतात. तिकीट रु. ५ ते १० रु. चित्रपट जितका हिट अॅण्ड हॉट, तितके भाव वधारतात.

हाउसिंग सोसायट्यांतून आणि बाजारातून राजरोस हा धंदा चाललाय. पोलिसाला हप्तेही नियमित मिळताएत त्यामुळं काही वांधा येत नाही. तरीही सेफ्टी म्हणून दुकानाच्या आडोशाला पोटमाळ्यावर पाच–पन्नास खुर्च्या टाकून धंदा सुरू होतो. बारा-तेरा वर्षांच्या फाजील जिज्ञासू पोरांपासून ते अवघे पाउणशे वयमानवाल्या आंबटशोकीन थोरांपर्यंत सगळेच गर्दी करतात. या धंद्याला मरण नाही.

पूर्वी आम्ही लहान असताना रोज सगळी मुलं-मुलं मिळून चौपाटीला जायचो आणि वाळूत छातीपर्यंतचं शरीर कोंबून ठेवलेल्या त्या भयंकर डोळ्यांच्या गोसावड्याला बघून परत यायचो. खिशातले दहा पैसे तसेच रहायचे. कधी काळी पिक्चर पाहिलाच तर 'छोटा जवान किंवा' 'श्यामची आई.' आता कॅसेट संस्कृतीतली मुलं वीडियोवर रॅक्वेल वेलशच्या उघड्या मांड्या बघतात. या देशानं केवढी प्रगती केलीय!

–विष्णू जयदेव

**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते, ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

–ग. रा. जाधव
(केसरी, रविवार, ६–१२–८१)

# आंबेडकर भारत

लेखक : **बाबुराव बागुल**
**राजहंस प्रकाशन, पुणे.** मूल्य : २० रुपये.

जगात सामर्थ्यशाली कोण ?
हेन्रिक इब्सेनने म्हटले आहे --
" जो अगदी एकटा,
स्वतःच्या पायावर उभा असतो, तोच."
एका संशोधक-शास्त्रज्ञावर अशी अगदी
एकटयाने उभे राहण्याची वेळ येते.
त्याच्या लहान मुलीला कॅन्सर होतो.
शेजारच्या कारखान्यातील दूषित पाण्यामुळे हा कॅन्सर झाला
अशी त्याची खात्री पटते.
पण कारखान्याविरुद्ध, मालक-चालकांविरुद्ध जायला कुणी तयार नसतें.
त्याचे सहकारी संशोधक, डॉक्टरमित्र, शेजारीपाजारी, कारखान्यातील
कामगार, लोकप्रतिनिधी, नगरपालिकेतील कर्मचारी,
प्रत्यक्ष बायको आणि मुलेदेखील विरुद्ध.
हा एकटा, अगदी एकाकी
आणि त्याची बारा वर्षाची लहानगी- मिचेल मार्टल.
झुंज सुरू होते. एक विरुद्ध सारे.
ही एकटयाची, एकाकी झुंज चित्रित करणारी
अगदी नव्या विषयावरील
एक उत्कंठावर्धक कादंबरी

# ब्लड कॅन्सर

## माणूस वासंतिक विशेषांक मालिकेत

मालिकेची सुरुवात .... ७ मे १९८३
मालिकेचा शेवट .... ४ जून १९८३

## वासंतिक ते वर्षारंभ विशेषांक मालिका

मे महिन्यातील चार अंक आणि जूनचा पहिला वर्षारंभ अंक असे
एकूण पांच अंक. किंमत प्रत्येकी पाच रुपये.

या संपूर्ण कादंबरीशिवाय या अंकात येणारे इतर विषय.

## पाया हादरलेली घरे

**नव्या कुटुंबजीवनातील विसंवाद टिपणारी आत्मनिवेदने, भेदक अनुभवकथने.**

## तीर्थरूप अक्का

जुन्या एकत्र कुटुंबातील एका थोर स्त्रीची अविस्मरणीय व्यक्तिरेखा.

## वैशिष्ट्यपूर्ण कथा

पद्मजा फाटक, सुधा नरवणे, विनया खडपेकर.

**आणि एक विषेश वार्तालेख**

## सातही रंग प्रकाशाला म्हणाले....

दिल्लीच्या दीनदयाळ संस्थेमार्फत, नानाजी देशमुखांच्या नेतृत्वाखाली गोंडा जिल्ह्यात सुरू असलेल्या नवनिर्माण प्रयोगाची विकासकहाणी....
मुक्त शैलीतली, सचित्र, उणीवांकडेही डोळेझाक न करणारी, पण पुरुषार्थ जागवणारी...
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी गोंडा जिल्ह्यात जाऊन शब्दांकित केलेली.

---

हे पाचही विशेषांक नेहमीप्रमाणे दर गुरुवारी सर्वत्र उपलब्ध.
ज्यांची वर्गणी थकलेली नसेल त्या सर्व वर्गणीदारांना त्यांच्या नेहमीच्या वर्गणीतच हे सर्व विशेषांक मिळतील. विक्रेत्यांनी मागणी त्वरित नोंदवावी.

---

# माणूस

## वासंतिक ते वर्षारंभ विशेषांक मालिका

**| एकूण पाच विशेषांक | किंमत प्रत्येकी पाच रुपये |**

---

**ऐन उन्हाळ्यात नवजीवन देणाऱ्या प्रेरक साहित्याचा पाऊस**

# माणुसकीचा झरा

दुर्बल घटकांच्या आर्थिक विकासासाठी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जाहीर केलेले वीस कलमी आर्थिक कार्यक्रम म्हणजे माणुसकीचे झरेच. मिंटी म्हणजे असाच एक माणुसकीचा झरा.

मिंटीने हजारो हरिजनांना व गिरिजनांनाही आर्थिक सहाय्य करून त्यांना नवीन स्वावलंबी जीवन दिले आहे. त्याची थोडीशी तोंडओळख –

- शेती, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व इतर शेतीला पूरक ठरणाऱ्या उद्योगांसाठी **अठरा हजार** लोकांना **साडेचार कोटी** रुपयांचे आर्थिक सहाय्य.
- वाहतुकीचा व्यवसाय करणाऱ्या **बाराशे** लोकांना **एक्याण्णव लाख** रुपये.
- स्वत:चा लघुउद्योग चालविणाऱ्या **तेराशे** लोकांना **अठ्ठ्यात्तर लाख** रुपये.
- किरकोळ व्यापार करणाऱ्या **चार हजार** लोकांना **पंचाहत्तर लाख** रुपये.
- लाँड्री, पिठाची गिरणी, छोटी हॉटेल्स, सायकल दुकान ह्यासारखे छोटे उद्योग करणाऱ्या **सात हजार** लोकांना **एक्क्याऐंशी लाख** रुपये.
- कॉन्ट्रॅक्टर, डॉक्टर यासारखा स्वतंत्र व्यवसाय करणारे व इतर स्वयं – रोजगार करणाऱ्या **पाच हजार** लोकांना **अडसष्ट लाख** रुपये.

छत्तीस हजार हरिजन आणि गिरिजनबंधू स्वावलंबी जीवनाचा नवीन अनुभव आज मिंटीच्या सहकार्याने घेत आहेत.

मिंटी म्हणजे स्वाभिमानी व स्वावलंबी जीवन जगण्यास सहाय्य करणारा जिवंत झरा–

**मिंटी म्हणजेच महाबँक**

**महाबँक म्हणजेच माणुसकीचा झरा––**



**बँक ऑफ महाराष्ट्र**

**[ भारत सरकारचा उपक्रम ]**

**मुख्य कचेरी : " लोकमंगल " १५०१, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५**